# ध्यासपुरुष

✍ प्रा. शिरीष अवधानी



# लेखकाची पार्श्वभूमी

शिरीष नरसिंह अवधानी. वय ७१ वर्षे. एम. एस्सी. पुणे विद्यापीठ, बी.एड. पुणे.
३० वर्षे विख्यात वालचंदनगर इंडस्ट्रिजच्या श्री वर्धमान विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात जीवशास्त्राचा शिक्षक म्हणून कार्यरत.
१९७६–१९९० दरम्यान नाट्य चळवळीत दिग्दर्शन, लेखन, आयोजन यात सक्रीय सहभाग व पुरस्कार.
१९९० एप्रिल–मेमध्ये पर्स्पेक्टिव्ह आसिएन या पॅरिसस्थित संस्थेच्या आमंत्रणावरून पॅरिस व फ्रान्सचा १ महिना अभ्यास दौरा.
२०१० मे – इंग्लंडचा अभ्यास दौरा.
२०११ जुलै – पूर्व व उत्तर अमेरिका, कॅनडाचा अभ्यास दौरा.
२०१२ जुलै – पश्चिम अमेरिका – कॅलिफोर्निया, नेवाडा, कोलोरॅडो, ॲरिझोना या राज्यांचा दौरा.
प्रवासवर्णनपर, व्यक्तित्त्वदर्शनपर पुस्तकांचे लेखन.
दौंडला शालेय, महाविद्यालयीन जीवनकाळात मा. डॉ. जब्बार पटेलांचे नेहमी प्रेरक दर्शन.
१९७४–७५ टिळक कॉलेजचा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कार्य करताना ‘थिएटर ॲकॅडमी’शी दररोज घनिष्ठ संबंध.
वालचंदनगरला मा. प्रा. माधव वझे नाट्यप्रशिक्षणासाठी सदैव येत तेव्हा त्यांचा सहवास, मार्गदर्शन, प्रेरणा.
लंडनला शेक्सपिअर थिएटर, रॉयल अलबर्ट हॉल, न्यूयॉर्कमध्ये थिएटर डिस्ट्रीक्ट क्षेत्रात बऱ्याचदा भटकंती, सॅनफ्रान्सिस्कोचे नाट्यविश्व पुलंचे ‘मि. सानफ्रान्सिस्को’ वाचून भेट, इंग्लंड शेक्सपिअर मधील स्ट्रॅटफोर्ड अेपॉन एव्हॉन येथे एक दिवसभर भटकून स्ट्रॅटफोर्डची जादुई स्मरणयात्रा, आणि इथे तळेगाव दाभाडेत तेवढीच रोमहर्षक आठवणींची संपदा ‘कलापिनी’ परिसरात जमा केली.

# ध्यासपुरुष

✍ प्रा. शिरीष अवधानी

ध्यासपुरूष
प्रा. शिरीष अवधानी
पत्ताः  ६, सुमंगल सोसायटी, यशवंतनगर, तळेगाव स्टेशन.
भ्रमणध्वनी क्र.:  ९०११५४०९६०

प्रकाशिकाः  सौ. योगिता अवधानी पाटील
पत्ताः  सागर अपार्टमेंट, गावडे कॉलनी, चिंचवड स्टेशन.
भ्रमणध्वनी क्र.:  ९९२११३०९३९
कु. अश्विनी अकोलकर
तळेगाव दाभाडे
७५०७५१६७४५

© सौ. योगिता अवधानी पाटील

अक्षरजुळणीः विनायक भालचंद्र लिमये / विनया केसकर
भ्रमणध्वनी क्र.: ९८९०१३५१०९

मुखपृष्ठकारः विराज सवाई
भ्रमणध्वनी क्र.:  ९५६१३०१६५३

प्रथम (संगणक) आवृत्तीः  २७/०९/२०२०

कृतज्ञतापूर्वक आभारः
प्रा. प्रकाश बोकील, पुणे. (पुस्तक पुनर्लेखन, दुरुस्त्या व सुचनांबद्दल)

**विशेष आभारः श्री. अरविंद परांजपे आणि कुटुंबीय**

मूल्यः  कलापिनी रंगमंचासाठी ऐच्छिक देणगी.  (किमान रूपये १००/-)

Name of Account - KALAPINI
Account No.: 113011100000855
IFSC - ABHY0065122
MICR Code - 411065017
हे देणगी मूल्य आपण वरील तपशीलाचा वापर करून NEFT/RTGS, Gpay, Phone PE, Paytm, Amazon pay या सर्व माध्यमांनी करू शकता.
देणगी विषयक अधिक माहितीसाठी संपर्क क्र.:  ८६६८५००८००/९८२३२२३४९९

# ध्यासमग्न कर्मयोगी



'कलापिनी' तसेच समाज उभारणीचा गेली ४४ वर्षे अविरतपणे ध्यास घेतलेल्या डॉ. अ. शं. परांजपे या 'ध्यासपुरूषास' अर्पण

# डॉ. अ. शं. परांजपे जीवनपट

डॉक्टरांचा जन्म नाशिकला झाला. आई व वडील विविध संस्थाशी संबंधित असल्याने त्यांनी लहानपणापासून अनेक कार्यक्रमांच्या तालमी पाहिल्या. नकळतपणे नाटकाचे वेड मनात रुजत गेले. वयाच्या नवव्या वर्षापासून नाटक या विषयाशी प्रत्यक्षपणे त्यांचा संबंध आला. गो. नी. दांडेकर, पं. कमलाकर जोशी, वडील डॉ. शं. वा. परांजपे यांच्यासारख्या महान व्यक्तींबरोबरच्या सहवासाने वेगळा विचार करण्याची व वेगळे काहीतरी करून दाखवण्याची क्षमता तयार झाली. त्यांनी बी.ए.एम.एस., एल.सी.पी. अॅण्ड एस. व एम.बी.बी.एस. या पदव्या संपादन केल्या आहेत. ते १९७९पासून तळेगाव येथे वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत. डॉ. शं. वांच्या आकस्मिक निधनानंतर कलापिनी संस्था बंद पडेल की काय, अशी भीती वाटत होती. मात्र डॉक्टरांनी व त्यांच्या सहकारी मित्रांनी या संस्थेला नव्याने उभारी दिली. त्यासाठी परिश्रमपूर्वक नाटके बसविली. प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत कामगार कल्याण नाट्यस्पर्धेत बक्षिसे मिळविली. अखेरचा सवाल, सूर्याची पिल्ले, लेकूरे उदंड झाली, पती गेले गं काठेवाडी, बोल बाबी बोल, मालकीण मालकीण दार उघड, स्पर्श, मंदारमाला, धन्य ते गायनी कळा, छूमंतर, रारंगढांग, संगीत चैती या नाटकांमध्ये नाट्यलेखन, अभिनय व दिग्दर्शनाची विविध पारितोषिके त्यांना मिळाली आहेत. सूर्याची पिल्ले या नाटकाला राजकपूरच्या हस्ते मिळालेला राज्य पातळीवरचा पुरस्कार हा कलापिनीच्या व डॉक्टरांच्या कलाप्रवासातील महत्त्वाचा टप्पा! त्यानंतर यश व प्रसिध्दी सातत्याने मिळत गेली. बंगलोर, मद्रास, विजापूर, दिल्ली, बडोदा या शहरांप्रमाणेच इग्लंड, सिंगापूर, पुणे येथे देखील नाटकांच्या दौऱ्यात डॉक्टरांचा सहभाग होता. त्यांनी आकाशवाणी बालोद्यान, युवावाणी, कामगार विश्व यामध्ये विविध कार्यक्रमांची निर्मिती व सादरीकरण केले आहे. दूरदर्शनला खुलामंच कार्यक्रमात डॉक्टरांची मुलाखत घेतली गेली. दूरदर्शनवर संगीत नाटकांमध्ये त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका होत्या.

डॉक्टरांच्या पुढाकाराने कलापिनीच्या माध्यमातून बालभवन, स्वास्थ्ययोग, अध्यात्ममंच, सुजाण पालक मंच, रंगवर्धन ही प्रायोगिक नाट्यचळवळ, कला अकादमी हे उपक्रम चालू आहेत, तसेच ध्वनिप्रदूषण विरोधी मंचचे निमंत्रक म्हणून ते काम करतात. यामध्ये जनजागृती घडविण्यासाठी ध्वनिप्रदूषणाविरुध्द वृत्तपत्रातून लेखन करतात व व्याख्याने देतात. मावळ तालुक्याच्या इंडियन मेडिकल असोसिएशन व निमाचे सदस्य म्हणून ते काम पहातात. त्यांना मुंबईच्या अखिल भारतीय नाट्य परिषदेचा रामकृष्णबुवा वझे पुरस्कार, मावळ व पुणे जेसीज्‌तर्फे आऊटस्टँडींग पर्सनॅलिटी यूथ हा पुरस्कार, पुणे चंद्रसूर्य रंगभूमीतर्फे बालनाट्य विषयीच्या कामाबद्दल पुरस्कार मिळाले आहेत. तळेगावच्या लोकांच्या मनात त्यांच्याविषयी असणारा आदर हा त्यांच्यासाठी सर्वोच्च पुरस्कार आहे. त्यांना मावळ विभूषण व प्रमोद महाजन सच्चा कार्यकर्ता या पुरस्कारांनी गौरविले आहे. डॉक्टरांच्या कार्याला यशाचे व कीर्तीचे शिखर मिळो ही सदिच्छा!

# मनोगत

अथांगतेनं भरलेल्या या जगात सर्वात जास्त विशाल काय असेल? नाही, पॅसिफिक महासागरही नाही. ते आहे माणसाचं मन. माणसाचे मन. ते प्रगल्भ, बहुआयामी होत गेले उत्क्रांतीच्या दिशेने मानवी प्रवासात. गत ३० लाख वर्षात मूळच्या मेंदूवर (Reptilian brain) एका नव्या मेंदूचा साज चढला. तोच मोठा, १३०० मि. ली. आकाराचा, १३०० ग्रॅम वजनाचा मानवी मेंदू, ज्याला वैज्ञानिक Neo cortex म्हणजेच नवमेंदू असे संबोधतात. अत्यंत प्रगत विचारप्रणाली, अफाट संवेदनक्षमता, प्रचंड प्रक्रियाक्षमता व जबरदस्त स्मरणशक्ती या सर्वांच्या एकत्रित परिणामाने माणसास 'भान' ही पृथ्वीवरील एक विलक्षण सर्वश्रेष्ठ क्षमता प्राप्त झालीय. याच्याच मदतीने माणसाने या विश्वात विचारधन, साहित्य, काव्य, संगीत, नाट्य, चित्रकला, शिल्पकला, बोलणे (वक्तृत्त्व), अभिनय, क्रीडा, स्मरण, प्रतिसाद, उच्च प्रेरणा या मानवी क्षमतांचे अनेक आविष्कार निर्माण केले. आणि समजा, निर्माण करता आल्या नाहीत (एका आयुष्यात शक्य नाही ते फक्त इटालियन मायकेल अँजेलो यासच जमले) तरी इतरांनी निर्माण केलेल्या या मानवनिर्मित वैभवाचा आस्वाद मात्र आपण आपल्या अत्यंत प्रगल्भ नवमेंदूच्या (Neo cortex)च्या मदतीने घेऊन आपले सिमित छोटे आयुष्य कारणी लावू शकतो; आयुष्याचा स्तर प्राणीपातळीवरून मनुष्यपातळीवर नेऊन 'माणूस' म्हणवून घेण्यास लायक ठरतो.

माणसाच्या नवमेंदूक्षमतेस साजेसे सारे काही जास्तीत जास्त (सगळेच नव्हे हे नम्रपणे सांगतो) मिळण्याचे ठिकाण म्हणजे माझे आवडते तळेगाव दाभाडे. निसर्गाने दिलेल्या पाऊस, वारा, हिरवाई, चढउताराच्या टेकड्या, निर्मळ पाणी, खळाळते झरे (फक्त पावसाळ्यातच) या अपूर्व देणगींबरोबरच गेल्या अर्धशतकात मूळच्या तळेगाव दाभाडेच्या पूर्वसुरींनी व बाहेरून, पुणे-मुंबईहून आलेल्या जीवनाभिमुख, कलासक्त मंडळींनी निर्माण केलेले साहित्य, संगीत,

नाट्य, नृत्य, चित्रकला, वक्तृत्त्व, संवाद, लेखन, काव्य यामुळे मला तर गत १५ वर्षात तळेगाव यक्षनगरीच वाटली. कारण जागेपणीच स्वप्नवत वाटावेत अशा असंख्य प्रसंगांची मालिकाच मी येथे अनुभवली. माझे जगणे एक काव्यखंडच होऊन गेले ते या विविधांगी जीवनानुभवामुळे. माणसाच्या मनाची सर्वांगीण उन्नती करणाऱ्या असंख्य गोष्टींमुळे मला येथे खूपदा गुदमरून जावे अशा श्रेणीचे आनंदाचे क्षण हजारोंच्या संख्येने अनुभवता आले. माझ्या या स्वप्नवत वाटणाऱ्या जगण्याचे शिल्पकार मला तळेगावला अनायसे व सहज लाभले.

श्री. संदीप संघवी हा तरुण मला २००६ जानेवारीत भेटला आणि माझे अनोळखी, सामान्य जीवन एकदम अंधारातून उजेडात आले. या उत्साही, निसर्गप्रेमी, कष्टाळू, प्रामाणिक तरुणाने माझ्या सारख्या सेवानिवृत्तास एखाद्या नवोदितास करावे तसे साह्य केले. त्यानेच मला तळेगाव दाभाडेचे विलोभनीय दर्शन विविध उपक्रमातून घडविले.

सौ. नयना रविंद्र आभाळे या विलक्षण उत्साही, समंजस, स्नेहमयी तरुणीने नोव्हेबर २००७मध्ये मला निसर्गसंवर्धनाच्या तिच्या आवडत्या माध्यमातून निसर्गाचे, की मानवी समुहांचे सम्यक दर्शन घडविले स्वतः पडद्याआड राहून माझेसाठी असंख्य संधींची मालिकाच निर्माण केली, मावळ, खेड, दौंड, हवेली तालुक्यातून माझा संचार घडवित.

त्यानंतर मी जरासा धीट झाल्यावर, सभेत बोलू लागल्यानंतर मला भेटले एक लोकोत्तर व्यक्तित्त्व डॉ. अनंत शंकर परांजपे! स्वतः अत्यंत उच्च श्रेणीचे कलाकार, निष्णात डॉक्टर, तळेगाव दाभाडेत ५० वर्षाचा अनुभव घेऊन कार्यरत असणाऱ्या एका निःस्वार्थी माणसाने माझ्यासाठी परत अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. परिसाचा स्पर्शच काय केवळ सहवासही पुरे या वैश्विक सत्याधारे मला तळेगाव दाभाडेत खूप काही अनुभवता आले ते डॉ. परांजपेंमुळे!

माझ्या Neo cortexला पुरेपूर खाद्य सतत, सर्व बाजूंनी सदैव

मिळत गेले ते या श्री. संदीप संघवी, सौ. नयना आभाळे व डॉ. अ. शं. परांजपे या त्रैमूर्तीच्या उदारमनस्क स्वभावामुळे.

त्यात अनेक संस्थांच्या जाळ्यात मी गुरफटत गेलो तो मुख्यतः उपभोक्ता, श्रोता, गृहणशील म्हणून आणि मग तळेगावला मला जाणवले या मानवनिर्मित जीवनास उन्नत, उदात्त, उत्तम करणाऱ्या कला, साहित्य, संगीत, काव्य, वक्तृत्त्व इत्यादी आविष्कारांनी मला खूप समृद्ध केले, ज्यामुळे मी 'माणूस' म्हणून अधिक संपन्न होत आहे. याचे सर्वाधिक श्रेय मी नंतर भेटलेल्या व दीर्घकाळ सोबत करणाऱ्या सर्वव्यापी डॉ. अ. शं. परांजपेंना देतो. ते हे श्रेय कदापि स्वीकारणार नाहीत. पण ते प्रामाणिकपणे मनःपूर्वक देणे माझे माणूस म्हणून कर्तव्य आहे. त्या भावनेतूनच मी 'ध्यासपुरूष' हे पुस्तक लिहायला घेतले.

'ध्यासपुरूष' हा शब्द मला अमोल पालेकरांच्या 'ध्यासपर्व' या चित्रपटशीर्षकावरून सुचला. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्यावर एक अप्रतिम कलात्मक चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक अमोल पालेकरांनी मोठ्या ध्येयासक्तीने निर्माण केला. त्यात ध्यासपर्व = महर्षी धोंडो केशव कर्वेंचे जीवन हे समीकरण मला भावले. एका विलक्षण ध्यासाने प्रेरित होऊन – विधवा, दुर्दैवी महिलांचे जीवन सुसह्य, समृद्ध करावे म्हणून शतकोत्तर जगणाऱ्या महर्षी कर्वेंचे जगणे म्हणजेच ध्यास! म्हणून त्यांच्या आयुष्यात – जीवनपर्वास – ध्यासपर्व म्हणणे मला फार काव्यमय वाटले.

त्यातील 'ध्यास' हा शब्द ४४ वर्षे सलग 'कलापिनी'च्या कार्यास वापरणाऱ्या डॉ. परांजपेंच्यासाठी वापरणे म्हणजे त्या शब्दाचा सर्वोत्तम उपयोग आहे. खऱ्या अर्थाने डॉ. अ. शं. परांजपेंचे जीवन हा एक विलक्षण ध्यासच आहे.

मी यापूर्वी एक पुस्तक माझे शाळेविषयी, तेथील समर्पित मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, व्यवस्थापन यांचेविषयी लिहून ते 'ध्यासपर्व' म्हणून प्रकाशितही केले, माझ्या मुलीने – सौ. योगिता पाटील अवधानी हिने. परत तेच शीर्षक नको म्हणून मी वेगळे शीर्षक

निवडावे हा विचार करताना, डॉ. अ. शं. परांजपेंचे व्यक्तिमत्त्व माझेसमोर झंकारले. एखाद्या रोमन योद्ध्याप्रमाणे उंची, शरीरयष्टी, वर्ण, नाक, डोळे, कपाळ, आवाज लाभलेल्या डॉ. परांजपेंमध्ये 'पुरुषार्थ' ठासून भरल्याचे मनाने मान्य केले म्हणून या पुस्तकाचे नाव अगोदर निश्चित केले 'ध्यासपुरूष'. म्हणून मग ते शीर्षकच मला ओळी मागून ओळी लिहिण्यास प्रेरणा देऊ लागले.

मी अख्खे पुस्तकच डॉ. अ. शं. परांजपेंवर लिहून सर्वाधिक अन्याय कुणावर केला असेल तर तो डॉ. सौ. अश्विनी अनंत परांजपे या गुणी, सोशिक, सात्विक डॉक्टर व्यक्तिवर! त्या खालोखाल त्यांचा सुपुत्र आषुतोष, स्नुषा सौ. विनया, कन्या डॉ. सौ. अनुपमा, जावई संदीप, भगिनी सौ. अंजली कऱ्हाडकर, बंधू अरविंद परांजपे, भाची कु. शिवानी यांचेवर. खरंतर माझ्या मर्यादा लक्षात घेऊन, ज्यांची लेखणी तळेगाव दाभाडेत तळपते अशा कुणीही सद्‌वृत्ती लेखकाने त्यांचेवर लिहावे.

लेखन आवडले तर माझा लेखनविषय योग्य ठरेल, नाहीतर माझे कौशल्य नसल्याचे मी मनःपूर्वक मान्य करीन. 'ध्यासपुरूष' लेखनास (परस्पर) परवानगी दिल्याबद्दल श्री. अरविंद परांजपेंचा जन्मभर ऋणी राहीन.

– शिरीष अवधानी

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १३ |
| १ | फक्त स्वप्ननगरीच नव्हे, कलानगरीही | १५ |
| २ | डॉ. अ. शं. परांजपेंची जगण्याची उच्च प्रेरणा | १९ |
| ३ | कसलेला ‘कमांडर-इन-चीफ’ | २३ |
| ४ | हाडाचा ‘कार्यकर्ता’ | २७ |
| ५ | सर्वसामान्यांचा ‘परिस’ | ३२ |
| ६ | अ. शं.चे ‘झपाटलेपण’ | ३७ |
| ७ | परोपकाराय इदं शरीरम् | ४१ |
| ८ | ......तया यातना कठीण | ४७ |
| ९ | एक घोंगावणारे वादळ | ५१ |
| १० | बालभवनः भविष्याची पायाभरणी | ५५ |
| ११ | कलामंडळः ‘अनंत’ ध्येयासक्ती | ६० |
| १२ | कालदर्शिकाः वर्षाचं भरगच्च आश्वासन | ६६ |
| १३ | चिरा चिरा तो घडवावा | ७० |
| १४ | मुलाखतीः एक शब्दोत्सव | ७३ |
| १५ | डॉ. अ. शं.ची सम्यकवृत्ती | ७५ |
| १६ | सकलजन मैत्र | ८१ |
| १७ | एका घराची गोष्ट | ८३ |

# प्रस्तावना

एखाद्या गावाचे मोठेपण ठरविण्यासाठी त्या गावात विद्वान व्यक्ती, कलावंत, साहित्यिक, कवी, संगीतकार, नाट्यकर्मी, चित्रकार, विचारवंत नागरिक किती आहेत याचा विचार इंग्लंडसारख्या देशात सर्वप्रथम केला जातो आणि मग त्या विद्वान, प्रतिभावंत व्यक्तिमत्त्वाला भेटण्यासाठी जगभरातील रसिकांची रीघ लागते. आपल्या देशात हे चित्र जेव्हा केव्हा येईल तेव्हा येईल, पण पुणे जिल्ह्यातल्या तळेगाव दाभाडे या छोट्या गावात गेली पन्नास-साठ वर्षे बऱ्याच जणांची वर्दळ विठ्ठलमंदिराच्या आसपास असते. तिथे पूर्वी नाट्यप्रेमी कै. डॉ. शंकर वासुदेव परांजपे हे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व राहात होते.

नेमकं त्याच काळात महाराष्ट्रातील एक प्रतिभावंत साहित्यिक, इतिहासप्रेमी, वैकुंठवासी गोपाळ नीलकंठ दांडेकर ऊर्फ 'गोनीदा'सुद्धा याच तळेगावात राहून महाराष्ट्रभर आपली लेखणी गाजवत होते. मधल्या काळात डॉ. शं. वा. परांजपे यांचं अकाली निधन झालं. त्यामुळे सहाजिकच तळेगावातील त्यांच्या सांस्कृतिक वारशाची धुरा त्यांचे चिरंजीव डॉ. अनंत शंकर परांजपे यांच्या खांद्यावर येऊन पडली. विशेषतः वडीलांच्या वैद्यकीय सेवेची जबाबदारी आणि त्यांच्या नाट्यप्रेमाची कसर भरून काढण्यासाठी डॉ. अ. शं. परांजपे विशेषत्वाने कार्यरत झाले. शं. वा. परांजपेंची ही गादी सलगपणे, सातत्याने गेली त्रेचाळीस वर्षं अ. शं. परांजपे आज जुलै २०२० अखेर तळेगावातल्या विठ्ठल मंदिराच्या परिसरात समर्थपणे चालवीत आहेत. म्हणूनच तर तळेगावातील आणि बाहेरगावातीलही अनेक रसिकजनांची पावलं विठ्ठलमंदिर परिसरात नेहमी रेंगाळत असल्याचे दिसून येते.

गो. नी. दांडेकरांनी त्या काळात मोठ्या रसिकतेने डॉ. शं. वा. परांजपेंच्या नाट्यसंस्थेचे नामकरण तळेगावातल्या दत्त मंदिरातील एका हृद्य आणि संस्मरणीय कार्यक्रमात 'कलापिनी' असे केले होते. देवासच्या कुमार गंधर्वांच्या कन्येचे नाव 'कलापिनी'. हेच नाव

तळेगावातील एका नवोदित नाट्यसंस्थेने धारण केले.

डॉ. शं. वा. परांजपेंच्या पश्चात त्रेचाळीस वर्षं या संस्थेस आपलं सर्वस्व अर्पण केलं डॉ. अनंत परांजपेंनी. ते दिलेर आहेत; कलासक्त आहेत. हरहुन्नरीही आहेत. चौफेर कर्तृत्त्वाची गुणसंपदा असलेल्या आणि मेहनती स्वभावाच्या डॉ. अनंत परांजपेंनी 'कलापिनी'ला सातासमुद्रापलिकडे घेऊन जाण्याचे दुर्दम्य स्वप्न पाहिले. इतकेच नव्हे तर आत्यंतिक ध्यासाने त्यांनी ते स्वप्न प्रत्यक्षात उतरविले सुद्धा!

या प्रदीर्घ तपस्येची कहाणी शब्दांत मांडण्याचा एक छोटासा प्रयत्न मी करीत आहे. 'ध्यासपुरूष' या व्यक्तित्त्व परिचयात्मक पुस्तिकेच्या माध्यमातून. हा काही चरित्रग्रंथ नाहीये. ध्येयासक्त अशा एका मनस्वी माणसाचे ते एक स्वैरचित्रण आहे. एका उदात्त ध्यासाने प्रेरित होऊन आपले तन, मन, धन यापैकी कशाचीही पर्वा न करता आपल्या आयुष्यातील ४३ वर्षं त्या ध्येयाप्रत समर्पित करणाऱ्या एका आगळ्यावेगळ्या नाट्यवेड्या कलावंताचे रेखाचित्र म्हणा फार तर! या पुस्तिकेतला 'ध्यासपुरूष' म्हणजेच डॉ. अनंत शंकर परांजपे.

माझी मनोमन खात्री आहे की माझ्या मर्यादांचे भान ठेवून मी रेखाटलेले हे व्यक्तिचित्र, हे शब्दचित्र, हे रेखाचित्र तुम्हाला नक्की आवडेल.

– शिरीष अवधानी

तळेगाव दाभाडे (जि. पुणे)
दिनांकः

# फक्त स्वप्ननगरीच नव्हे, कलानगरीही

तळेगावातील लोकसंख्येची रचना आणि प्रकार वैशिष्ट्यपूर्ण आहे. ती थोडीशी 'डेमोग्राफिकल' आहे.

मुंबईत घरांच्या बांधकामास योग्य अशी जमीन – म्हणजेच – रिकामे प्लॉटस् – खूपच महाग झाल्याने आणि त्याचबरोबर 'सेकंड होम' ही संकल्पना मुंबईसारख्या महानगरांमध्ये वेगाने उदयास आल्याने तळेगाव–दाभाडे हे मुंबईकरांचे आवडते destination झाले. मुंबईतील आर्थिक कमाई आणि बचत यांच्या तुलनेने तळेगाव दाभाडेमध्ये स्वतः चे घर बांधण्यास योग्य अशी जागा विकत घेणे किंवा बांधलेली घरे, फ्लॅटस् विकत घेणे मुंबईकरांना सहज परवडू लागले. तळेगावची हवा आल्हाददायक तर होतीच, शिवाय तळेगावचं दळणवळण मुंबईशी उत्तमरित्या जोडलं गेलं असल्यानं इ. स. १९८१ नंतर हळूहळू मुंबईकर तळेगाव दाभाडेकडे वळू लागले. त्यातच ठाण्याच्या मा. श्री. चंद्रकांत भिडे या रसिक बांधकाम व्यावसायिकांनी मुंबईतल्या मंडळींना तळेगाव दाभाडेमध्ये आणण्यास प्रारंभ केला.

पुढे इ.स. २००५ पासून MIDC व नियोजित चाकण विमानतळाच्या आसपासच्या जागेतील आर्थिक गुंतवणूक चांगला परतावा देईल या अपेक्षेने डोंबिवली, ठाणे, मुलुंड, विलेपार्ले इथली खूपशी मंडळी 'तळेगावकर' झाली. मग मात्र मोठ्या झपाट्याने अनेक सोसायट्या, टाऊनशिप्स्, कॉलनीज, बंगले, गृहनिर्माणसंस्था तळेगावात उभारल्या गेल्या आणि बघताबघता तळेगाव दाभाडेची Skylineच बदलून गेली!

हा झाला वरवरचा बदल, पण त्यामुळे इतके दिवस सुस्तीत पहुडलेल्या, ऐतिहासिक तळेगावदाभाडे या शांत, थंड, निवांत गावाचा मूडच बदलू लागला. इ.स. १९८० पासून पुढे मुंबईहून तळेगावात आलेल्या मंडळींमध्ये रसिक, सर्जक मनाची, चळवळी वृत्तीची, कलासक्त आणि हरहुन्नरी मंडळी भरपूर होती. Performing

Artistsमधील काही तरबेज मंडळींमुळे कला, साहित्य, नाट्य, संवाद अशा क्षेत्रांमधील अनेकविध उपक्रमांची संख्या तळेगावात वाढली. काही प्रसिद्धीप्रवण चतुर मंडळीही या प्रवाहात सामील झाली आणि एकूणच तळेगावचा सांस्कृतिक निर्देशांक लक्षणीयदृष्ट्या उंचावला.

या सकारात्मक बदलाचा फायदा तळेगावला तर झालाच, पण त्याचबरोबर तळेगावातल्या 'कलापिनी' या नाट्यसंस्थेसही उदंड कलाकार, रसिक श्रोतृवृंद आणि जाणकार प्रेक्षक, रसज्ञ लेखकही अनायासे लाभले.

१० एप्रिल १९७७ रोजी स्थापन झालेल्या 'कलापिनी'ने तळेगावात तयार झालेल्या या सांस्कृतिक वातावरणाचा कमाल फायदा घेतला. त्यातच डॉ. अनंत परांजपेंसारखे चतुरस्र नेतृत्व 'कलापिनी'स लाभल्याने 'कलापिनी'चा रथ चौफेर दौडू लागला. 'कलापिनी'तील जुन्या–जाणत्या आणि नव्या दमाच्या कलावंतांनी तळेगावच्या या नव्याने बदललेल्या डेमोग्राफिकल लोकसंख्या रचनेचा फायदा घेतला नसता तरच नवल! आत्तापर्यंत केवळ नाट्यप्रयोगच करणारी 'कलापिनी' आता मोठ्या झपाट्याने कलेच्या सर्व बाजूंनी बहरली, फुलली, अगदी वसंतातल्या बहाव्यासारखी!

अशा या बहरलेल्या 'कलापिनी'कडून प्रेरणा घेत हळूहळू अन्य काही संस्था तळेगाव दाभाडेत निर्माण झाल्या. त्या संस्था आपापल्या दृष्टीकोनानुसार इथले समाजजीवन समृद्ध करू लागल्या. तिकडे 'कलापिनी'स दृष्ट लागावी असे भव्य यश अन् उत्तुंग लोकप्रियता मिळू लागली होती. ते पाहून आणखीन काही कलासंस्था काहींनी निर्माण केल्या. संस्था चालविण्यासाठी आर्थिक पाठबळ कुठून, कसे, केव्हा मिळवायचे याचे व्यावहारिक ज्ञान असणाऱ्यांनी 'कलापिनी'च्या धर्तीवर काहीतरी भव्य दिव्य करायचे प्रयत्न सुरू केले. त्यांना यशही मिळाले. माणसं, कलावंत, प्रशंसक, प्रायोजकही मिळत गेले. परंतु समर्पण, निस्वार्थीपणा, अस्सल कलाज्ञान, विविध कलाशाखांमधील पारंगतता, कलेसाठी आपलं सर्वस्व देऊन गाठावयाची कलासाधनेची

उंची, प्रेक्षकांशी असलेली बांधिलकी, इ. बाबतीत काही संस्था 'कलापिनी'पेक्षा थोड्या मागे राहिल्या. 'कलापिनी'ची वाटचाल मात्र गेली चव्वेचाळीस वर्षं दिमाखाने होत राहिली, तीही स्वबळावर! स्वकष्टांवर!!

परिणामतः काही संस्था केवळ Event पुरत्याच झगमगाट करीत कार्यरत होताना दिसू लागल्या. काही हेतूलक्षी मंडळी सर्वच संस्थांमध्ये दिसू लागली. तळपू लागली. नकळत 'कलापिनी'स स्पर्धक निर्माण झाल्याची हवा निर्माण केली गेली. त्यामुळे 'निर्वेध' अशा 'कलापिनी'स तथाकथित स्पर्धेत टिकण्यासाठी अधिक कसदार, अधिक टिकावू प्रयत्न करावे लागले.

नेमकं याच आव्हानात्मक काळात डॉ. अनंत परांजपे यांच्यासारखा सव्यसाची, कसलेला, समर्पित वृत्तीचा, सर्वांशी जुळवून घेणारा, निःस्वार्थी नेता लाभल्याने 'कलापिनी'साठी आपलं सर्वस्व ओतणारी आणखीन एक नव्या दमाची फळी भक्कमपणे उभी राहिली. 'कलापिनी'च्या या बिनीच्या शिलेदारांपैकींची ही काही नावं, डॉ. भरतकुमार शुक्ल, श्री. विनायक अभ्यंकर, सौ. निरुपमा कानिटकर, कै. विद्याधर दाते, सौ. संपदा थिटे, सौ. मीनल कुलकर्णी, श्री. रामचंद्र रानडे, श्री. अशोक बकरे, श्री. रविंद्र पांढरे, श्री. श्रीपाद बुरसे, सौ. अंजली सहस्रबुद्धे, श्रीमती शर्मिला शहा, श्री. इनामदार, श्री. जयवंत इ. अशी अजून कितीतरी!

समर्पण वृत्तीनं काम करणारी ही खरीखुरी कार्यकर्ता मंडळी, आपल्या कामानं 'कलापिनी' अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी झटू लागली. पाठोपाठ अगदी तरुण, नुकत्याच उमललेल्या युवकयुवतींची आणखीन एक उगवती पण भक्कम फळी स्वतः होऊन पुढे येऊन काही जबाबदाऱ्या पार पाडू लागली. यामुळे 'कलापिनी'चा डोलारा उंचावला तरी डळमळीत झाला नाही हे तिचं भाग्य आणि हेच तिचं यश सुद्धा!! अगदी मोट्ठं यश!!!

बालभवन, कुमारभवन, हास्ययोग मंडळ, स्वास्थ्ययोग मंडळ,

नाट्यवाचन, नाट्यअभिवाचन, बालनाट्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, मातीकाम स्पर्धा, नृत्यस्पर्धा, दिवाळी पहाट, वर्षान्त कार्यक्रम, दिनदर्शिका या अशा विविधांगी उपक्रमांच्या माध्यमातून 'कलापिनी'चा कलाप्रवास आजही निरंतरपणे चालूच राहिला आहे.

चाळीस वर्षांपूर्वी मुंबई, डोंबिवली, ठाणे, मुलुंड, विलेपार्लेमधील चाकरमान्यांना 'आपलं स्वतःचं घर असावं' या स्वप्नपूर्तीसाठी तळेगाव दाभाडेचे आकर्षण वाटले खरे, पण बघता बघता या 'स्वप्ननगरी'चं रूपांतर एका छानशा 'कलानगरी'त कधी झालं ते तळेगावकरांना कळलं नाही!

१० वर्षांपूर्वी डी. जे. उर्फ कर्कश्श संगीताने मिरवणुकींना ठळकपणा देणाऱ्या वाहनांचा सुळसुळाट तळेगाव परिसरात होऊन ध्वनीप्रदुषणाचे उच्चांकी वास्तव सर्वांनाच त्रस्त करणारे होते. तळेगावच्या अनेक स्त्री पुरुषांनी, स्थानिक साप्ताहिकांनी त्याविरुद्ध युद्ध पुकारले होते. ही डी.जे. यंत्रणा राजकीय वरद हस्तामुळे व स्थानिक पुढाऱ्यांच्या सुप्त पाठींब्याने कुणालाही जुमानत नव्हती. बेलगाम, बेमुर्वतखोर वृत्तीने चालूच होती. पण डॉ. अ. शं. परांजपेंनी एकदा 'कलापिनीत' सर्व डी.जे. विरोधी कार्यकर्ते, वार्ताहर, स्थानिक राजकीय पुढारी, डीजे. चालक यांची संयुक्त सभा मोठ्या धैर्याने पुढाकार घेऊन आयोजित केली. शाब्दिक खडाजंगी, अरेरावीची भाषा यामुळे सभा वादळी होऊ लागली. पण डॉ. परांजपेंनी मोठ्या धैर्याने, चातुर्याने सभा डी.जे. विरोधी ठरावासह पूर्णत्वास नेली. सर्वजणांनी चहापानानंतर एकमताने डी. जे.स विरोधही केला.

डॉ. अ. शं. परांजपे यांचे डी.जे. विरोधातले योगदान श्रेष्ठ, समंजस व परिपक्व नेतृत्वाचे एक छान उदाहरण आहे.

# डॉ. अ. शं. परांजपेंची जगण्याची उच्च प्रेरणा

'माणूस का जगतो' या प्रश्नाचे वैज्ञानिक उत्तर डॉ. मॅस्लो या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मनोवैज्ञानिक शास्त्रज्ञाच्या एका सिद्धान्तात सापडते. त्याच्या म्हणण्यानुसार अत्यंत सामान्य पातळीवर अन्न, वस्त्र, कामवासना अशा प्राथमिक स्तरावरील प्रेरणांच्या पूर्ततेसाठी माणूस जगतो. या गोष्टी मिळत राहाव्यात यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो.

डॉ. मॅस्लो यांच्या मते माणसाची या पुढील जगण्याची प्रेरणा 'सुरक्षितता प्राप्त करणे' ही असते.

त्याहीपेक्षा वरिष्ठ पातळीवरील प्रेरणा म्हणजे सामाजिक, आर्थिक प्रतिष्ठा निर्माण करण्याची प्रबळ भावना माणसाच्या जगण्याची प्रेरणा बनते. या पातळीवर 'इतरांनी आपल्याला मान द्यावा, आदर द्यावा' अशी भावना माणसाला जगण्यासाठीची प्रेरणा देत असते. प्रसिद्धी, कीर्ती, सत्ता, मानमरातब यासाठी अशी माणसं प्रचंड मेहनत घेताना दिसतात. समाजातील बहुसंख्य माणसं या उंचीपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील असतात आणि त्यातली काही माणसं ही उंची गाठतात सुद्धा. आपल्या अवतीभवती अशी माणसं असतातही!

पण डॉ. मॅस्लो यांच्या मते समाजात फार फार थोडीच माणसं 'सेल्फ ॲक्चुअलायझेशन' या प्रेरणेने प्रेरित होऊन काम करत असतात. म्हणजे असे की या अत्यंत दुर्मिळ श्रेणीच्या व्यक्तींना सत्ता, संपत्ती, मानमरातब, प्रसिद्धी, कीर्ती या प्रेरणा, जीवन जगण्यासाठी फारशा महत्त्वाच्या वाटतच नाहीत; तर आपल्या 'स्वतःच्या क्षमतांचा परमोच्च विकास साधणे' हीच प्रेरणा त्यांना त्यांचं जीवन जगण्यासाठी कार्यरत ठेवत असते. जणू काही 'आपण कोण आहोत आणि आपल्या अस्तित्वाचे प्रयोजन नेमके काय आहे' याचा आत्मसाक्षात्कारच त्यांना झालेला असतो. थोडक्यात, त्यांना आत्मानुभूती किंवा आत्मप्रचिती आलेली असते.

हे इतकं सगळं मी यासाठी सांगितलंय की, डॉ. मॅस्लो यांच्या या सिद्धान्ताच्या पार्श्वभूमीवर डॉ. अनंत परांजपेंच्या जीवनाकडे पाहिले तर ते सेल्फ ॲक्चुअलायझेशन याच प्रेरणेने काम करतात असे जाणवते. 'आपल्यातील क्षमतांचा परमोच्च विकास साधणे' हेच सुप्त ध्येय त्यांच्या जगण्यामागे असल्याचे लक्षात येते आपल्या.

या संदर्भात रविवार दिनांक २७ ऑक्टोबर २०१९चा 'दिवाळी पहाट' हा 'कलापिनी'चा कार्यक्रम मी कायम माझ्या स्मरणात ठेवेन, ते डॉ. अ. शं. परांजपेंच्या अत्युच्च दर्जाच्या निवेदन शैलीमुळे! तो पूर्ण कार्यक्रम श्रेष्ठ संगीतप्रेमी संगीतकार कै. पंडित शरद जोशींच्या स्मरणार्थ वाहिलेला होता. मुळात ही कल्पनाच मुळी डॉ. अ. शं. परांजपे यांच्या अत्युच्च मनाची साक्ष देते.

डॉ. परांजपेंनी त्या तीन तासांच्या कार्यक्रमात कै. पंडित शरद जोशींचे सम्यक, संपूर्ण, सर्वस्पर्शी दर्शन आपल्या सकस आणि संपन्न भाषाशैलीत तर घडविलेच पण त्याचबरोबर पं. शरद जोशींच्या व्यक्तिमत्त्वाची असाधारण उंचीही श्रोत्यांच्या नजरेस आणून दिली. त्याचवेळी डॉ. परांजपेंनी पंडित शरद जोशींच्या प्रत्यक्ष जीवनप्रवासातील काही भावपूर्ण प्रसंग, आठवणी, घडामोडींचे सादरीकरण 'कलापिनी'च्या नव्या जुन्या गुणी कलावंतांच्या माध्यामातून मोठ्या ताकदीने केले होते.

'आपण कशासाठी जगायचं' याविषयी डॉ. अ. शं. परांजपेंच्या व्यक्तिमत्त्वात मुरलेली 'स्वतःमधील क्षमतांच्या परमोच्च आविष्कारासाठी जगायचं' (सेल्फ ॲक्चुअलायझेशन) ही प्रेरणा मला त्या दिवशीच्या त्या दिवाळी पहाट या कार्यक्रमात क्षणोक्षणी जाणवत होती. डॉ. मॅस्लोचा तो सिद्धान्त त्यावेळी डॉ. अ. शं. परांजपेंच्या कुशल निवेदनाच्या माध्यमातून अक्षरशः प्रत्यक्षात साकारलेला मी अनुभवत होतो. ही अशी उच्च दर्जाची जीवनप्रेरणा फारच थोड्या लोकांना खुणावते. डॉ. परांजपे अशाच काही दुर्मिळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक व्यक्तिमत्त्व! कै. पंडित शरद जोशींसारख्या

एका दिवंगत संगीतकाराच्या (आणि तसं म्हटलं तर थोड्या उपेक्षितच) व्यक्तिमत्त्वाचे रसरशीत दर्शन नृत्य, नाट्य, निवेदन यातून घडविणे ही कृतीच डॉ. परांजपेंच्या अत्युच्च जीवनप्रेरणांची साक्ष होती. २७ ऑक्टोबर २०१९च्या त्या अविस्मरणीय रविवारी–दिवाळी पहाट– या कार्यक्रमात त्या अत्युच्च जीवनप्रेरणेची प्रचिती माझ्यासह इतर अनेक मनस्वी, रसिक श्रोत्यांनी अनुभवली हे आमचे मोठे भाग्यच! माझ्या दृष्टीने डॉ. अ. शं. परांजपेंच्या धवलशुभ्र जीवनप्रेरणांचा लख्ख परिचय त्यादिवशी मला घडला आणि खरंच सांगतो मी खूपखूप आनंदित झालो, धन्यधन्य झालो!

असे बहारदार अनुभव तळेगावच्या नागरिकांनी अनेकदा 'कलापिनी'च्या रंगमंचावर घेतले आहेत, जेव्हा जेव्हा डॉ. परांजपे कार्यक्रमाचे निवेदक म्हणून उभे राहतात तेव्हा तेव्हा. तळेगाव दाभाडे मधील माझ्या पंधरा वर्षांच्या छोट्याश्या मुक्कामातील एक कळसाध्याय म्हणजे इ.स. २०१९ची ती रम्य दिवाळी पहाट! डॉ. परांजपेंच्या अत्युत्तम निवेदन शैलीतून प्रकटणारा पं. शरद जोशींविषयीचा आदर, स्नेहभाव, गुणगौरव आणि डॉक्टरांनी त्यातून घडविलेले दिवंगत शरद जोशींचे व्यक्तित्त्वदर्शन म्हणजे 'माणसानं जगावं कशासाठी' याचा एक उत्तम वस्तुपाठच होता.

डॉ. विजया मेहतांसारख्या महान कलावंत–नाट्यकर्मीच्या गौरवार्थ 'विजयाबाई आणि आपण' अक्षरशः सलग तीन दिवस साजरा करून एक अविस्मरणीय कार्यक्रम डॉ. परांजपेंनी घडवून आणला. त्याद्वारे एखाद्या सर्वोत्तम कलाकाराचा गुणगौरव किती शानदारपणे करावा याचा जणू काही एक मानदंडच 'कलापिनी'ने निर्माण केला. त्या गौरव समारंभातील प्रत्येक शब्द, दृष्य, नाद, नाट्य, संवाद, प्रकटन याद्वारे त्यांनी डॉ. विजया मेहतांसारख्या कलाकाराचे नेत्रदीपक दर्शन तळेगावकरांना घडविले.

असाच आणखीन एक प्रसंग. सुप्रसिद्ध चित्रपटनाट्य अभिनेते डॉ. श्रीकांत मोघे यांचा सत्कार समारंभ. 'कलापिनी'चं व्यासपीठ.

रसिक तळेगावकर श्रोते आणि कार्यक्रमाचे निवेदक – सूत्रसंचालक डॉ. अ. शं. परांजपे! त्या कार्यक्रमात श्रीकांत मोघे खूपच खुलले, बोलले, सर्वार्थाने प्रकटले, सर्वांगाने व्यक्त झाले. 'कलापिनी'त आल्याने त्यांना झालेला प्रचंड आनंद ते लपवू शकत नव्हते. त्यांची खुशी, त्यांचा उत्साह ओसंडून जात होता. मराठी नाट्यचित्रसृष्टीतील श्रीकांत मोघेंसारखा दिग्गज कलाकार त्या दिवशी ज्यांनी ज्यांनी पाहिला, ऐकला, अनुभवला ते सारे 'भाग्यवान!' आपल्या रसाळ निवेदनाने त्या कार्यक्रमाचा दर्जा आणि गुणवत्ता एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवणारे डॉ. परांजपे तो कार्यक्रम संपल्यानंतर काय करत होते? सांगतो. तिकडे स्टेजवर युवकयुवतींच्या घोळक्यात श्रीकांत मोघे अनौपचारिकपणे हितगूज करत होते आणि डॉ. परांजपे प्रेक्षागृहातील खुर्च्या, सतरंज्या, गाद्या आवरत होते, आपल्या स्वयंसेवकांना घेऊन! ते एक दुर्मिळातलं दुर्मिळ दृष्य होतं, जे मीच काय पण अन्य कितीतरी सजग अन् सहृदय श्रोते पाहात होते, अनुभवत होते!

असे अनेक अनेक छोटेमोठे क्षण सांगून जातात डॉ. परांजपेंच्या जगण्याच्या प्रेरणा नेमक्या आहेत तरी कोणत्या ते. खरंतर त्यांचं वागणं अन् बोलणं साधं, सरळ, स्पष्ट अन् स्वच्छ असतं. त्या वागण्याबोलण्यात दिखावा, फुलोरा, नाटकीपणा नसतो; मात्र त्यांनी कुणाचं तरी केलेलं मनःपूर्वक शब्दपूजन असतं ते! गंमत म्हणजे मोठमोठ्या दिग्गज कलाकारांनाही ही शब्दपूजा असीम आनंद बहाल करत असते. ऐन तारुण्यात ताराचंद मेडिकल कॉलेजमध्ये शिकत असल्यापासून डॉ. परांजपे आपल्या मनोहर वागण्याबोलण्यातून अगणित लोकांना आपलंसं करीत आले आहेत.

थोडक्यात काय, तर डॉ. मॅस्लोंच्या जीवनप्रेरणांच्या उतरंडीत (पिरॅमिड) सर्वात वरचे स्थान Self actualisation ला, म्हणजेच स्वतःच्या क्षमता पूर्णतः व्यक्त करणे याला आहे आणि माझ्या मते डॉ. अ. शं. परांजपे याच सर्वोच्च जीवनविषयक प्रेरणेने प्रेरित होऊन जगत आहेत, दर क्षणी! दर दिवशी!!

# कसलेला ‘कमांडर–इन–चीफ’

मनावैज्ञानिकदृष्ट्या लोकांसमोर ‘प्रकटणे’, ‘व्यक्त होणे’, ही मानवाची सर्वोच्च गरज असते. ‘प्रकटून’ किंवा ‘व्यक्त होऊन’ माणेस एक असीम आनंद अनुभवत असतो. त्याचे हे व्यक्त होणे जर अनेक रसिकांच्या उपस्थितीत, त्यांच्या साक्षीने झाले तर तो आनंदाची अत्युच्च उंची गाठतो. स्वर्गीय सुख प्राप्त होते त्याला त्या क्षणी. रसिकांनी अगदी अचूक वेळी दिलेल्या टाळ्यांच्या प्रतिसादाने तर तो कलावंत क़तक़त्य होतो, धन्यधन्य होतो. त्या क्षणी तो आणखीन ‘घडतो’, ‘उंचावतो’, ‘संपन्न’ होतो.

मानवी मनास हा असा भरभरून, असीम आनंद देणाऱ्या घटना ‘कलापिनी’त गेल्या ४४ वर्षांमध्ये असंख्य वेळा घडल्या आहेत. वेळोवेळी घडल्या आहेत, पुन्हापुन्हा घडल्या आहेत. अर्थातच याचे श्रेय सर्वात आधी ‘कलापिनी’ या अजस्त्र यंत्रणेस जाते. त्यानंतर ‘कलापिनी’चे व्यवस्थापक मंडळ, पदाधिकारी, संयोजक, कार्यकर्ते, रंगकर्मी, प्रेक्षक, ‘कलापिनी’चे शुभेच्छुक या सर्वांना जाते.

पण या साऱ्या आवळ्या–भोपळ्याची मोट बांधणारा कुणीतरी एक जण असतो. तो या सर्व घटकांना त्या त्या योग्य वेळी योग्य त्या प्रमाणात कार्यरत ठेवत असतो. हे भान हेच खरंतर ‘कलापिनी’च्या यशाचं रहस्य आहे. हे भान ठेवणारे डॉ. अ. शं. परांजपे प्रत्येक वेळी निःस्वार्थीपणे, निर्लेप वृत्तीने, शुद्ध हेतूने धडपडत असतात. म्हणूनच तर ‘कलापिनी’स एक उदृष्य शक्ती सदैव मिळत असते.

‘कलापिनी’च्या माध्यमातून शेकडो – अक्षरशः शेकडो – संवेदनशील व्यक्तींना ‘प्रकटण्याची’, ‘व्यक्त होण्याची’ संधी मिळाली आहे. ही संधी त्यांना डॉ. अ. शं. परांजपे यांच्या उदारमनस्क वृत्तीमुळे मिळाली आहे. तळेगावातील होतकरू, उभरत्या कलाकारांमधील टॅलेंट शोधणारे, शोधलेल्या टॅलेंटला योग्य वेळी व्यासपीठ देणारे, त्या उदयोन्मुख कलाकारांचे भरभरून कौतुक करणारे डॉ. अ. शं.

परांजपे म्हणूनच तर इतरांपेक्षा वेगळे ठरतात. तळेगावातील असंख्य कलाकारांच्या मनात 'माझ्यात इतरांपेक्षा वेगळं असं काहीतरी आहे', 'मी काहीतरी वेगळं करू शकतो' ही एक जबरदस्त प्रेरणा निर्माण करणारे डॉ. परांजपे हे खरोखरीच एकमेवाद्वितीय वाटतात ते यामुळेच. गंमत म्हणजे डॉक्टर हे सगळं अगदी सहजगत्या घडवून आणतात. तीन–चार वर्षांच्या बालकांपासून ते थेट जीवनाच्या शेवटच्या टप्प्यातील ज्येष्ठ व्यक्तींपर्यंत सर्वांना जगण्यासाठी, उत्कट आनंदासाठी सतत प्रेरणा देत असतात, संधी देत असतात. मात्र असे हे डॉ. परांजपे कोणत्याही समारंभात श्रेयापासून कायमच दूर राहतात. अशावेळी ते नेमके अन्य कुठल्यातरी कामात स्वतःला गुंतवून घेतात, 'मा फलेषु कदाचन' या वृत्तीने! 'कलापिनी'च्या कार्यक्रमाचे वेळी 'कलापिनी'चे पदाधिकारी, कलावंत यांना व्यासपीठ कसे मिळेल, व्यासपीठावर त्यांची आब कशी राखली जाईल याबाबत डॉ. परांजपे विलक्षण दक्ष असतात; मात्र कार्यक्रमाच्या नेमक्या 'झगमगाटा'च्या क्षणी ते केव्हा, कुठे, कसे गायब होतात हा खरंतर संशोधनाचाच विषय!

त्यांच्या मनाचा हा मोठेपणा आता त्यांचा सहज–स्वभावच बनून गेलाय. एखाद्या कमलदलाप्रमाणे (पाण्यात राहूनही ओलं होण्यापासून दूर राहण्याचा गुण) प्रसिद्धीच्या वातावरणात राहूनही तिच्यापासून दूर राहण्याचा त्यांचा सद्गुण मला प्रकर्षाने जाणवल्यामुळेच हे 'ध्यासपुरुष' नावाचं छोटंसं व्यक्तित्वदर्शन मी शब्दबद्ध करतो आहे. स्वतःबरोबरच इतरांच्याही उत्कर्षात, विकासात, जडणघडणीत आकंठ बुडालेला एक सदैव कार्यरत माणूस म्हणून मी त्यांना सदैव माझ्या आदरस्थानी ठेवतो. स्वतःपलीकडे पाहण्याची एक सुंदर मनोहारी भावना एखाद्या फुलातील सुगंधाप्रमाणे त्यांच्यात सदैव विद्यमान असते आणि 'कलापिनी'च्या प्रत्येक कार्यक्रमात याच त्यांच्या भावनेचं प्रकट रूप अनेकांनी पाहिलंय, अनुभवलंय. खरंतर डॉ. परांजपे 'कलापिनी'ची कामधेनू आहे! कल्पवृक्ष म्हणा हवं तर!

'कलापिनी'त काम करणारे पूर्वीही खूपजण होते, आजही

आहेत, यापुढेही ते असतीलच, शंकाच नाही. 'कलापिनी'च्या प्रत्येक समारंभाच्यावेळी अतिशय निःस्वार्थीपणे पडतील ती सर्व लहानमोठी कामं बिनबोभाटपणे करणाऱ्या हाडाच्या कार्यकर्त्यांची एक फळी सदोदित कार्यमग्न दिसते. त्यात लहान मुलंमुली, युवक–युवती, मध्यमवयीन स्त्री–पुरुष, ज्येष्ठ नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक असे सगळे जण असतात. ही सर्व मंडळी जेव्हा अगदी मनापासून कामं करताना दिसतात तेव्हा मला खरंच खूपखूप विस्मय वाटतो. मी चकित होतो. आज सर्वत्र 'श्रेयासाठीच सारं काही' हीच जीवनप्रेरणा दिसत असताना 'कलापिनी'मध्ये मात्र श्रेयाकडे पाठ फिरवून, निरलसपणे झटणारे 'खरेखुरे' कार्यकर्ते कुठून, कसे व का येतात हाही पुन्हा एकदा संशोधनाचाच विषय!

मात्र मी केलेल्या निरीक्षणाअंती मला तरी असं वाटतं की याला कारणीभूत आहे 'कलापिनी'तील ज्येष्ठ कार्यकर्त्यांची एक अशी फळी जी अंतःप्रेरणेनं सदैव कार्यरत असते आणि मग तिच्याच पावलावर पाऊल टाकत इतर कार्यकर्ते वाटचाल करत असतात. पण मग असाही प्रश्न पडतो की ही 'अंतःप्रेरणा' येते तरी कुठून? कुठून होतो तिचा उगम? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी तुमच्याकडे हवी चौफेर नजर आणि दुसऱ्याचं मोठेपण खुलेपणानं मान्य करण्याचा मनाचा मोठेपणा. तो जर असेल तर डोळसपणानं मान्य करण्याचा मनाचा मोठेपणा. तो जर असेल तर डोळसपणानं पाहिल्यावर चटकन लक्षात येईल की डॉ. अ. शं. परांजपे रणांगणावरील एखाद्या कसलेल्या 'कमांडर' प्रमाणे युद्धभूमीवर तळपत असतात. त्यांचा तो युद्धभूमीवरील संचारच अनेकांना आपोआपच प्रेरित करतो आणि मग एका व्यक्तीच्या प्रभावाने दुसरी व्यक्ती, दुसऱ्या व्यक्तीच्या प्रभावाने तिसरी, मग चौथी, पाचवी.....! ही अशी स्वयंप्रेरित कार्यकर्त्यांची साखळी आपोआपच विस्तारत जाते. त्यामुळे कित्येकदा निष्क्रीय, नाखुश, नाराज व्यक्तीही नैतिक दडपणाखाली छोट्यामोठ्या कामात स्वतःला गुंतवून घेतात. तुम्ही कधीही 'कलापिनी'च्या कोणत्याही कार्यक्रमाला जा, तुम्हाला

हाच परिणाम ‘कलापिनी’त प्रत्येकवेळी अनुभवायास मिळेल!

‘कलापिनी’च्या प्रत्येक यशस्वी कार्यक्रमानंतर जर आपण तटस्थ आणि समतोल विचार केला आणि अर्थातच त्याला सूक्ष्म निरीक्षणाची जोड दिली तर लक्षात येतं की मनापासून काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला डॉ. परांजपे स्वतः फारसं न बोलता आपल्या कृतीतूनच कामं करण्याची प्रेरणा देत असतात. ‘कलापिनी’च्या कार्यक्रमांचं यश डॉ. परांजपे अनुसरत असलेल्या ‘केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे’ या महामंत्रात दडलंय!

डॉ. अ. शं. परांजपेंना कर्नाटकच्या अस्मितेचा मानबिंदू ठरलेल्या बेळगावी (पूर्वीचे बेळगाव) येथील मराठी प्रेमींनी खास आमंत्रण दिले. त्यांचा अनोखा कार्यक्रम ‘जय हो’ हा श्री गुलजार या विख्यात चित्रपट निर्मता, दिग्दर्शक, कवी वर बेतलेला कार्यक्रम करण्यासाठी.

त्यांनी त्या मराठी समुदायास एक अभूतपूर्व अनुभव दिला. प्रथम त्यांनी सभा प्रारंभ दीप प्रज्ज्वलनाने करण्यासाठी सर्वांना हात जोडून उभे राहण्याची सूचना खणखणीत, पहाडी आवाजात व हुकुमतीत दिली. त्यापूर्वी पायातील पादत्राणे काढून ठेवण्याची सूचना केली. हात जोडून प्रार्थना म्हणण्याची सूचना केली. स्वत: पहाडी आवाजात पण स्वर तालात प्रार्थना म्हणायला सुरुवात केली, हात जोडून आणि डोळे मिटून तत्क्षणी साऱ्या प्रेक्षकांनी तंतोतंत अनुकरण करून एका सुरात प्रार्थना म्हटली. या सामुदायिक कृतीने सारेच भारावले गेले. प्रार्थना संपताच मंत्रमुग्ध झालेले प्रेक्षक सारेच्या सारे डॉ. अ. शं. परांजपेंचे आधीन झाले. हा मंत्रमुग्ध करणारा (Mesmeric experience) बेळगावीच्या प्रेक्षकांना फारच भावला आणि स्मरणात राहिला. बेळगाव सारख्या परराज्यातील प्रेक्षकांचे नेतृत्व क्षणात हातात घेऊन त्यांना प्रार्थनेतून एक मानसिक, भावनिक उंचीवर नेण्याचे विलक्षण कसब हे डॉ. अ. शं. परांजपेंचे बलस्थान तेथील सर्वांना एक चिरस्मरणीय अनुभव देऊन गेले.

# हाडाचा 'कार्यकर्ता'



डॉ. परांजपे अनंत शंकर, BAMS, MBBS, LCPS, असे वैद्यकीय विद्याविभूषित जनरल प्रॅक्टीशन म्हणून तळेगावात सर्वपरिचित आहेत. समान व्यवसायी असूनही तळेगावातील अन्य बहुतेक सर्व डॉक्टरांशी त्यांचे संबंध उत्तम आहेत.

त्यांचे रुग्णनिदान कौशल्य चांगले आहे. ते योग्य ती ट्रिटमेंट देतात रुग्णाला, आवश्यक ती औषधेही लिहून देतात, माफक फी घेतात. पण त्याही पुढे जाऊन रुग्णाशी संवाद साधताना ते विलक्षण असा 'प्लासिबो इफेक्ट'ही घडवून आणतात. प्लासिबो इफेक्ट म्हणजे केवळ प्रेमाने, आस्थेने, आपुलकीने आणि रुग्णाला आश्वस्त करण्याच्या ताकदीतून रुग्ण बरा करण्याची किमया. ही किमया अनुभवी आणि संवेदनशील मनाचे डॉक्टर लीलया घडवू शकतात. डॉ. अ. शं. परांजपेंना हे प्लासिबो इफेक्टचे तंत्र चांगलेच गवसले आहे. अर्थात त्या मागे मानवी स्वभावाचा गेल्या चाळीस–पंचेचाळीस वर्षांचा प्रदीर्घ अभ्यास आहे आणि त्या सोबतच सखोल वैद्यकीय ज्ञान आहे, रुग्णसेवेचा प्रचंड अनुभव आहे.

ते सदैव प्रसन्न असतात. हसतमुख असतात. उर्जावंत असतात. त्यामुळे रुग्णाला तपासण्यापूर्वीच त्यांच्या या चैतन्यमयी वागण्यानं रुग्णावर एक विलक्षण अशी सकारात्मक छाप पडते. बोलण्यात हजरजबाबी, संवादात विनोदाची पखरण. त्यामुळं हास्याचा खळखळाट. मोजक्याच शब्दात अनोळखी व्यक्तीशी स्नेह निर्माण करण्याची हातोटी. या सगळ्या निर्मळ वातावरणामुळे त्यांच्याशी झालेल्या पहिल्या भेटीतच 'आता मी इथे नक्कीच बरा होईन' अशी

आशादायक जाणीव रुग्णात निर्माण होते. हाच तो प्लासिबो इफेक्ट!

अनंत परांजपे एक उत्तम डॉक्टर तर आहेतच पण तरीसुद्धा अनेकदा दिवसातील बराचसा वेळ ते 'कलापिनी'साठी देतात. अन्य डॉक्टर्सप्रमाणे ते फक्त 'डॉक्टरी एके डॉक्टरी' करत बसले असते आणि या व्यवसायासाठीच म्हणून 'आवश्यक' त्या गोष्टी केल्या असत्या तर आत्तापर्यंत बरीच मोठी आर्थिक संपदा त्यांनी गोळा केली असती. कारण तेवढा व्यावसायिक भारदस्तपणा आणि कौशल्य त्यांच्यापाशी भरपूर आहे. पण त्यांनी तसं केलं नाही. कारण?

कारण डॉ. अनंत परांजपेंचा सर्वात श्रेष्ठ मानवी गुण म्हणजे त्यांच्या मनात असलेले अन्यजणांविषयीचे निखळ प्रेम. त्या प्रचंड प्रेमापोटीच तर ते 'कलापिनी'च्या डझनभर उपक्रमांच्या माध्यमातून इतरांना 'प्रकटण्याची', 'व्यक्त होण्याची', 'संवाद साधण्याची', 'स्वतः ला सिद्ध करण्याची' संधी सदोदित देत असतात. आपल्या बरोबर इतरांनाही 'घडण्याची' सुसंधी प्रसंगी मार्गदर्शन, बऱ्याचदा कौतुक, क्वचित 'शब्दांचा' मार सुद्धा ते देत असतात. म्हणूनच तर छोट्या छोट्या मुलामुलींपासून ते वृद्ध ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना प्रकटण्याची संधी देणारे डॉ. परांजपे खरोखरीच महान आहेत.

खरं तर आपल्या समोरचा माणूस नेमका कसा आहे हे बरोबर ओळखणं तसं फार कठीण असतं. कारण माणसांचा खरा चेहरा आणि त्यावरचा मुखवटा दोन्ही अनेकदा वेगवेगळं असू शकतं. 'आपण जसे नाही आहोत तसे आपण आहोत असं दाखविण्याची केविलवाणी धडपड करणारे लोक अनेक असतात आपल्या अवतीभवती. स्वतः च्या प्रसिद्धीसाठी सर्व वैध आणि अवैध मार्ग हाताळणारे तथाकथित पदाधिकारी सार्वजनिक जीवनात भरपूर दिसतात आपल्याला. मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधून आपलं नाव, आपलं काम, आपली छायाचित्रं छापून आणण्यासाठी भलेभले लोक ज्या युक्त्या करतात, जी सलगी, मैत्री दाखवतात, जे समर्पण (?) आणि संभाषण करतात ते पाहून 'आपणही प्रसिद्ध व्हावे, चारचौघांसमोर सतत दिसत राहावे'

अशी अनिवार इच्छा इतर खूप जणांना आवरत नाही. मात्र......

मात्र डॉ. अनंत परांजपे याला ठसठशीत अपवाद आहेत. अशा 'चमको'गिरी पासून ते सहस्र योजने दूर असतात. एखादी कलाकृती, एखादी उत्कट घटना घडवून आणण्यातच त्यांना विलक्षण रस असतो. त्या घटनांच्या Press value कडे त्यांचे यत्किंचितही लक्ष नसते. तसे तर 'कलापिनी' सोडून ते इतर समारंभात फारसे दिसत नाहीतच. कारण त्यासाठी त्यांना वेळच मिळत नाही. त्यातूनही ते अशा एखाद्या अन्य समारंभाला गेलेच तर तिथली आपली भूमिका पार पाडून ते अलगदपणे त्या सभास्थानातून नाहीसे होतात! अन्यथा.....

अन्यथा सभास्थानी आपली सर्व कौशल्ये, चपळता, ओळखी वापरून प्रकट होणारे, फोटोजेनिक दिसण्याचे सर्व प्रयत्न करणारे, त्यासाठी ग्रुप फोटोत जाणीवपूर्वक मोक्याच्या जागी उभं राहणारे, नंतर तो फोटो कुठंतरी छापून आणण्याचा गृहपाठ धावपळ करून पूर्ण करणारे 'चमको'वीर असतातच की ठायीठायी! अशा जगात अशा समाजात डॉ. अनंत परांजपेंसारखं आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व म्हणूनच तर ठळकपणे लक्ष वेधून घेतं. प्रसिद्धीपासून अलिप्त राहण्याच्या त्यांच्या या वैशिष्ट्यामुळेच तर त्यांच्यावर पुस्तक लिहिण्याची अनिवार इच्छा होते.

आणखीन एक प्रबळ कारण आहे त्यांच्याविषयी आवर्जून लिहिण्याचे ते म्हणजे........

डॉ. अनंत परांजपेंची पत्नी डॉ. सौ. अश्विनी परांजपे, बंधू श्री. अरविंद, मुलगा आशुतोष, मुलगी अनुपमा, बहीण सौ. अंजली कराडकर, भाची कु. शिवानी यांना सभासमारंभात लाईम–लाईटमध्ये आणणे सहज शक्य असूनही डॉ. अनंत परांजपे तसे कधीही करत नाहीत! खरंतर ते सर्वजण गुणी आहेत, 'कलापिनी'साठी झटणारे आहेत, तरीही समारंभांमध्ये ही मंडळी कुठेही ठळकपणे वावरत नसतात आणि फोटोसेशनमध्ये तर नसतातच नसतात. डॉ. अनंत परांजपेंनी जपलेलं हे नैतिक मूल्य मला लाखमोलांचं वाटतं, कौतुकास्पद वाटतं.

सतत दिवसाच्या चोवीस तासांमधील बराच काळ, आठवड्यातील बरेच दिवस, महिन्यातील बरेच आठवडे आणि आयुष्यातील बरीच वर्षे एकाच कार्यात स्वतःला आकंठ गुंतवून घेणं आणि त्यासाठी 'कलापिनी'सारख्या संस्थेच्या उत्कर्षाच्या ध्यासाने अक्षरशः पछाडून जाणं ही काही सामान्य बाब आहे असं मला मुळीच वाटत नाही. हे अद्भूत आहे, अतुलनीय आहे, अचाट आहे, अफाट आहे! त्या ध्यासातूनच नाट्य, नृत्य, वक्तृत्त्व, लेखन, चित्रकला, संवाद, हास्ययोग, स्वास्थ्ययोग इ. द्वारे मानवी मनास सदैव संजीवनी देणाऱ्या, 'कलापिनी'च्या कलाशाखेसह इतर सर्वच शाखा बहरण्यासाठी दोन वेळा हार्ट ॲटॅक येऊनही स्वतःच्या शरीरस्वास्थ्याचीही फिकीर न करणारे डॉ. अनंत परांजपे यांना म्हणूनच 'ध्यासपुरुष' या शब्दांनीच गौरवावे असं मला अगदी मनापासून वाटतं. कारण.....

एखाद्याला चव्वेचाळीस वर्ष एकाच कामात बांधून ठेवण्यासाठी केवळ त्याचा छंद, त्याची आवड, त्याची कौशल्ये किंवा त्याची आग्रही वृत्ती पुरेशी नसते. त्यासाठी 'ध्यास' हाच एकमेव शब्द आहे मराठी शब्दकोशात!

फर्ग्युसन कॉलेजचे भौतिकशास्त्राचे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक श्री. भालबा केळकरांची प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक्स असोसिएशन, तिच्यातून वेगळं होऊन बाहेर पडलेल्या डॉ. जब्बार पटेलांची थिएटर ॲकॅडेमी ही संस्था, 'श्यामची आई' मधील श्यामची भूमिका करणाऱ्या प्रा. माधव वझे यांची 'जागर' ही संस्था आणि तळेगाव दाभाडे मधील 'कलापिनी' ही संस्था, या चार संस्थांचा एकत्रित विचार तटस्थ आणि वस्तुनिष्ठपणे केला तर 'कलापिनी'चे सलग ४४ वर्षांचे सतत वाढत्या श्रेणीतील कार्य कलेच्या सर्वच अंगांना स्पर्श करणारे आहे हे लक्षात येते. आता हेच पाहा नं......

नाट्य, नृत्य, नाट्यवाचन, एकपात्री प्रयोग, चित्रकला, मूर्तीकला, अध्यात्म, साहित्य, काव्य, नाट्यशिबीरे, संगीतस्पर्धा, दिनदर्शिकेच्या माध्यमातून वर्षभराच्या २०० कार्यक्रमांचे भक्कम

आणि परिपूर्ण नियोजन, दिवाळी पहाट, गौरव समारंभ अशा मानवी मनास समृद्ध करणाऱ्या भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यामातून 'कलापिनी' आजही ग्रामीण भागातल्या शेकडो लोकांना एकत्र बांधून ठेवत आहे! म्हणूनच मला 'कलापिनी' इतर संस्थांच्या तुलनेने अग्रेसर वाटते.

याचे श्रेय अर्थातच 'कलापिनी'च्या संस्थापकांपासून ते थेट आजच्या नवोदित कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांनाच दिले पाहिजे यात शंकाच नाही. तथापि त्यातही अग्रस्थानी असेल डॉ. परांजपेंची 'ध्यास' ही प्रवृत्ती! म्हणूनच मी त्यांचा उल्लेख पुन्हा पुन्हा 'ध्यास पुरूष' या शब्दात करू इच्छितो.

डॉ. अनंत शंकर परांजपेंच्या या अखंड चव्वेचाळीस वर्षांच्या 'ध्यासपर्वाला' मानाचा मुजरा!

**डॉ. अ. श. परांजपेंविषयी काही हृद्य प्रतिक्रिया**

'कलापिनी यशस्वीततेचा आत्मा - डॉ. आनंद'

**- भरतकुमार शुक्ल,**

'डॉ. अनंत परांजपे हे तळेगावला लाभलेले आभुषण आहे. स्वतः च्या एका जन्मात अनंत कलागुण अनेकांत शोधून अनेकांचे आयुष्य त्यांनी उजळून टाकले. मात्र स्वतः कशाचीही अपेक्षा ठेवली नाही. त्यांचे वर्णन करण्यासाठी शब्द अपूरे आहेत.'

**- मधुकर रामचंद्र बासरकर,**
९५६१५३५४१६

'तळेगाव दाभाडेस ललामभूत ठरावे असे असामान्य व्यक्तिमत्त्व -डॉ. अ. शं. परांजपे'

**- डॉ. श्रीकांत जातेगावकर,**
९८५०९९०८३८

'तळेगावातील कलाकारांचे व कलावंतांचे स्फूर्तीस्थान म्हणजे कलापिनी व डॉ. परांजपे'

**- साकेत राजे,**
९१५८९५७३६३

# सर्वसामान्यांचा 'परीस'

डॉ. अ. शं. परांजपेंच्या व्यक्तिमत्त्वात एक जादुई गुण आहे. ते इतरांमधील गुणवत्ता तात्काळ ओळखतात. त्या गुणवत्तेला उजळवून टाकण्यासाठी शक्यतो सर्व प्रयत्न करीत राहतात, तेही संपूर्ण निरपेक्ष वृत्तीनं! 'कलापिनी'च्या माध्यमातून गेली कित्येक वर्षं अनेकांनी आपली गुणवत्ता इतरांसमोर आणण्यासाठी संधी शोधली. विशेषतः नाट्य, अभिनय, दिग्दर्शन, लेखन, प्रकाश योजना, ध्वनी योजना, रंगभूषा, वेषभूषा, रंगमंच सजावट, नाट्यवाचन, गायन, वादन, वक्तृत्त्व, सूत्रसंचालन, पाठांतर, नृत्य, नृत्य दिग्दर्शन इ. अनेकविध क्षेत्रांमध्ये अनेकांनी आपली गुणवत्ता रसिक प्रेक्षकांसमोर प्रदर्शित करण्याचे प्रयत्न केले.

या शेकडो हौशी कलावंतांमधील काही ठळक आणि भविष्यात आणखी उंच श्रेणीचे, उच्च्च दर्जाचे कलाप्रदर्शन करू शकतील अशा मेहनती प्रतिभावंतांना डॉ. परांजपेंनी अचूक हेरले. ते त्यांच्या मागे लागले. प्रसंगी त्यांना घाईगर्दी केली. बऱ्याचदा त्यांचे जाहीर कौतुकही केले. तशीच वेळ आली तर त्यांची (खाजगीत) कानउघाडणीही केली! पण......

पण मग त्यातूनच एकापेक्षा एक चांगल्या कलाकारांची जडणघडण झाली. ते कलाकार मोठे झाले, एवढे मोठे की 'कलापिनी'चे अंगण त्यांना कमी पडू लागलं. त्यामुळे त्यांनी बाहेरच्या जगात झेप घेतली. नव्या संधींचा शोध घेतला. स्वतःला आणखीन जास्त उंचावले. विशेष म्हणजे डॉ. परांजपेंनी योग्य वेळी याही कलाकारांना परत 'कलापिनी'त सन्मानाने आमंत्रित केले. तेही आले. त्यांची वर्धिष्णु झालेली गुणवत्ता पुन्हा एकदा तळेगावकरांसमोर प्रकट करण्याची त्यांना संधीही दिली. खरंच डॉ. परांजपेंच्या दिलदार वृत्तीला तोड नाही. त्यामुळेच तर कलाकार निर्मितीचा हा ओघ कधीच आटला नाही. उलट त्याला नवनवीन धुमारे फुटत राहिले.

अशाच काही चमकदार प्रतिभावंत कलाकारांपैकी एक नाव, सौ. विनया केसकर. त्या मुख्यतः सूत्रसंचालिका. रसिकांना त्यांचं सूत्रसंचालनकौशल्य आवडलं, भावलं, पसंत पडलं. पुढे त्या लेखनाकडे वळल्या. इथेही त्यांनी आपली चुणूक दाखवली. आपलं पहिलं पुस्तक त्यांनी तळेगावातील धडपड्या, गुणी, प्रभावी कलाकारांवर लिहिलं. पण त्या इथंच थांबल्या नाहीत. नाट्यवाचन, अभिनय, गायन या कलांमध्येही प्राविण्य मिळविण्याची एक जबर इच्छा त्यांच्या मनात घर करून होती. त्यासाठी त्यांनी पुरेसे प्रयत्नही केले. पुढे त्या प्राध्यापिका झाल्या, इतकेच नव्हे तर आपल्या विषयात डॉक्टरेट मिळवून त्या, 'डॉ. विनया केसकर पीएच. डी.' झाल्या! एकामागोमाग एक अशा वरच्या पायऱ्या गाठत डॉ. विनया केसकरांच्या रूपानं एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व समाजात आलं. हे घडलं 'कलापिनी'च्या आश्रयानं आणि डॉ. परांजपेंच्या आग्रहानं!

श्रीधर कुलकर्णी. एक शालेय विद्यार्थी. त्याच्या गुणवत्तेची भुरळ डॉ. परांजपेंना पडली. त्यांनी श्रीधरच्या मागे ससेमिराच लावला. मग काय, पाहता पाहता एक श्रेष्ठ दिग्दर्शक आणि कलाकार म्हणून, निर्माता म्हणून श्रीधर जगापुढं आला आणि त्यानं रसिक प्रेक्षकांची मनं जिंकली. पुणे विद्यापीठातून तो उच्चविद्याविभूषितही झाला. डॉ. परांजपेंची शोधक वृत्ती आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा याचेच हे फलित होय.

शरयू बापट. एक चुणचुणीत मुलगी. 'कलापिनी'त येणाऱ्या इतर शेकडो मुलींपैकीच एक. तिची 'कथनशैली' डॉ. परांजपेंच्या दृष्टीस पडली. हळूहळू 'कलापिनी'त तिच्या या कौशल्याला वाव मिळू लागला. तिनेही या कलेत परंगत होण्यासाठी धडपड केली. प्रयत्न केले. आपल्या या धडपडीला तिनं उच्च शिक्षणाची जोड दिली. पुढे तिनं नेत्रदीपक प्रगती केली. 'निवेदिका' म्हणून तिनं मानाचं पान मिळवलं.

शरयूचा भाऊ पराग. पराग बापट. त्यानं तर मोठीच झेप

घेतली. नाट्य, अभिनय, दिग्दर्शन या क्षेत्रांमध्ये त्यानं थेट पुण्यासारख्या महानगरीत स्वतःचं असं एक खास स्थान निर्माण केलं आहे. शरयू आणि पराग हे दोघेही 'कलापिनी'च्या मांडवाखालूनच गेलेले कलावंत आहेत, आज ते कीर्तीवंत झाले आहेत.

खरंच, 'कलापिनी'च्या पंखांखाली 'काहीतरी करण्याची', 'जे केले ते रसिकांसमोर सादर करण्याची', 'जे केले त्याला समाजाची पोचपावती मिळविण्याची' आणि हे सारं करत असताना 'एखाद्या शिल्पाप्रमाणं स्वतःचं व्यक्तिमत्त्व घडविण्याची' ही प्रक्रिया तळेगावातील नवोदितांना, प्रतिभावंतांना, सर्जनशील व्यक्तिंना बरंच काही देऊन जाते!

सौ. संपदा थिटे. दर्जेदार कलावंत. गायिका. गायनातील त्यांचं कौशल्य रसिकमान्य झालं आहे. कारण सुरुवातीच्या कलाप्रवासात त्यांनी 'कलापिनी'च्या प्रभाव क्षेत्रात आपलं गानकौशल्य सादर केलं. पुढे त्यांनी स्वबळावर, मेहनतपूर्वक तळेगावबाहेरच्या विशाल कलाविश्वात मोठ्या धैर्याने पाऊल ठेवलं. हा एक मोठाच टर्निंग पॉईंट ठरला त्यांच्यासाठी. पुण्यातील एक सुप्रसिद्ध गायिका म्हणून आता त्या मोठ्या सन्मानानं ओळखल्या जातात. दै. लोकमत या वृत्तपत्राने सौ. संपदा थिटे यांच्यावर एक खास पुरवणीच महाराष्ट्राला सादर केली आहे. 'सौ. संपदा थिटे यांनी आपली गानकला रसिकांसमोर सातत्याने सादर केली पाहिजे' या डॉ. अ. शं. परांजपे यांच्या आग्रही भूमिकेमुळे आणि त्या भूमिकेचा त्यांनी सातत्याने अथक पाठपुरावा केल्यामुळे तळेगावला घडलेले एक कलारत्न म्हणजे सौ. संपदा थिटे.

श्री. मोहन कुंटे. नाट्यरसिक. कसलेले उत्तम नट. अभिनयाची सखोल जाण. दिग्दर्शकही. गंमत म्हणजे 'कलापिनी'त येण्यापूर्वीच त्यांनी मध्यप्रदेशात यशाची अनेक शिखरे गाठली होती. डॉ. परांजपेंनी या गुणी कलाकाराचा पुरेपूर उपयोग करून घेतला. कुंटेंना त्यांनी खूप संधी दिली. 'कलापिनी'च्या मंचावर सादर केल्या गेलेल्या एकाहून एक श्रेष्ठ नाट्यकृतींमुळे श्री. मोहन कुंटेंना नाट्यरसिकांच्या

हृदयात एक अढळपद मिळाले. तळेगावातलं त्यांचं स्थान 'एक उत्तम कलावंत' म्हणून भक्कम झालं. श्री. मोहन कुंटेंकडील प्रतिभेचा अफाट पसारा 'कलापिनी'च्या कलादालनात विस्ताराने मांडला गेला तो डॉ. परांजपेंच्या धडपडीमुळे. आधी मोहन कुंटेंसाठी आणि त्यांच्या पाठोपाठ 'कलापिनी'तील इतर अनेकानेक नवोदित कलाकारांसाठी 'कलापिनी' हे एक उत्कृष्ट आणि आदर्श प्रेरणास्थान झालं. मोहन कुंटे नावाच्या एका बाहेरून आलेल्या कलाकाराच्या गुणसंपदेचा नेमका, नेटका उपयोग करून घेतला आणि डॉ. परांजपेंनी त्याद्वारे 'कलापिनी'च्या काप्रवासातील एक छानसा मैलाचा दगड – Mile stone गाठला!

श्री. केदार अभ्यंकर हेही तसे मूलतः कलाकारच. पण त्यांनी स्वतःच ध्वनीमुद्रण, ध्वनीक्षेपण यात पराकोटीचा रस घेतला. तशातच डॉ. परांजपेंनी त्यांना तसे करण्यास वारेमाप संधी दिली. त्यामुळे आता कलापिनीचे बहुतेक सर्वच कार्यक्रम आणि विशेषतः 'कलामंडळा'चे कार्यक्रम अत्यंत दर्जेदार आणि अत्याधुनिक ध्वनीयंत्रणेवर सादर केले जातात. त्यामुळे कार्यक्रमाचा शब्दन्‌शब्द, स्वरन्‌स्वर रसिकांना सुखावून जातो. गेल्या दहा वर्षांपासून तळेगावच्या बाहेरील ध्वनीयंत्रणा सांभाळणाऱ्यांना मागे टाकून श्री. अभ्यंकर आपल्या उत्कृष्ट ध्वनीयंत्रणातंत्राने तळेगावातील कितीतरी कार्यक्रम उंचावू लागले आहेत. इतकेच नव्हे तर 'कलापिनी'शिवाय अन्य संस्थांचेही दर्जेदार कार्यक्रम श्री. अभ्यंकरच सांभाळताना दिसू लागले आहेत. एक उत्कृष्ट ध्वनीयंत्रणातज्ज्ञ निर्माण केल्याबद्दल डॉ. परांजपेंना किती धन्यवाद द्यावेत! किती श्रेय द्यावे!

हे सारं डॉ. परांजपे करीत असतात कारण त्यांच्या मेंदूत व मनातही 'कलापिनी'चाच विस्तार सतत पिंगा घालत असतो.

स्वतःला सोडून दुसऱ्याला पुढे नेण्यासाठी आणि त्याची उंची अधिकाधिक उंचावण्यासाठी अगोदर आपण स्वतःच उन्नत, बुलंद असावं लागतं. डॉ. परांजपे तसे आहेत; जणू सर्वसामान्यांचे परीसच!

आणखीन एक गोष्ट त्यांच्याविषयीची. त्यांना 'वाणी' (म्हणजे बोलणं) या मानवी शक्तीचे 'स्वामी'च म्हटलं पाहिजे. 'स्वामी' म्हणजे देव; 'स्वामी' म्हणजे श्रेष्ठत्त्व. खरोखरीच त्यांचं बोलणं श्रेष्ठ दर्जाचेच असते.

आणि आता तिसरी महत्त्वाची गोष्ट, डॉ. परांजपेंबद्दलचीच. दुसऱ्याला उन्नत होताना पाहाण्यासाठी आपलं स्वतःचं मन विशाल असावं लागतं. हाताच्या बोटांवर मोजता येतील अशा फारच थोड्यांकडे असणारी ही दुर्मिळ गुणसंपदा डॉ. परांजपेंकडे आहे आणि म्हणूनच त्यांना 'दुर्मिळातलं दुर्मिळ व्यक्तिमत्त्व' मानावेच लागेल.

**डॉ. अ. श. परांजपेंविषयी काही हृद्य प्रतिक्रिया**

'डॉ. अनंत परांजपे – तळेगावला समृद्ध करणारे निकोप समाजजीवन निर्माण करणारे उपक्रमशील व्यक्तिमत्त्व. रंगभूमीचा मिळालेला संपन्न वारसा नित्य वृद्धिंगत करण्याचा हा मूर्तीमंत ध्यासच म्हणता येईल'

– **विद्या विद्वांस,**
७७७५९७८६४२

'तळेगाव दाभाडे येथील कलापिनी संस्थेसाठी अविरत झटणारे श्री. अनंत परांजपे यांचे नाट्यगृह बांधण्यासाठीच्या प्रयत्नांना लवकरच यश येवो'

– **शशांक ओगले,**
९९२२९२४९४१

'बहुआयामी, बहुपेढी, बहुश्रुत – डॉ. अनंतशंकर परांजपे! माझे दीर्घकालीन सहयोगी म्हणून मला अभिमान वाटतो.'

– **रामचंद्र रानडे,**
९२२६३७०२८१

# अ. शं.चे ‘झपाटलेपण’

इंग्रजीत एक छान म्हण आहे, Success has many fathers but failure is an orphan. म्हणजे यशाला खूप जनक असतात पण अपयश मात्र निराधार असतं. या म्हणीचा अनुभव समाजसेवी सर्वच संस्थांना अधूनमधून येत असतो. ‘कलापिनी’ही त्याला अपवाद नाही. कारण तिचा कार्यक्रमांचा पसाराच प्रचंड आहे. कधी ना कधी तरी एखादी त्रुटी, एखादी कमतरता राहून जाणारच ना! आता हेच बघा नं........

‘कलापिनी’ वर्षभरात साधारणपणे २०० कार्यक्रम करते. आता इतके कार्यक्रम करायचे म्हटले की केवढी प्रचंड पूर्वतयारी करावी लागत असेल? खूपच. त्यातच ‘कलापिनी’त कामे करण्यासाठी पगार देऊन माणसं नियुक्त केली नाहीत. तिचा सगळा डोलारा संपूर्ण वर्षभर तिचे स्वयंसेवकच सांभाळतात आणि हे असं गेली ४४ वर्षं होत आलं आहे, नॉन स्टॉप! ‘कलापिनी’त शेकडो स्वयंसेवक सातत्याने राबत असतात. म्हणूनच तर ‘कलापिनी’ आजचं वैभव अनुभवते आहे.

आज एकूणच समाजात लष्कराच्या भाकरी भाजण्याची वृत्ती कमीकमी होत चालली आहे. काही काही संस्थांमध्ये तर ही ‘स्वयंसेवकगिरी’ जवळ जवळ शून्यच असते. कारण? कारण आर्थिकदृष्ट्या भरभक्कम प्रायोजक! ते एकदा मिळाले की सगळ्याच्या सगळ्या गोष्टी पैसे टाकून हव्या तश्या करून घेता येतात. पण.....

पण वर्षातून एकदा वा दोनदा करायच्या कार्यक्रमांना हे शक्य होऊ शकतं. मात्र वर्षातून २०० कार्यक्रम करणं, तेही तुटपुंज्या वार्षिक अनुदानावर आणि वर्गणीच्या बळावर कसं जमणार? नेमकी इथेच स्वयंसेवकांची, स्वयंस्फूर्तपणे काम करणाऱ्यांची गरज निर्माण होते. कुठून आणायचे असे स्वयंसेवक? मुळात डॉ. परांजपेच बहुतेक सर्व कार्यक्रमात कित्येक कामे मोठ्या लगबगीने करत असतात. अगदी सतरंज्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांसाठी खुर्च्या उपलब्ध करून

देण्यापर्यंतची अनेकविध छोटीमोठी कामं ते स्वतः मोठ्या तत्परतेने करत असतात.

विशेषतः एखादा कार्यक्रम सशुल्क असेल तर कार्यक्रमस्थळी प्रवेशद्वारावर उभं राहून तिकीट, प्रवेशपत्र पाहूनच येणाऱ्या लोकांना आत प्रवेश द्यायच्या कटू कामात तर डॉ. परांजपे आघाडीवर असतात. बरेचजण हे कटू काम टाळतात. कारण त्यात वाईटपणा, अपयश येण्याची शक्यता असते आणि अपयशाचे धनी होणार कोण? आहेतच की डॉ. अ. शं. परांजपे! प्रेक्षकही एकाच तिकीटात दोनदोन जणांच्या प्रवेशासाठी हळूच प्रयत्न करीत असतात. एकाच प्रवेशपत्रावर दोघे दोघे आत घुसण्याची धिटाई करीत असतात. प्रसंगी वाद घालतात. कुणा प्रतिष्ठाचे नाव पुढे करतात. ओळखीचा गैरफायदा घ्यायला बघतात. अशावेळी डॉ. अ. शं. परांजपे नावाचं एक प्रामाणिक चेकपोस्ट आपल्या काही ठराविक पदाधिकाऱ्यांसह आणि तशाच तोलामोलाच्या स्वयंसेवकांसह हे अवघड काम मोठ्या निष्ठेनं पार पाडत असतात.

यात जरा कुठे ढिलाई दिसली की डॉ. परांजपे उच्च स्वरात संबंधितांना त्याची जाणीव करून देतात. कुठेही थोडेसे जरी न्यूनत्त्व त्यांना दिसलं की जरा मोठ्या आवाजातच ते त्या न्यूनत्त्वाकडे संबंधितांचे लक्ष वेधून घेतात. त्यामुळे अनेकदा काही डॉ. परांजपेंच्या त्या ओरडण्यामागील विशुद्ध हेतू लक्षात न घेता 'डॉक्टर रागावतात' एवढंच सांगत बसतात. खरं तर डॉक्टरांचा या अशा वागण्यामागील मेख सर्वांनी समजून घ्यावी असं मला नेहमी वाटतं. डॉक्टरांचा हेतू लोकांनी नीट जाणून घ्यावा असं मला अगदी मनापासून वाटतं.

'कलापिनी'च्या ४४ वर्षांच्या इतिहासात अक्षरशः हजारो कार्यक्रम झाले. वर्षाकाठी २०० कार्यक्रम. म्हणजे मागील २५ वर्षात साडेचार–पाच हजार कार्यक्रम झाले. या सर्वच कार्यक्रमांना अपेक्षित यशही मिळाले. मला सांगा, नोकरचाकर, सेवक, गडीमाणसं, पगारी स्टाफ यापैकी काहीही नसताना हे कार्यक्रम – म्हणजे अगदी

अल्पोपहारासह – सगळे कार्यक्रम कसे काय यशस्वी झाले असतील? एकच उत्तर........

स्वयंस्फूर्त कार्यकर्ते आणि त्यांचं नेतृत्त्व! असंख्य कार्यकर्त्यांनी स्वयंस्फूर्तीनं डॉ. परांजपेंच्या व अन्य पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या 'श्रमदाना'तून हे यश खेचून आणले. श्रमदानाची ती परंपरा आजही अव्याहतपणे चालूच आहे.

मोठं गमतीदार आणि बघण्यासारखं दृष्य असतं ते! एखाद्या कार्यक्रमाचा दिवस जवळ आला रे आला की........

की सर्वात आधी डॉ. परांजपे सक्रीय होणार.

मग श्री अशोक बकरे, श्री. रानडे, श्री. बुरसे, श्री. जयवंत श्री. रविंद्र पांढरे, श्री. इनामदार यांनाही उत्साह संचारणार.

पाठोपाठ सौ. सहस्रबुद्धे यातरी कशा मागे राहतील?

पण तोवर सौ. रश्मी पांढरे, सौ. बुरसे आणि मग सर्वच प–दा–धि–का–री!

सर्व मंडळी अगदी ठरल्याप्रमाणे थेट कार्यक्रमस्थळी पोहोचतात, ठरलेल्या वेळेच्या कितीतरी अगोदरच!

मग होते लगबग सुरू, कामांची सूचना, चर्चा सं(वाद!), गडबड, धावपळ. काहीकाही म्हणून विचारू नका.

पाहतापाहता कार्यक्रम सुरूही होतो.

रंगतो, रंगतच जातो.

हशा, टाळ्या, मार्मिक कॉमेंटस्.

वेळ कसा जातो कुणालाच समजत नाही.

कार्यक्रम संपतो 'कलापिनी'च्या प्रार्थनेनं.

एकीकडे प्रेक्षक बाहेर पडत असतात तर दुसरीकडे.....

दुसरीकडे खुर्च्यांची उतरंड उभी राहू लागते, अगदी उत्स्फूर्तपणे, कुणीही न सांगता, न ओरडता!

बघताबघता सगळी आवराआवर होते, कार्यक्रमस्थळ झाडून पुसून स्वच्छ होतं, पुढच्या कार्यक्रमाची वाट पाहू लागतं, आतुरतेने,

प्रेक्षकांच्या ओढीनं!

या सर्व यंत्रणेत डॉ. परांजपेही कार्यरत असतात. त्रुटी दिसली की दे सूचना, सूचना देऊनही ती त्रुटी दूर करण्याकडे दुर्लक्ष झालं की बसलाच ओरडा! बघणाऱ्याला हा ओरडा तेवढा ऐकू जातो. पण खरं तर त्याक्षणीही डॉ. परांजपेंनी संस्थेची प्रतिष्ठा, संस्थेचं हित, संस्थेची स्वयंसेवी परंपरा याचाच विचार केलेला असतो आणि त्यातूनच ते रागावणं आलेलं असतं. 'कलापिनी'चा व्यापक अन् सर्वसमावेशक विचार केला तर डॉ. परांजपेंचे हे रागावणे नैसर्गिकच म्हणावे लागेल. खरंतर प्रत्येकाने आपापले काम त्या त्या वेळी पूर्ण क्षमतेने आणि मनापासून पार पाडले तर डॉ. परांजपेंना ओरडावे लागणारच नाही. त्यांचं 'झपाटलेपण' जर आपण समजून घेतलं तर सर्वांसाठी आणि 'कलापिनी'साठीही ती एक फार चांगली आणि स्वागतार्ह गोष्ट असेल!

क्रिकेट जगतात अनेक भारतीय कप्तान झाले आपल्या वैशिष्ट्यांनी पण माझ्याच नव्हे तर अनेकांच्या दृष्टीने ' द ग्रेट वॉल' अर्थात राहुल द्रविड हा सर्वश्रेष्ठ कप्तान ठरतो. 'Leading from front' ही त्याची सर्वोच्च गुणवत्ता व तीच सर्वांना भावली. त्याने अनेक शतके, द्विशतके केली पण प्रत्येक शतक, द्विशतक हे संघाच्या विजयासाठीच ही टोकाची नि:स्वार्थीपणाची भावना जोपासणारा राहुल द्रविड जसा सर्वकालीन श्रेष्ठ कप्तान तसेच मला डॉ. अ. शं. परांजपे वाटतात.

डॉ. अ. शं. परांजपे अगदी छोट्या छोट्या प्रसंगातून 'कलापिनीचे' नेतृत्व करीत असतात. त्यात अंतिमत: 'कलापिनिचेच' हित हा त्यांच्या प्राधान्याचा मुद्दा असतो. स्वत:च प्रत्येक कामात स्वत:ला जुंपून घेतात व इतरांना प्रेरणा देतात.

# परोपकाराय इदं शरीरम्

'कलापिनी'चे व्यवस्थापन गेल्या ४४ वर्षांमध्ये कधीही एखाद्या राजकीय किंवा अराजकीय व्यक्तीकडे, एखाद्या ट्रस्टकडे, एखाद्या संस्थेकडे दिले गेले नाही. पण मग 'कलापिनी'चा हा जगन्नाथाचा रथ चालतो तरी कशाच्या बळावर? 'कलापिनी'च्या आपल्या स्वतः च्या विश्वस्त मंडळाच्या कर्मयोगाच्या ताकदीवर. व्यक्तींची योग्यता, सुयोग्य वेळ आणि 'कलापिनी'ची गरज लक्षात घेऊन विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी बदलले जातात. 'कलापिनी'तर्फे दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या दिनदर्शिकेत याचा आवर्जून उल्लेख केलेला असतो. अन्य माध्यमांमधूनही हा बदल जाहीर केला जातो पण त्याची प्रमाणाबाहेर जाहिरात कधीच केली जात नाही.

पदाधिकारी कोणीही असोत, सर्वसामान्यांना मात्र असेच वाटत असते की, 'कलापिनी'चे प्रमुख डॉ. अ. शं. परांजपेच आहेत. पण प्रत्यक्षात तसं नसतं. पदाधिकारी वेळोवेळी बदलत असतात. नव्यानव्यांना त्यांच्या कुवतीनुसार योग्य ती संधी मिळत असते. अनेकदा डॉ. परांजपे साधे 'विश्वस्त' असल्याचे आढळते. ज्यासाठी समाजातील बरेचजण सातत्याने 'जी तोड' धडपड करत असतात, आपलं सर्वस्व पणाला लावत असतात, सतत काही ना काही क्लुप्त्या करत असतात त्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, खजिनदार, सहखजिनदार, सल्लागार, आधारस्तंभ, प्रेरणास्थान, निमंत्रित सदस्य, विश्वस्त इ. बिरूदावलींपासून डॉ. परांजपे मात्र शेकडो योजने दूर असतात. पण......

पण 'कलापिनी'साठी मात्र ते २४ x ७ – 'ट्वेंटीफोर बाय सेव्हन' – सदैव कार्यरत असतात, उपलब्ध असतात. स्वतःचं आजारपण, मंगलकार्य, देश–विदेशातील प्रवास या काळातच फक्त ते 'कलापिनी'पासून दूर असतात, तेही शरीरानं. मनानं ते त्याही काळात 'कलापिनी'शीच जोडलेले असतात, बांधलेले असतात, अगदी घट्ट!

या संदर्भातली माझी स्वतःचीच एक आठवण सांगतो.

मी तळेगावातल्या ‘श्रीरंग कलानिकेतन’चा एक कार्यकर्ता होतो. तेव्हाची गोष्ट. पं. विनोदभूषण अल्पेंचा गाण्याचा एक स्वतंत्र कार्यक्रम एका गुरुपौर्णिमेस मी श्रीरंग कलानिकेतनच्याच सभागृहात आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाचे सविस्तर आणि रीतसर आमंत्रण डॉ. परांजपेंकडे पोहोचते केले होते. पण नेमके ते त्याच काळात अटलांटा शहरात अमेरिकेत सपत्निक गेले होते. ईमेलने ते आमंत्रण त्यांना कुणीतरी अमेरिकेत पाठवले. आमंत्रण वाचून डॉ. परांजपे स्वस्थ बसले का? नाही. तिथेही त्यांनी ते आमंत्रण फेसबुकवर टाकलं. परिणाम? फारच छान झाला. कारण केवळ त्यामुळेच इंडोनेशिया, इंग्लंड, फ्रान्स अशा कितीतरी देशांमधून तळेगावसारख्या ग्रामीण भागातल्या गुरूपौर्णिमेच्या सांस्कृतिक पर्वाला शुभेच्छा मिळाल्या! पाहिलंत? मनाचा केवढा हा मोठेपणा; केवढी तत्परता. तीसुद्धा दुसऱ्यांच्या कार्यक्रमाच्या प्रसारणासाठी. तेही अमेरिकेतल्या वास्तवात! ग्रेट; सिंपली ग्रेट, खूपच दुर्मिळ सद्‌वर्तन.

आपल्या तळेगावातीलच कु. अश्विनी अकोलकर या युवतीने तिला झालेल्या बोनकॅन्सरशी–म्हणजे हाडांच्या कर्करोगाशी – दोन हात करतानाचे स्वानुभव, ‘मी शतायुषी होणार’ या आत्मचरित्रपर पुस्तकात मोठ्या शैलीदार मराठीत मांडले आहेत. ती जेव्हा तिच्या पुस्तकाचं लेखन करत होती तेव्हा तिची प्रकट मुलाखत डॉ. परांजपेंनी ‘कलापिनी’च्या स्वास्थ्ययोग या उपक्रमात मोठ्या तत्परतेने आयोजित केली होती. श्री. सोनाळकरांनी केवळ एक विनंती केली होती की, ‘अश्विनीची अशी एक मुलाखत घेऊ शकाल का?’ बस्स! एवढीच विनंती. पण डॉक्टरांनी ती विनंती उचलून धरली आणि एक भावपूर्ण मुलाखत तळेगावातील ज्येष्ठ नागरिकांनी अनुभवली. ही मुलाखत मिनीटामिनीटाला उंचावत गेली ती केवळ त्या ज्येष्ठ नागरिकांनी अश्विनीच्या भाषणाला अत्यंत संवेदनापूर्ण रितीने दिलेल्या प्रतिसादामुळे! आयुष्यात पहिल्यांदाच भाषण करणाऱ्या अश्विनीतील

वक्तृत्त्वगुणाचं बीजारोपण त्या समारंभात झालं आणि पाहतापाहता लाजरीबुजरी अश्विनी मोठ्या आत्मविश्वासानं पुढे अनेक सभांमध्ये भाषण देऊ लागली. खरंतर कोण अश्विनी? इतरांसारखी एक युवती. पण तिचं व्यक्तिमत्त्व खुलावं यासाठी तिला संधी देणारे डॉ. परांजपे केवढे तत्पर! केवढे कुशल संयोजक!!

पण डॉ. परांजपे इथेच थांबतील तर कसले कार्यकर्ते? सच्च्या कार्यकर्त्याच्या कर्मयोगाला विश्रांतीची, थांबण्याची कुंपणं नसतात. अश्विनीचं पुस्तक १९ जानेवारी २०२० रोजी प्रकाशित झालं, मोठ्या दिमाखात! या पुस्तकाची ५०० प्रतींची पहिलीच आवृत्ती प्रकाशन समारंभातच संपली! अश्विनीच्या या वाङ्मयीन यशाचं कौतुक करण्यासाठी प्रकाशन समारंभानंतर अवघ्या दहाच दिवसांनी २९ जानेवारी २०२० रोजी डॉ. परांजपेंनी तिचा सत्कार समारंभ घडवून आणला, अगदी तिच्या कुटुंबियांसह! हा असा समयोचित गोड धक्का देणारे डॉ. अ. शं. परांजपेच असू शकतात, केवळ परांजपेच!

सुप्रसिद्ध साहित्यिक गो. नी. दांडेकर ४० वर्षे तळेगाव दाभाडेत राहिले. या प्रतिभावंतानं सुमारे १०० पुस्तकं लिहिली. अवघ्या जगभरात जिथंजिथं 'मराठी' भाषा आहे तिथंतिथं त्यांनी 'त-ळे-गा-व-दा-भा-डे' हे सप्तसूर पोहोचविले. त्यांच्या पश्चात त्यांचे कुटुंबिय तळेगाव दाभाडेसाठी जणू विस्मरणात गेल्यासारखे झाले होते. ही रुखरुख डॉ. परांजपेंना स्वस्थ बसू देत नव्हती.

शेवटी त्यांनी स्वतःचे सारे अधिकार, बळ, कौशल्य वापरून प्राध्यापिका सौ. वीणा देव आणि प्राचार्य कै. विजय देव यांचा 'देव'दुर्लभ गौरव समारंभ 'कलापिनी'त घडवून आणला. त्यावेळी वक्त्यांनी आपल्या भाषणात दांडेकर आणि देव कुटुंबियांच्या हृद्य आठवणींना उजाळा दिला. त्या ऐकून सौ. वीणा देव व श्री. विजय देव यांचे डोळे अश्रूंनी डबडबले होते. केवढी प्रचंड कृतकृत्यता वाटली होती त्या उभयतांना त्यावेळी तळेगाव दाभाडेचे साहचर्य आठवून! ही समयसूचकता, मनाचं हे औदार्य, गुणीजनांचा सन्मान करण्याचं हे भान

हे सगळंसगळं केवळ डॉ. अनंत परांजपेच करू जाणे!

असं काही चांगलं करण्याची संधी नजरेच्या टप्प्यात येता क्षणीच डॉ. परांजपे तात्काळ, ‘कलापिनी’तर्फे होणाऱ्या नजिकच्याच एखाद्या शानदार कार्यक्रमात त्या व्यक्तीचा यथोचित गौरव समारंभ ठळकपणे घडवून आणतातच. खरंतर हे असं समयसूचक कौतुक करण्यासाठी संस्थेचा पदाधिकारी असणंच गरजेचं नसतं; तर त्यासाठी विशाल अंतःकरण आणि दुसऱ्याचं मोठेपण सहजपणे मान्य करण्याचं मनाचं असामान्य औदार्य असावं लागतं. ते औदार्य डॉ. परांजपेंपाशी पुरेपूर आहे जे योग्य क्षणी योग्य प्रकारे प्रकटते. हे सगळं खरंतर अत्यंत प्रेरणादायी आहे, स्फूर्ती देणारं आहे. प्रत्येक कार्यकर्त्यासाठी अनुकरणीय आहे!

संस्थेसाठी ‘खस्ता खाणं’ म्हणजे नेमकं काय असतं ते डॉ. परांजपे यांच्याकडून शिकावं. वेळप्रसंगी डॉक्टरांनी घरदार, पोटापाण्याचा व्यवसाय, इतकेच काय परंतू प्रकृतीच्या समस्याही दूर सारल्या. त्यांनी मानमरातब, पदाचा मोठेपणा, पदाचा भ्रामक अभिमान हे सारंसारं दूर सारलं. सतत ‘कलापिनी’च्या लहानमोठ्या कार्यक्रमात संपूर्ण ताकदीनिशी सहभागी झाले. ‘कलापिनी’च्या एखाद्या खूप मोठ्या, प्रतिष्ठेच्या कार्यक्रमात तर ते लहानसहान कामांवरही अक्षरशः तुटून पडतात. अशावेळी त्यांना जवळून नुसतं पाहाणं देखील मला रोमांचक वाटतं! एखाद्या संस्थेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यवाह, सहकार्यवाह, खजिनदार, सहखजिनदार, सल्लागार, प्रेरणा आधारस्तंभ असणाऱ्यांनी एखाद्या कामात स्वतःला कसे जुंपून घ्यावे हे अनुभवायचे असेल तर डॉ. परांजपेंना अशाच एखाद्या कार्यक्रमात, समारंभात पाहावे.

स्टेजवरच्या झगमगाटात प्रमुख पाहुण्यांसह काही चमकदार क्षण लख्ख प्रकाशात न्हाऊन निघत असताना डॉ. परांजपे मात्र प्रवेशद्वार, रंगमंचामागील वेषभूषा खोली, अल्पोपहाराची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, अगदी स्वच्छतागृहाची स्वच्छता या गोष्टींकडे जातीने लक्ष देत सर्वत्र संचार करत असतात. जेव्हा जेव्हा मी हे असलं दृष्य

‘कलापिनी’त पाहातो, तेव्हा तेव्हा माझी खात्रीच पटते की, ‘कलापिनी’ ही संस्था तिचा ‘शताब्दी’ समारंभ नक्की साजरा करेल. कारण डॉ. परांजपेंची ‘कार्यप्रेरणा’ पिढ्यान्‌पिढ्या संक्रमित होत राहणार आहे इतकी ती भक्कम आहे, बळकट आहे, स्वयंप्रेरित आहे!

डॉ. परांजपेंचा सुप्रसिद्ध गीतकार गुलजार यांच्यावरील कार्यक्रम ‘जय हो’ बेळगावला खास मराठी रसिकांसाठी मागील सहाम ाहीत मोठ्या दिमाखात पार पडला. गुलजारांची श्रेष्ठ अन्‌ अद्वितीय कारकीर्द अत्यंत उत्तम प्रकारे तिथल्या मराठी भाषिकांसमोर सादर करून डॉक्टरांनी बेळगावकरांची मनं जिंकली. प्रेक्षक त्यांच्यावर फिदा झाले. हे सगळं मला हर्षल अल्पे यांनी सांगितलं. डॉ. परांजपेंच्या जागी जर कुणी अन्य असता तर त्याने साप्ताहिकात, दैनिकात, सर्वत्र या कार्यक्रमाच्या बातमीने आणि छायाचित्रांनी मोठी जागा व्यापून टाकण्याची काळजी घेतली असती आणि त्या माध्यमातून आपले कर्तृत्त्व प्रथम तळेगावकरांपर्यंत आणि नंतर इतरांपर्यंत पाहोचविण्याची चाोख व्यवस्था केली असती! डॉ. परांजपेंचा अशा अनेक प्रसंगांमधला निर्मोहीपणा, प्रसिद्धीपासून दूर राहण्याची वृत्ती मला खूप भावते आणि म्हणूनच तर डॉ. परांजपे माझ्या अतीव आदरास पात्र ठरतात.

डॉ. परांजपे ‘वक्ता दशसहस्रेषु’ हे वचन सार्थ करणारं व्यक्तिमत्त्व आहे. गडगडाटी हास्याचं पार्श्वसंगीत लाभलेलं आणि वाङ्‌मयीन अलंकारांनी विनटलेलं डॉ. परांजपेंचं वक्तृत्त्व थेट त्यांच्या अंतःकरणाच्या गाभ्यातूनच येतं. त्यामुळं त्याला जणू ब्रह्मास्त्राची ताकद मिळते. त्यांच्या या असामान्य वक्तृत्त्वगुणाला चपखल अभिनयाची आणि दमदार आवाजातील अरोह-अवरोहांची उत्तम जोड लाभली आहे. त्यातच उत्तम आणि दर्जेदार मराठी वाङ्‌मयाची त्यांची सखोल जाण त्यांच्या वक्तृत्त्वाला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जाते. या सर्व गुणसंपदेइतकीच आणि एक विशेष बाब आहे त्यांच्या वक्तृत्त्वात आणि ती म्हणजे भावनांची उत्कटता; श्रोत्यांबद्दलची आत्मीयता आणि त्यांच्या मनाच्या औदार्याची सदैव उघडी असलेली कवाडं!

म्हणूनच.....

म्हणूनच मला त्यांची भाषणं फार आवडतात. आपल्या या व्यक्तिगत गुणवत्तेच्या ताकदीवर ते एकटे संपूर्ण सभा एका उंचीवर नेऊन ठेवतात. गंमत म्हणजे हे जे काही सगळं घडतं ते सारं कुठल्याही अभिनिवेषाशिवाय घडतं. त्यात स्वतःच्या मोठेपणाचा दर्प कणभरही नसतो. पदाच्या, स्थानाच्या यत्किंचितही गर्वभावनेशिवाय ते घडतं. म्हणूनच तर त्यांची सर्वच भाषणं श्रोत्यांनी मनःपूर्वक ऐकली आहेत, आजही ऐकत आहेत, उद्याही ऐकतील. केवळ आपल्या व्यासंगाच्या आणि शब्दसामर्थ्याच्या बळावर ते हे सारं घडवून आणतात. छान रंगवतात ते आपलं भाषण. प्रसंगांचं टायमिंग अचूकतेने साधण्यात तर त्यांचा हातखंडा आहे.

व्यासपीठावरील कलाकार, प्रमुख पाहुणा, वक्ता यांच्याविषयी ते विलक्षण आत्मीयतेनं बोलतात. गौरवानं बोलतात. त्यामुळे व्यासपीठावरील सन्मानित व्यक्ती जणू सप्तस्वर्गात पोहोचते, खूपखूप सुखावते. स्टेजवरील चिमुकल्या कालाकारांपासून ते अगदी दिग्गज पाहुण्यांपर्यंत सर्वांनाच यथोचितपणे सन्मानित करणाऱ्या डॉ. परांजपेंच्या सहृदय अंतःकरणाचा ठाव कळतो तो अशा प्रसंगी. एखाद्याचं अभिनंदन करायचं असो वा कुणाचे आभार मानायचे असोत, तो छोटासा प्रसंगही उंचावणं आणि त्याक्षणी संबंधित व्यक्तीचं अंतःकरण भरून यावं असं प्रसंगोचित बोलणं डॉक्टरांना दरवेळी कसं काय सुचतं ते त्यांचं तेच जाणोत! एक मात्र नक्की, त्याक्षणी त्यांचं अंतःकरण इतरांबद्दलच्या आस्थेनं, प्रेमानं, कौतुकानं बहरलेलं असतं, फुललेलं असतं. इथंच मला डॉ. परांजपे इतर शेकडो जणांपेक्षा वेगळे दिसतात, वेगळे वाटतात आणि मग माझ्याही नकळत माझ्या मनात डॉक्टरांबद्दल 'परोपकाराय इदं शरीरम्' हे वचन रुंजी घालू लागतं!

म्हणूनच तर, होय म्हणूनच तर, या 'ध्यासपुरुष' पुस्तिकेचं लेखन करणं म्हणजे समाजाचं ऋण अंशतः का होईना फेडणं आहे, ते एक अत्यावश्यक आणि पवित्र काम आहे असं मी मानतो.

# ....तया यातना कठीण

एखादी व्यक्ती धडधाकटपणे कार्यरत असताना आणि समाजाच्या भल्यासाठी आपल्यातील सर्वोत्तम देत असतानाच आपल्या भारतीय समाजात क्वचितच त्या व्यक्तीचा ‘लाईफ टाईम’ गौरव केला जातो. त्या व्यक्तीने समाजासाठी अक्षरशः झिजून झिजून स्वतःच्या जीवनयज्ञात समिधा होऊन आत्मसमर्पण केलं तरी समाज मात्र त्याची फार उशीरा दखल घेतो. पण तोपर्यंत कार्य करणाऱ्या त्या व्यक्तीची जीवनयात्राच संपण्याच्या बेतात आलेली असते. खरंच, ही आपल्या भारतीय समाजाची शोकांतिकाच आहे; अगदी दारूण शोकांतिका! जीवन गौरव पुरस्कार स्वीकारण्यासाठी जेव्हा एखाद्या दिग्गज पण विकलांग, स्मृतीभ्रंश झालेल्या कलाकाराला व्हिलचेअरवरून ढकलत स्टेजवर आणलं जातं तेव्हा प्रेक्षागारात उपस्थित असलेल्या रसिक चाहत्यांचे दोन्ही हात आनंदानं टाळ्यांचा कडकडाट करीत असतात पण त्याचवेळी एकेकाळी ज्याचा तडफदार, आवेशपूर्ण, आत्मविश्वास पूर्ण वावर आपण ज्या रंगमंचावर पाहिला होता त्याच रंगमंचावर त्या कलाकाराचं ते असहाय्य आणि दुबळं रूप पाहून त्याच चाहत्यांचे दोन्ही डोळे करूणेनं पाणावलेले असतात!

सातत्याने कार्याचे डोंगर उपसणाऱ्यांना अगदी क्षुल्लक गोष्टींसाठी आणि बऱ्याचदा संस्थेच्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी अथक लढा द्यावा लागतो. त्यांची ऊर्जा, त्यांची जीवनशक्ती कार्य उभं करण्यापेक्षा त्या कार्याच्या अन्य किरकोळ गोष्टींची पूर्तता करण्यातच संपून जाते.

स्वर्गीय बाबा आमटेंनी पत्नी, मुलं आणि एक गाव घेऊन माळरानातील एका झाडाखाली कुष्ठरूग्णांसाठी काम सुरू केलं. अडचणी अनंत, अपार. पण ध्येयनिष्ठाही तितकीच बलदंड. त्यामुळे हळूहळू का होईना पण काम उभं राहात होतं; पण ते जगापुढे येत नव्हतं. आलंच तरी, संथ, संवेदनाहीन समाजामुळं त्या कामाला हवी

तशी पोचपावती मिळत नव्हती; पण.....

पण सुदैवानं विख्यात मराठी लेखक स्व. पु. ल. देशपांडे यांनी बाबांचं कार्य सर्वदूर परिचित करून दिलं. त्यामुळे आपल्या हयातीतच बाबांना आपल्या कामाचं विशाल, विकसित, आनंददायी रूप पाहता आलं; कृतकृत्य होता आलं. पण हे भाग्य प्रत्येक समाजसेवकाला मिळतेच असं नाही.

महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा गांधीजी यांच्या हयातीत, उमेदीचा फार मोठा काळ हाती घेतलेले कार्य शून्यातून उभं करण्यातच गेला. ही माणसं चंदनासारखी झिजली; काळाच्या पडद्याआड गेली, तेव्हा कुठं त्यांचं खरं माहात्म्य, खरं मोठेपण भारतीय समाजापर्यंत खऱ्या अर्थानं पोहोचलं. ही अशी सामाजिक कमतरता हे आपलं फार मोठं दुर्दैव आहे. पण.....

पण आता निदान इथून पुढे तरी हे दारूण सत्य पुढे येता कामा नये. त्यासाठी प्रत्येकानं अगदी पु. ल. देशपांडेच झालं पाहिजे असं नाही. ते शक्यही नाही. पण स्वतःला जमेल, रूचेल, झेपेल, शक्य असेल ती मदत समाजातील कार्यप्रवण, धडपड्या व्यक्तींना लवकरात लवकर दिली पाहिजे. त्या व्यक्ती केवळ हयात असतानाच नव्हे तर त्या व्यक्ती शरीराने आणि मनाने सुस्थितीत असतानाच त्यांच्यापर्यंत, त्यांच्या संस्थांपर्यंत अशी मदत पोहोचली पाहिजे.

मित्रहो, परदेशात ही अशी स्थिती नाहीये हे परदेशभ्रमण केलेल्या अनेक तळेगावकरांना निश्चितच ठाऊक असेल. परदेशभ्रमणात तिथले समाजजीवन, राष्ट्रजीवन, नागरिकांचे वैयक्तिक जीवन या गोष्टींचा जर डोळे नीट उघडे ठेवून अभ्यास केला तर तिथले नागरिक समाजकार्य करणाऱ्यांच्या प्रती आपलं उत्तरदायित्त्व कसं जागरूक ठेवतात हे लक्षात येईल. म्हणूनच तळेगाव दाभाडेतील सुजाण, सुसंपन्न आणि संवेदनशील नागरिक बांधवांना विनंती कराविशी वाटते की आपणही आपल्या हयातीत चांगलं काम करणाऱ्यांना त्यांच्या हयातीतच मदतीचा हात पुढे करूया. त्यामुळं त्यांचं काम नक्कीच वेगानं पुढे सरकेल.

डॉ. परांजपेंनी ‘कलापिनी’च्या भविष्यकालीन गरजांचा सदैव विचार केला. तिच्यापुढे येणाऱ्या आव्हानांचा डोळसपणे विचार केला. ‘कलापिनी’ पुढे कोणत्या संधी आहेत याचा अचूक अंदाज घेतला. म्हणूनच तर ‘कलापिनी’चा ४४ वर्षांचा जीवनप्रवास व्यवस्थितपणे पार पडला. त्यांच्या या दूरस्थ विचार करण्याच्या क्षमतेमुळे (Skill of full perspective thinking) ‘कलापिनी’ ४४ वर्षे ‘नुसती’ जगली नाही; तर अंगाउपांगांनी बहरली, विस्तारली, फुलली, विकसित झाली. तिचं कार्यक्षेत्र वर्षागणिक विस्तारत गेलं. तिचा झेंडा सातासमुद्रापार गेला. पण......

पण ‘कलापिनी’ला हे अत्यंत मर्यादित सामधनसामुग्रीनिशी, अपुऱ्या द्रव्यक्षमतेमध्ये करावं लागलं. डॉ. परांजपे यांची बरीचशी जीवनशक्ती कार्यक्रम सुचण्यात, त्यांचे नियोजन करण्यात, त्यासाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या मदतस्त्रोतांची जमवाजमव करण्यात, मनुष्यबळाचा शोध घेण्यात, त्याचा विकास करण्यातच खर्च होत आहे.

अगदी साधी गोष्ट. समजा, ‘कलापिनी’चं स्वतःचं असं एक सुसज्ज प्रेक्षागार आणि बंदिस्त रंगमंच असता तर? तर प्रत्येक कार्यक्रमासाठी (वर्षाकाठी २०० कार्यक्रम!) प्रत्येकवेळी रंगमंच आणि प्रेक्षागृहासाठी करावी लागणारी ती किचकट जुळवाजुळव करणं, कार्यक्रमानंतर पुन्हा सर्व काही पूर्ववत करणं यासाठी करावे लागणारे प्रचंड श्रम, अफाट मनुष्यबळ, प्रदीर्घ वेळ या सगळ्या गोष्टी वाचल्या असत्या! तळेगावात जर तसा रंगमंच आणि प्रेक्षागृह उपलब्ध असते तर मागील पाच वर्षांतील कित्येक कार्यक्रम कमी श्रमात, कमी धडपडीत, कमी मनस्ताप होऊन, कमी वेळ खर्च होऊन उत्तमप्रकारे पार पडले असते आणि तळेगावकरांना एक वेगळीच आनंदपर्वणी अनेकदा साजरी करता आली असती! विशेषतः डॉ. परांजपे आणि त्यांच्या राबणाऱ्या सहकाऱ्यांना केवढा मोठा दिलासा मिळाला असता!

हव फक्त सकारात्मक दृष्टीकोन. तो नसल्यानं चांगल्या

चांगल्या संस्थांचे काम अत्यावश्यक सोयीसुविधांअभावी निम्नस्तरावरच रेंगाळते, अपेक्षित उंची ते गाठू शकत नाही. आपण आता हा अपेक्षित बदल घडवून आणूयात का? (डॉ. परांजपेंचे उर्वरित आयुष्य त्यांना आणखीन नव्या व आवश्यक गोष्टींसाठी वापरता यावे यासाठी आपण सर्वजण तळेगावात एक सुसज्ज रंगमंच व छानसे प्रेक्षागृह निर्माण करण्यासाठी कटीबद्ध होऊयात, त्यासाठीचा आपला खारीचा वाटा उचलून!)

**डॉ. अ. श. परांजपेंविषयी काही हृद्य प्रतिक्रिया**

'कलापिनीमध्ये कलेबद्दल मार्गदर्शन देता देता Human Resource Managementचे धडेही नकळतपणे त्यांच्या कार्यक्रम नियोजनातून देतात.'

– **चेतन पंडित,**
७७७४५१५३३६

'माझ्या शालेय जीवनापासून आजतागायत म्हणजे गेली ४०-४५ वर्षे कला, साहित्य, नाट्य आणि संस्कृती आदी क्षेत्रांमध्ये अढळपणे कार्यरत उभा असलेला सह्यपर्वत, मी डॉ. परांजपेंच्या रूपात पाहिला आहे. अशी आराधना करणारा उपासक अन्यत्र नाही.'

– **संदीप संघवी,**
९४२३५७८५२५

'डॉ. परांजपे हे तळेगाव शहरासाठी एक वरदान आहेत. तळेगावची सांस्कृतिक भूमी म्हणून जो लौकिक आहे तो त्यांनी वाढविला आहे.'

– **सौ. चित्रा जगनाडे-नगराध्यक्षा,**

# एक घोंगावणारे ‘वादळ’




डॉ. अ. शं. परांजपे वयाच्या ६८व्या वर्षीसुद्धा मोठ्या तडफदारपणे चमकदार कामगिरी करताना दिसतात. ते मुळचेच उंचेपुरे. गोरेपान. रोमन योद्ध्यासारखे सुदृढ आणि बांधीव शरीरयष्टी. उत्साहामुळे होत असलेल्या जलद हालचाली. एकएक काम सराईतपणे आणि झटपट हातावेगळे करायची विलक्षण चपळाई. गप्पांच्या बैठकीत ठराविक वेळेनंतर एका दणदणीत हास्य कल्लोळात सगळा माहौल चिंब भिजवून टाकणं. गडगडाटी हसणं, हसताहसता सुरेख संवाद साधणं हे त्यांचं खास वैशिष्ट्य. ते सतत आपल्या भोवतालचं वातावरण ‘चालतं बोलतं’ ठेवतात. जणू एक घोंगावणारं वादळच त्या बैठकीत पिंगा घालत असतं. मरगळ, आळस, कंटाळा यांना बिलकुलच थारा नसतो त्यांच्या वागण्याबोलण्यात. म्हणूनच तर त्यांच्या सर्व वयोगटातील सर्वच छोट्यामोठ्या बैठकीत एक चैतन्य असतं, जिवंतपणा असतो. त्यांच्याशी भिडणारी व्यक्ती कोणत्याही वयाची असो, ती चटकन् वयाने आठदहा वर्षांनी जणू लहान होते आणि संभाषणाच्या प्रवाहात बघताबघता सामील होऊन जाते. मला तर नेहमीच डॉ. अ. शं. परांजपेंमधलं दडलेलं ‘मूल’ खुणावत असतं. त्यांच्यात लपलेल्या त्या शैशवामुळेच तर त्यांच्यात दिवसभर टिकून राहणारं चैतन्य अन्य कुणाकडे क्वचितच दिसतं.

ते सतत काहीतरी सांगण्याच्या 'मोड'मध्ये असतात; पण त्याचवेळी ते दुसऱ्याचं शांतपणे ऐकूनही घेत असतात. समोरच्याला समजून घेण्याचा त्यांचा वेग आश्चर्यजनक आहे. त्यामुळं अल्पशा वेळातच ते 'सारं' काही समजून घेतात; जाणून घेतात. मग त्या आधारे हे त्या व्यक्तीशी बोलू लागतात. काही सांगू लागतात. त्यांची स्मरणशक्ती विलक्षण शार्प आहे, विशेषतः लघुस्मरणशक्ती (Short term memory) तर विलक्षणच आहे. बोलताबोलता स्वतःचं 'जजमेंट देणं', 'गोषवारा सांगणं', 'आटोपतं घेणं' ही सगळी गुणवैशिष्ट्ये लक्षात घेतली तर एका उत्कृष्ट व्यक्तिमत्त्वाची उत्क्रांती त्यांच्यात झाली असल्याचे जाणवते. मला तर ते प्रत्युत्पन्न मतीचेच वाटतात; एक दुर्मिळ आणि असामान्य व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. अ. शं. परांजपे!

दिवसभरात ते असंख्य जणांना भेटतात. त्यांच्याशी यथोचित वार्तालाप करतात, बरंचसं ऐकूनही घेतात, तेवढंच स्वतःही सांगतात. पुढे कधी संदर्भ आलाच तर अचूकपणे भूतकाळातील घटनांचा सारा पट समोर मांडतात. हे सारं जर एकत्रितपणे विचारात घेतलं तर न्यूरॉलॉजिच्यादृष्टीने डॉ. अ. शं. परांजपेंचा मेंदू अत्यंत तल्लख, रेडी टू ऑपरेट ॲट एनी गिव्हन मुव्हमेंट असाच आहे. तसे ते नाट्यक्षेत्रातील 'जिनिअस' आहेतच पण 'माणूस' म्हणूनही ते परिपूर्ण आहेत, हवेहवेसे वाटणारे आहेत.

तळेगावात त्यांच्या इतकं बोलणारं दुसरं कुणी बहुधा नसेलच. सतत ४४ वर्षं 'कलापिनी'च्या कार्यक्रमांमध्ये ते बोलत आले आहेत. अर्थपूर्ण, मनःपूर्वक आणि प्रत्येकवेळी आपल्या बोलण्यात एक नवा ढंग आणण्याचा प्रयत्न करीत डॉ. परांजपे 'कलापिनी'बद्दल आणि तिच्या कार्यक्रमांबद्दल काही ना काही बोलतच असतात. गंमत म्हणजे ते ऐकण्याचा कुणालाही कंटाळा येत नाही. बोअर होत नाही त्यांचं बोलणं कधीच. कारण त्यांच्या बोलण्यात एकसूरी तोच-तोचपणा नसतो; त्या बोलण्यात हजरजबाबीपणा असतो, उत्स्फूर्तता असते.

असंख्यजणांच्या असंख्य गोष्टींचं कौतुक ते जाणीवपूर्वक करत असतात. त्यांच्या आवाजात कणखरपणा आणि मार्दव यांचं विलक्षण मिश्रण आहे. मनात सतत 'कलापिनी'चा उत्कर्ष आणि सर्वांगीण विकास याबद्दलची अपार तळमळ. त्यामुळं त्यांचं बोलणं एखाद्या गंगौघाप्रमाणं सतत खळाळणारं, प्रवाही आणि उपकारकच ठरतं.

'कलापिनी'ची सर्वांगीण प्रगती, कलेचं उत्थापन, संस्था व जनसमूह पुढेपुढे जात राहाणं हेच त्यांचं आर्त असतं. म्हणूनच असंख्य अडचणींच्या डोंगरातून वळणे घेत जाणाऱ्या रेल्वेसारखी 'कलापिनी' मनोहारी वळणे घेत पुढेपुढे जात आहे. वर्षानुवर्षे एकाच संस्थेचं काम सलग, सतत, निरलसपणे करत राहणं आपल्या देशात खरंतर आश्चर्यकारकच ठरेल. कारण संस्था बनविणे आणि त्या संस्था दीर्घकाळ व्यवस्थितपणे चालू ठेवणे ही साधारणपणे ब्रिटीशांची खासियत आहे. त्यामुळेच तिकडच्या अनेक संस्था शतकानुशतके उत्तमपणे कारभार करीत असल्याचे दिसते. अगदी उदाहरणच द्यायचे झाले तर ४०० वर्षं स्ट्रॅटफोर्ड अपॉन एव्हॉन इथली शेक्सपिअरची स्मारकव्यवस्था आणि नाट्यनिर्मिती व्यवस्था!

अगदी यासारखीच नसली तरी या परंपरेची किंचितशी जाणीव करून देणारी 'कलापिनी' ही संस्था. ४४ वर्षांची वाढती श्रेणी. वाढतं यश. वाढती परंपरा. अशा 'कलापिनी' करीता आपलं तन, मन, धन, वाणी हे सारं ओतून काम करणारे, 'कलापिनी'स आपलं सर्वस्व मानणारे डॉ. अनंत शंकर परांजपेंना माझं मनःपूर्वक वंदन.

काहीजण एखाद्या संस्थेत काम करत असताना सर्वप्रथम आपलं स्वतःचं हित सांभाळतात; अगदी सर्व शक्तीयुक्तीनिशी. हे झाले समान्यलोक. काहीजण संस्थेच्या हितातच आपलंही हित आहे असं मानून एकाचवेळी आपलं अन् संस्थेचंही हित सांभाळतात. हे चांगले, व्यवहारी लोक. पण स्वतःच्या हिताच्या आधी संस्थेच्या हिताला प्राधान्य देऊन, संस्थेच्या हितालाच आपल्या जीवनव्यापारात सर्वोच्च स्थान व प्राधान्य देऊन जगणारे फार फार विरळ असतात.

ते खरे पुरूषोत्तम! अशा पुरूषोत्तमात डॉ. अ. शं. परांजपेंची गणना करणं मला आवडेल, तळेगावातलं एक अद्भूत व्यक्तिमत्त्व! खराखुरा ध्यासपुरूषोत्तम! कार्यकर्त्यांनी, संस्थात्मक कार्य करणाऱ्यांनी डॉ. परांजपेंचा जिवंत आदर्श कायम लक्षात ठेवावा.

प्रत्येक कार्यक्रमाच्याशेवटी ते झटकन् आपले दोन्ही हात जोडतात; डोळे मिटतात आणि आपल्या घनगंभीर आवाजात म्हणतात, 'पठनं विपुलं देहि, देहि मे सावधानताम्, कलानिपुणतां देहि, देहि मे शब्दसौष्ठवम्' अंतःकरणाच्या गाभ्यातून उमटलेल्या या प्रार्थनेचे शब्द जेव्हा जेव्हा मी ऐकतो तेव्हा तेव्हा माझे डोळे नकळत पाणावतात!



**पठनं विपुलं देहि, देहि मे सावधानताम्,**
**कलानिपुणतां देहि, देहि मे शब्दसौष्ठवम्**
**देहि मे कोमलामं वाचम्, देहि कर्मसु निर्मलम्**
**सुविद्याम् वैभवं देहि, देहि मे सत्समागमम्**
**अनेक जन मैत्रिं मे, देहि रामप्रभो शुभम्**
**देहि मे ज्ञान वैराग्यं, त्वयि भक्ति सदास्तु मे ।।**

# बालभवन: भविष्याची पायाभरणी




डॉ. अ. शं. परांजपे भूतकाळातील अनुभवांच्या आधारे भविष्याचा वेध घेत वर्तमानात पावलं टाकणारे विलक्षण पण सावध गृहस्थ आहेत.

'कलापिनी'च्या उत्कर्षाचाच विचार सदैव करीत असलेल्या, 'कलापिनी'साठी सतत झटणाऱ्या डॉ. अ. शं. परांजपेंचा एक खास वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे बालभवन! बालभवन हे 'कलापिनी'चं अपत्य. कोणतीही संस्था बऱ्याचदा पैशांपेक्षा, साधनसामुग्रीच्या विपुलतेपेक्षा दर्जेदार, धडपड्या कार्यकर्त्यांच्या भरोशावरच चालते हे निःसंशय सत्य आहे. अशा कार्यकर्त्यांचा ओघ सतत वाहता राहावा लागतो. त्यासाठी एखादी मोहीम राबवण्याची कल्पना प्रयत्नपूर्वक प्रत्यक्षात आणली जातही असेल. पण.....

पण भविष्यात दर्जेदार, उन्नत, गुणवत्तापूर्ण, निष्ठावंत कार्यकर्ते सतत मिळत राहावेत या मूलभूत उद्देशाने 'कलापिनी'ने २०-२५ वर्षांपूर्वी तळेगावात 'बालभवन' सुरू केले. या बालभवनात वयाची तीन वर्षं पूर्ण झालेल्या मुलामुलींना अत्यंत काळजीपूर्वक सांभाळले जाते, हाताळले जाते. बालभवनचे उद्दिष्ट आहे, या मुलांची वाचिक, शारीरिक, सामूहिक, बौद्धिक, भावनिक कौशल्ये योग्य दिशेने विकसित व्हावीत. बालभवनने डोळ्यापुढं ठेवलेलं हे Long term aim उद्दिष्ट

प्रत्यक्षात उतरविण्यासाठी ‘कलापिनी’चे कार्यकर्ते, विशेषतः माफक वेतनावरही उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षिका मनापासून काम करताना दिसतात. कारण डॉ. अ. शं. परांजपेंची प्रेरणा, त्यांचा ध्यास!

बालभवनमध्ये सध्याच्या कित्येक समस्यांसाठी सुंदर पर्याय प्रयत्नपुर्वक निर्माण केले आहेत.

१) मूल केवळ आई, कुटुंबाच्या मर्यादित सुरक्षित, उबदार परिघातून बाहेर काढून विराट, विशाल विश्वाचा अद्भूत अनुभव बालकांना मिळतो ते बालभवनामधील केवळ येण्यानेच.

२) वाटून घेणे (sharing) हे साध्या ‘एक मूल’ कल्पनेने मुलांना उमजतच नाही. मात्र बालभवन त्यासाठी आदर्श संस्था आहे.

३) सामुदायिकपणे राहून नात्यांचा परिघ कुटुंबांपेक्षा मोठा करण्याची अदभूत किमया बालभवन करते आहे.

४) मुलाशी मुलीने, मुलाने मुलीशी सहजतेने आनंदाने मिसळून त्यामधील अत्यंत जिव्हाळ्याचे नाते बालभवन जुळवून देते

५) सांघिक कृती करणे हा राष्ट्राचा पुढील काळातील महान गुण बालभवनमध्ये नकळत मुले उचलतात.

६) माता खुपदा मुलामुलींना सांभाळण्यास अननुभवी ठरतात, वैतागतात, रागावतात, क्वचित हलकीशी चापट देतात. पण बालभवनच्या प्रशिक्षित, अनुभवी, प्रेमळ शिक्षिका हेच नाजूक काम छान करतात. म्हणून मुलं बालभवनशी घट्ट जोडली जातात.



बालभवनबद्दल अहोरात्र विचार, योजना व प्रत्यक्ष कार्यवाही करणाऱ्या डॉ. परांजपेंनी पुढे हळूहळू ‘कुमारभवन’चा श्रीगणेशा केला. आता ही शाखाही बऱ्यापैकी नावारूपास आली आहे. इथेही ‘कलापिनी’च्याच कार्यकर्त्यांचं भक्कम पाठबळ त्यांना लाभलं आहे. थोडक्यात काय, तर.......

एखादं छोटं गुणी मूल ‘बालभवन’मध्ये दाखल झालं की तिथूनच त्याला सर्वांगानं घडवत घडवत ‘कुमारभवन’च्या माध्यमातून पुढे त्या बालकाला एका तरुण, तरतरीत, उत्साही कार्यकर्त्यात, कलाकारात परिवर्तित करायचे! आहे नं जादू? ही अशी तयार होत होत पुढे आलेली तरूण पिढी आज ‘कलापिनी’त उमेदवारी करताना दिसते आहे. इतकेच नव्हे तर कधीकधी हीच तरूणतरूणींची ऊर्जा प्रौढ व अनुभवी कार्यकर्त्यांना मागे टाकत एखाद्या कार्यक्रमात आघाडीवर चमकताना दिसते. हाती घेतलेला कार्यक्रम ‘कलापिनी’च्या दर्जाला आणि परंपरेला शोभेल असाच होईल यासाठी बालभवन अन् कुमारभवनचं हे प्रॉडक्ट यशस्वी धडपड करताना दिसतं तेव्हा डॉ. अ. शं. परांजपेंना धन्य धन्य वाटत असेल!

म्हणूनच तर डॉक्टर ‘कलापिनी’चं ‘कलामंडळ’ जसं दूरदृष्टीनं, व्यापक हेतूनं सांभाळतात तसंच ते ‘बालभवन’ ही त्याच तळमळीनं पाहात असतात. खरंतर ‘बालभवन’ ही ‘कलापिनी’ची केवळ एक शाखा न राहता पूर्ण तळेगाव दाभाडेसाठी सजग भविष्याचा विचार करणाऱ्या सर्व नागरिकांची ती एक विधायक चळवळ व्हावी, अनुकरणीय ‘विचारधारा’ व्हावी. तसं जर झालं तर ‘बालभवन’ला भक्कम आर्थिक पाठबळ लाभेल. उत्कृष्ट बालशिक्षिका मोठ्या प्रमाणात इथे कार्यरत होतील. बालभवन ही तळेगावची उद्याची आशा आहे, उद्याचा उज्ज्वल भविष्यकाळ आहे.

मी माझ्या आयुष्यातील ३४ वर्षं वालचंदनगर, बारामती या भागात अध्यापनाचं काम केलंय. माझा जीवनानुभव खूपच समृद्ध झाला या ‘बागायती’ परिसरात. ‘वालचंदनगर’ तर संपूर्ण महाराष्ट्रात

आपल्या वेगळेपणानं गाजलं, सर्वदूर पोहोचलं. जागतिक दर्जाचं औद्योगिक उत्पादन. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर. अतिशय आदर्श अशी विशाल कॉलनी. या कॉलनीचा layout अमेरिकेतील न्यूयॉर्कच्या अव्हेन्यू स्ट्रीटच्या धर्तीवर तयार केला आहे. तिथल्या उत्कृष्ट अशा मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणसंस्था. त्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी जगभर विशेषतः अमेरिकेत गाजवलेला डंका! साहित्य, संगीत, कला, सामाजिक उपक्रम यामुळे 'वालचंदनगरी' खूप खूप नावाजली गेली सलग इ. १९३१ पासून ते इ.स. २०१० पर्यंत! शेजारील प्रसिद्ध अशा बारामतीच्या मोठमोठ्यांना वालचंदनगरची भूरळ पडायची! ती मी अनेकदा अनुभवलीये! त्या इतक्या जुन्या काळातही – म्हणजे पुण्यात अजून 'बालगंधर्व' ही उभारलं नव्हतं त्या काळात – वालचंदनगरला 'नाट्यब्रह्म' या समर्पक नावाचे उत्तम नाट्यगृह आणि सोबत चित्रपटगृहसुद्धा एकाच वास्तूत उभं होतं!

पुढे बारामतीसारख्या तालुक्याच्या गावी 'अनंतराव पवार सभागृह', 'अप्पासाहेब पवार सभागृह', 'ग. दि. माडगूळकर सभागृह' अशी भव्य सभागृहे निर्माण झाली. मुंबईतल्या षण्मुखानंद सभागृहाची आठवण करून देणारी ही देखणी सभागृहं! सांस्कृतिक केंद्रं! तिथं विविध सांस्कृतिक कार्यक्रम, दर्जेदार सामाजिक उपक्रम सातत्यानं होत असतात.

मी वालचंदनगर पहिले, अनुभवले. मी बारामती पाहिले, अनुभवले. सध्या तळेगाव दाभाडे गेली १५ वर्षं अनुभवतोय. म्हणून अत्यंत प्रांजळपणे आणि अभिमानाने मी सांगू शकतो की तळेगाव दाभाडे या छोट्या – म्हणजे अगदी तालुका प्लेसही नसलेल्या – या गावाचं सांस्कृतिक संचित वालचंदनगर आणि बारामती यांच्या सांस्कृतिक संचितापेक्षा अधिक आहे, विविधांगी आहे, सातत्यपूर्ण आहे. पण......

पण गेल्या ४४ वर्षांहून अधिक काळ इतर अनेक संस्थांच्या तुलनेनं अधिक सर्वस्पर्शी काम करणाऱ्या तळेगावातील 'कलापिनी'स

स्वतःचं किमान सोयी असलेलं एक नाट्यगृह नसावं याचे मला अतोनात दुःख होते. ज्या गावात कलाकारांची खाण आहे, पैसे देऊन, तिकीट काढून कार्यक्रमासाठी येणाऱ्या रसिकांची तुडुंब गर्दी आहे, कार्यक्रम झाल्यानंतर पुढे कित्येक दिवस त्या कार्यक्रमाला दाद देत राहणारे लोक आहेत, पुण्या-मुंबईहून इथे येऊन इथेच स्थायिक झालेले अभिजन आहेत, अशा गावात, आपल्या तळेगावातल्या 'कलापिनी' कलाकेंद्रात एक नाट्यगृह उभारण्याच्या स्वप्नाने डॉ. परांजपे प्रदीर्घ काळ पछाडले आहेत. पण......

पण ते काम मात्र संथ गतीनं होतंय अनेक अडचणींमुळे. खरंतर या प्रकल्पासाठी कुणातरी रसिक, कार्यक्षम, दूरदृष्टीच्या एखाद्या कलाप्रेमी दानशूर व्यक्तीने मोठा आर्थिक सहयोग देण्याची नितांत गरज आहे. भेटेल का कोणी असा रसिक दाता? माझी खात्री आहे, दाता भवति! पण केव्हा? कुठं? कसा?

पण मी मात्र ठरवलंय, माझं हे पुस्तक ई-बुकच्या स्वरूपात तळेगावला, महाराष्ट्राला, देशाला नव्हे संपूर्ण जगाला 'मोफत' म्हणून उपलब्ध करून द्यायचं!

माझी अपेक्षा आहे की, जगाच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या मराठीप्रेमी हजारो सुहृदांनी हे 'ध्यासपुरूष' वाचावं आणि यथाशक्ती, यथामती, 'कलापिनी'ला आर्थिक उभारी द्यावी, इतकी द्यावी, इतकी द्यावी, की त्यातून सुंदर नाट्यगृह तळेगावात उभं राहावं!

> डॉ. विजया मेहता, कै. श्री. शरद जोशी, कै. डॉ. माधव देसाई, कै. श्री. विद्याधर दाते अशा अनेकांच्या सन्मानासाठी 'कलापिनी'पलीकडे जाऊन, सर्वसामान्यांना एकत्र करून संस्मरणीय असे कार्यक्रम केले. तळेगावचे रसिक त्या कार्यक्रमांना दीर्घकाळ लक्षात ठेवतीलच पण ज्यांच्यासाठी कार्यक्रम केले त्यांचे स्मरणही सदोदित करतील. डॉ. अ. शं. परांजपेंच्या नेतृत्वात अशी संवेदनशीलता, कलात्मकता व या सहाय्याने व्यक्तिंना पूर्ण न्याय देण्याचे कसब जाणवते.

# कलामंडळः 'अनंत' ध्येयासक्ती



'कलापिनी'च्या प्रदीर्घ कलाप्रवासातील तिचे सर्वात श्रेष्ठ, टिकाऊ व बहुगुणी काम कोणते असेल तर ते म्हणजे तिचे 'कलामंडळ'.

डॉ. अनंत परांजपे आणि त्यांच्या कल्पक, धडपड्या सहकार्यांनी महत्प्रयासांनी नावारूपास आणलेली एक चैतन्यमयी चळवळ म्हणजे 'कलामंडळ'.

'कलापिनी'चा कणा–बॅक बोन–म्हणजे 'कलामंडळ'.

रसिक श्रोत्यांचे, मर्मग्राही प्रेक्षकांचे खरेखुरे संघटन म्हणजे 'कलामंडळ'.

'कलापिनी'च्या डॉ. अनंत परांजपे यांच्या द्रष्टेपणाचे थेट आविष्करण म्हणजे 'कलामंडळ'.

डॉ. परांजपेंचे ते 'Brain Child' जणू.

आजकाल पुण्यामुंबईत नाट्यप्रयोगांच्या तिकीटांचे दर खूपच वाढलेत. याचं खरं कारण नाटक बघायला येणाऱ्या श्रोत्यांची रोडावलेली संख्या. त्यामुळे खर्च वजा जाता नाट्यप्रयोग करणं परवडावं यासाठी निर्माते नाईलाजानं तिकीट दर वाढतात. त्यामुळे प्रेक्षकसंख्या आणखीनच घटते. घटत्या प्रेक्षकांमुळे नाटकाच्या प्रयोगांची संख्या कमी कमी होत चालली आहे.

तळेगावात याबाबतीत नेमकं काय घडतंय? बरोब्बर याच्या

उलट! कारण? कारण इथल्या 'कलापिनी' या नाट्यसंस्थेचा स्वतःचा असा एक खास रसिक श्रोतावर्ग आहे. हा वर्ग वारंवार अवीट कलानुभव घेऊन 'दाद देण्या'बाबत खूपच 'तयार' झाला आहे; 'घडला' आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील – विशेषतः – पुण्यामुंबईचे कलावंत बऱ्याचदा स्टेजवर चालू असलेल्या आपल्या नाट्यप्रयोगात, कार्यक्रमात योग्यवेळी मध्यंतर घडवून आणतात ते खास तळेगावकर रसिक प्रेक्षकांचे आभार मानण्यासाठी. त्यावेळीही रंगमंचावर ओळीनं उभं राहून अभिवादन करणाऱ्या त्या कलाकारचमूचं कौतुक आणखीनच दुप्पट टाळ्यांनी करायला तळेगावचे प्रेक्षक विसरत नाहीत. हे सगळं केवढं भूषणावह आणि अभिमानास्पद आहे आख्ख्या तळेगावसाठी! कुणामुळे ही किमया घडून येते? अर्थातच् 'कलामंडळा'मुळे, निर्विवादपणे!

डॉ. परांजपे आपल्या या 'बाळासाठी', या 'बाळाबद्दल'च सतत बोलत असतात, आवाहन करत असतात, आग्रह करत असतात. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र ते कलामंडळाबद्दलच बोलत असतात, आग्रहपूर्वक प्रतिपादन अन् आवाहन करत असतात. विशेष म्हणजे अनेकदा स्वतः डॉ. परांजपे 'कलापिनी'चे अध्यक्ष, कार्यवाह, खजिनदार, कलामंडळाचे अध्यक्ष वगैरे काहीही नसतात. तरीही, तरीही आपलं सारं मौखिक सामर्थ्य पणाला लावून ते समोरच्याशी कलामंडळाबद्दलच बोलत असतात, अगदी तळमळीनं. यासाठी ते त्यांच्या आवाक्यातील कुठलीही संभाव्य संधी सोडत नाहीत. मुळात कलामंडळाबाबत बोलण्यासाठी ते संधीची वाट पाहण्यात वेळ घालवतच नाहीत. ते त्यांना मान्य नाही आणि परवडणारेही नाही. 'कलामंडळामुळेच आम्ही पुण्यामुंबईकडचे महागडे, कलात्मक कार्यक्रम 'कलापिनी'त कसे आणू शकतो' हे कळकळीनं समोरच्याला सांगितल्याशिवाय बहुदा त्यांचा एकही दिवस मावळत नसेल. मार्च, एप्रिल आणि मे महिन्याबद्दल तर बोलूच नका, कारण प्रामुख्यानं या तीन महिन्यात त्यांची भेट कुठेही झाली तरी कलामंडळाची आठवण पहिल्याच वाक्यात करून देणं हे काम ते आगत्यानं करतात. कित्येकदा

त्यांच्या या प्रेमळ आवाहनाने कित्येकांची मोठी गंमत होते. विशेषतः आपल्या खिशातील पैसा अत्यंत जपून, सावकाशपणे खर्च करणाऱ्यांचा मोठा संकोच होतो अशावेळी. पण.....पण डॉ. अ. शं. असिधारा व्रताप्रमाणे कलामंडळाच्या कामाबाबत ठाम असतात.

डॉ. परांजपे, 'कलापिनी' आणि तळेगाव दाभाडेचे जाणकार रसिक प्रेक्षक या तिघांची मोहिनी समस्त महाराष्ट्रातील तमाम ख्यातनाम नाट्यसंस्थांना आणि अनेक दिग्गज कलाकारांना पडतेच. त्यामुळेच तर ते सारेजण 'कलापिनी'त आपली कला सादर करण्यासाठी नेहमीच उत्सुक असतात. पण मुळात मावळ प्रांत पावसाळी प्रदेश. त्यामुळे नाट्यप्रयोगांना वर्षातील आठच महिने– प्रत्यक्षात सहाच – मिळतात. त्यातच 'कलापिनी'चं स्वतःचं बंदिस्त नाट्यगृह नाही. म्हणून मग मिळणाऱ्या जेमतेम सहाच महिन्यात जास्तीत जास्त नाट्यप्रयोगांचं आयोजन करण्याची तारेवरची कसरत संयोजकांना करावी लागते.

कलामंडळाचे सदस्य 'कलापिनी'चे सर्व कार्यक्रम सन्मानाने, सोयीने, बऱ्यापैकी आरामात बसून अनुभवतात; पण तरीही एक रूखरूख मागे राहतेच. कोणती? 'कलापिनी'चं स्वतःचं सुसज्ज रंगमंदिर असतं तर....! खरंतर ही उणीवच तळेगाव दाभाडेच्या समस्तांची मनोवेदना का नसावी? ही त्रुटी जेव्हा सर्वांच्याच मनातली सतत ठुसठुसणारी सल होईल तेव्हाच खऱ्या अर्थानं रंगमंच आणि प्रेक्षागाराचा प्रश्न मार्गी लागल्यासारखं होईल.

काय गंमत आहे पहा, या कलामंडळामुळेच तर 'कलापिनी'ला हक्काचे रसिक प्रेक्षक लाभतात, तेही खिशातले पैसे आगाऊ देऊन. शिवाय ऐनवेळी तिकीट खरेदी करून येणारे प्रेक्षक देखील फार महत्त्वाचे असतात. या आर्थिक बळावरच पुण्यामुंबईच्या दर्जेदार नाट्यप्रयोगांचे आयोजन वर्षभर करता येते.

हे असे वर्षभर चांगले, दर्जेदार कार्यक्रम होत राहतात कलामंडळात. त्यामुळे काही रसिक नव्याने कलामंडळ सदस्य होतात. म्हणून कलामंडळ आर्थिकदृष्ट्या भक्कम होतं. या बळावर मग

आणखीन उत्तमोत्तम कार्यक्रम करण्याचं कार्यकर्त्यांचं स्वप्न प्रत्यक्षात येऊ लागतं. त्या स्वप्नपूर्तीमुळं पुन्हा नवनवीन सदस्य कलामंडळाला जोडले जातात.

हे अद्भूत सुष्टचक्र म्हणजे डॉ. अनंत परांजपेंच्या अथक धडपडीचे आविष्करण असते. 'कलापिनी'चा आर्थिक डोलारा सांभाळून वर्षभरात २०० कार्यक्रम करणं तसं खूपच अवघड. बेभरवशाच्या देणग्या आणि मदतीवर किती नाचणार? अशावेळी 'कलामंडळ'च 'कलापिनी'ला हमखास आर्थिक मदत मिळवून देतं. सध्याच्या रंगभूमीच्या कठीण काळातही 'कलापिनी'ची ही शाखा – 'कलामंडळ' संजीवनीच ठरते कलापिनीसाठी.

तळेगाव दाभाडे सोडून द्या, पुणे जिल्हाही सोडा, मला सांगा, महाराष्ट्रात सलग ४४ वर्षे टिकून राहिलेल्या आणि सातत्याने दर्जा वाढवत नेणाऱ्या किती संस्था आजही जोमानं काम करताना दिसतात? तसा कुणी स्टार कलाकार, वजनदार राजकीय नेता, सामाजिक धुरीण, धनाढ्य उद्योगपती पाठीशी नसताना डॉ. परांजपे हे सगळं कसं करू शकतात? त्याचं एक कारण आहे, ते हे की.....

डॉ. परांजपेंचा ठाम विश्वास आहे की, एखादी रंगभूमी जेव्हा कोणत्याही कलेचे आविष्करण यशस्वीपणे करते तेव्हा त्या यशासाठी रंगभूमीवरील प्रखर प्रकाशझोत आणि इतर सर्व हायफाय व्यवस्थेपेक्षाही रंगभूमी समोर अंधारात बसलेल्या रसिक श्रोत्यांची सर्वात जास्त गरज असते! म्हणूनच तर डॉक्टरांनी अशा सर्वसामान्य, रसिक प्रेक्षकांशी, श्रोत्यांशी सतत संवाद साधत 'कलामंडळा'साठी एक भक्कम आधारशिला निर्माण केली आहे. पण तरीही माझ्या मते फक्त सदस्य वाढवणं पुरेसं नाहिये. त्यासाठी एक 'कॉर्पसफंड' म्हणजेच 'कायम निधी' उभा केला गेला पाहिजे. आज 'कलामंडळा'ची ती खरी गरज आहे. त्याची सुरूवात फुलाच्या पाकळीने करायला मी आनंदाने तयार आहे.

एखाद्या मोठ्या, गुंतागुंतीच्या मशीनमध्ये Fly Wheel (फ्लाय

व्हिल) नावाचं एक चाक असतं. बरंच मोठं असतं ते. खूपच जड असतं आणि सतत गतीशीलही असतं ते. एका विशिष्ट गतीत अष्टौप्रहर फिरत राहणारं ते अजस्त्र, जड फ्लाय व्हिल स्वतः फिरत राहून मशीनमधील इतर सर्व पार्टस्ना, घटकांना एकाच गतीत, विशिष्ट पद्धतीनं कार्यरत ठेवते. म्हणूनच कुठल्याही मोठ्या यंत्रातलं फ्लाय व्हिल अत्यंत महत्त्वाचं असतं. अगदी तसंच 'कलामंडळ' हे 'कलापिनी'चं फ्लाय व्हिल आहे. जसं फ्लायव्हिलचं वजन, वेग, कार्यक्षमता त्या यंत्रात अत्यंत महत्त्वाची असते, अगदी तसंच 'कलामंडळा'ची कार्यक्षमता, ताकद 'कलापिनी'साठी अत्यंत महत्त्वाची आहे.

'कलामंडळा'च्या प्रेक्षकांचं आणखीन एक वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे त्यांच्याही नकळत त्यांच्याकडून होणारी 'कलामंडळा'ची प्रसिद्धी. होतं असं की कलामंडळात झालेल्या, रंगलेल्या कार्यक्रमांची चर्चा पुढे बरेच दिवस सदस्यांच्या मुखामुखातून सतत, सर्वत्र होत राहते. ही सर्वात मोठी आणि परिणामकारक मुखप्रसिद्धी (Mouth Publicity) कलामंडळाचे सदस्य सर्वदूर, विनामूल्य, मनःपूर्वक करत असतात. अशा प्रसिद्धीची ताकद कोणत्याही मोठ्यातल्या मोठ्या फ्लेक्सपेक्षाही खूपच मोठी असते. कारण ती निर्जीव असते, कलामंडळाच्या सदस्यांची माऊथ पब्लिसिटी सजीव, जिवंत, रसरशीत असते. अनेकदा बऱ्याच संस्थांचे भव्य फ्लेक्स गावभर झळकतात खरे, पण तरीही प्रत्यक्ष कार्यक्रमाला मूठभरच लोक येतात, तेही उशीरा! कार्यक्रमानंतर अल्पोपहार, भोजन असेल तर उशीराने ही गर्दी वाढते! कलामंडळाचे कार्यक्रम याला अपवाद असतात.

गेली ४४ वर्षं परिस्थितीच्या झंझावातात 'कलापिनी' टिकून राहिली आहे याचे कमाल श्रेय कलामंडळाला जाते. कलामंडळाची हीच अंगभूत ताकद (स्ट्रेंथ) डॉ. परांजपेंनी नेमकी ओळखली आहे. म्हणूनच तर ते सतत कलामंडळाबद्दल बोलत असतात. त्यांचे हे द्रष्टेपण आपल्याला मान्य करावेच लागेल!

एकदा कलामंडळात मराठी रंगभूमीवर तुफान गाजलेलं

'किमयागार' हे नाटक झालं होतं. प्रयोगादरम्यान एक विलक्षण घटना घडली होती. नाटकातील कलाकारांनी नाट्यप्रयोगात मध्येच एक छोटा विश्राम घेतला. नाटकाच्या निर्मात्या, सुप्रसिद्ध अभिनेत्री रंगमंचावर आल्या, अन्य कलाकारांसह. आणि मग त्यांनी 'कलापिनी'च्या योगदानाबद्दल, रसिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त अन् जोमदार प्रतिसादाबद्दल, झालेल्या गर्दीबद्दल मनःपूर्वक प्रशंसा केली. हे सगळं अचानक घडलं होतं, पण आजही तो क्षण तळेगावकरांच्या स्मरणात कायमचा कोरला गेला आहे. म्हणूनच.....

म्हणूनच 'आम्हाला कलेबद्दल कळवळा आहे' असे जाहीर कार्यक्रमात सांगणाऱ्या तमाम राजकीय नेत्यांना, सामाजिक कार्यकर्त्यांना, बिगर राजकीय मंडळांच्या प्रभावशाली, धनाढ्य व्यक्तींना विनंती करावीशी वाटते की तळेगावात सर्व सोयींनी युक्त ७०० आसनांचे नाट्यगृह उभं करणं हं आपण आपलं प्रथम कर्तव्य समजूयात. 'कलापिनी'साठी असं नाट्यगृह उभारलं तर तीच आपल्या गावाची एक अशी श्रीमंती ठरेल जिचा पुढील अनेक पिढ्यांना अभिमान वाटेल. डॉ. परांजपेंसारख्या 'ध्यासपुरूषा'च्या 'अनंत' ध्येयासक्तीस दिलेली ती एक अनुपम भेट ठरेल.

> खूपदा कार्यक्रमा अगोदरची बारीक सारीक व्यवस्था झालेली नसते. सारेच कार्यकर्ते, कलाकार, श्रोते इ. काहीशा बेसावध स्थितीत विस्कळीतपणे वावरत असतात. कलाकेंद्राच्या आवारात डॉ. परांजपे प्रवेशद्वारातून प्रवेश करताच क्षणात साऱ्या त्रुटी जाणून घेऊन सर्वात पहिल्या त्रुटीवर उच्च स्वरात सूचना देत कामास स्वत: प्रारंभ करतात ते सतरंज्या उचलत, खुर्च्या हलवत. तत्क्षणी सारेच्या सारे दिसेल त्या व अर्धवट कामावर तुटून पडतात. तेव्हा रंगमंच व रंगमंचामागील ऐदीपणा क्षणात दूर होतो. साऱ्या कलाकेंद्राचा नूरच पालटतो व थोड्याच वेळात येणाऱ्या आमंत्रितांमुळे कार्यक्रमास प्रारंभ कधी होतो, कार्यक्रम कसा रंगत जातो हे लक्षात येण्याअगोदर परत डॉ. परांजपे दुसऱ्या कुठल्या तयारीत मश्गुल असतात. वाटप निर्मिती, सादरीकरणातील 'नारायण' म्हणजेच डॉ. अ. शं. परांजपे होत. एका हातात कामांची यादी, तोंडाचा पत्ता व दुसऱ्या हाताने काम अशा अवतारात डॉ. परांजपेंना कलाकेंद्रात पाहणे, हाच जणू एक नयनरम्य महोत्सव असतो पाहणाऱ्यासाठी.

# कलादर्शिका : वर्षाचं भरगच्च आश्वासन



डॉ. अनंत शंकर परांजपे आणि सकल 'कलापिनी' सदस्य यांच्या धडपडीतून दरवर्षी मोठ्या दिमाखात, शानदारपणे 'वर्षान्त' कार्यक्रम तळेगावात संपन्न होतो. या कार्यक्रमाचं फार मोठं आकर्षण असतं 'कलापिनी'च्या कलादर्शिकेचा प्रकाशन समारंभ.

व्यवसाय म्हणून, जाहिरात म्हणून, चार पैसे मिळावेत म्हणून आणि खास बात म्हणजे आपली आणि आपल्या पिलावळीची छबी छापून आणण्यासाठी, स्वतःभोवती स्वतःच दिवे ओवाळून घेण्यासाठी कालदर्शिकेचे म्हणजेच कॅलेंडरचे प्रकाशन अनेकजण करत असतात; पण......

पण 'कलापिनी'ची कलादर्शिका मात्र यापेक्षा खूपच वेगळी, खास, वैशिष्ट्यपूर्ण आणि दर्जेदार असते. खरंच, 'कलापिनी'ची कलादर्शिका अद्भूतच म्हणावी लागेल. असतं तरी काय या कलादर्शिकेत? एक जानेवारी ते एकवीस डिसेंबर या ३६५ दिवसांमध्ये 'कलापिनी' कोणकोणते छोटे मोठे कार्यक्रम करणार आहे त्यांची माहिती असते या कलादर्शिकेत. कार्यक्रमांची संख्या सुमारे दोनशे! प्रत्येक कार्यक्रमाचं नाव, तारीख, वार, महिना यांचा सुस्पष्ट उल्लेख. कार्यक्रमाच्या स्थळाचाही उल्लेख असतो त्या माहितीत. ही सर्व माहिती अचूक असते. निःसंदिग्ध असते. खरंतर ते 'कॅलेंडर' नसतंच; तो असतो 'वचननामा' कलापिनीचा; वर्षभराच्या कार्यक्रमांबद्दलचा. विचार करा, दोनशे कार्यक्रम वर्षभर आधीच जाहीर करण्यासाठी किती सूक्ष्म, दूरवरचे नियोजन करावे लागत असेल! केवढं डोकं लढवावं लागत असेल!!

आज सर्वत्र सांस्कृतिक कार्यक्रमांचा क्षय झाल्याचे दिसून येते.

संख्या खूपच रोडावली आहे अस्सल सांस्कृतिक कार्यक्रमांची. कित्येक संस्था तर केवळ नामफलकापुरत्याच उरल्या आहेत. 'बालगंधर्व' सारखी नाट्यगृहे पूर्ण क्षमतेनं भरण्याचे योग कमी कमी होत चालले आहेत. अशा परिस्थिती ऊन येवो, वारा येवो, पाऊस येवो, (तो तर तळेगावात हमखास अन् भरपूर येतो!) पण 'कलापिनी'चा ठरलेला कार्यक्रम श्रोते, प्रेक्षक यांच्या उपस्थितीत संपन्न होणार म्हणजे होणारच. कसं काय घडतं हे सारं?

यासाठी 'कलापिनी'चं व्यवस्थापक मंडळ दर बुधवारी एकत्र येतं. बहुतेक सर्वजण उपस्थित असतातच. या बैठकीत नजिकच्या काळात होणाऱ्या कार्यक्रमांची पूर्वतयारी केली जाते, आखणी केली जाते. तपशील ठरविले जातात. जबाबदाऱ्यांचं वाटप होतं. जाहिरात, बैठक व्यवस्था, वृत्तपत्रांना निवेदन, अल्पोपहार, कार्यक्रमपत्रिका, हारगुच्छ भेटवस्तू, स्वागत, समारोप.... सारे सारे तपशील तयार केले जातात. प्रचंड होमवर्क होतं या बुधवारच्या बैठकीत.

....आणि मग, आणि मग ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी, नियोजित ठिकाणी कार्यक्रम सुरू होतो, वेळेत संपतोही. नंतरच्या आवराआवरीला स्वयंसेवी कार्यकर्त्यांची फौज जय्यत तयारच असते. बघताबघता सर्वकाही पुन्हा जिथल्या तिथं! हीच तर 'कलापिनी'ची ताकद आहे, हेच तर 'कलापिनी'चं आयोजनकौशल्य आहे. केव्हा घडू शकतं हे सारं इतक्या नीटनेटकेपणे! तेव्हाच.......

जेव्हा 'कुणा एकाच्याच' कमांडखाली सगळी सूत्र हलत असतात! हा 'कुणी एक' म्हणजे डॉ. अ. शं. परांजपे. हा 'कुणी एक' म्हणजे 'कलापिनी'. हा 'कुणी एक' म्हणजे 'कलापिनी'चे स्वयंसेवक. हा 'कुणी एक' म्हणजे 'कलापिनी'ची बोलकी दिनदर्शिका, कलादर्शिका!

डॉ. परांजपेंच्या दुर्लभ दृष्टीकोनातून आणि वाटेल तेवढे परिश्रम करण्याच्या मानसिकतेतून साकार होणारी कलादर्शिका तळेगावातील घराघरांमधील कुटुंबियांशी मूकसंवाद साधत असते आणि

त्या संवादातूनच ‘कलापिनी’चं नातं लोकांबरोबर दरवर्षी अधिकाधिक घट्ट होत जातं! ‘कलापिनी’ची कलादर्शिका घरात असणं अनेक तळेगावकरांच्या गर्वाचा विषय आहे!

खरंतर शेकडो कॅलेंडर्स एकट्या मराठी भाषेत दरवर्षी प्रकाशित होत असतील. पण ‘कलापिनी’च्या कॅलेंडरच्या प्रकाशनाचा थाटमाट काय वर्णावा? लाजबाब! केवळ लाजबाब!! दिमाखदारपणा. भव्यता. सुशोभित रंगमंच. उत्कृष्ट प्रकाशयोजना. तितकीच महागडी ध्वनीव्यवस्था. चहापानाचं आदरातिथ्य. उत्साह, आनंदाची कारंजी. सादरीकरणाच्या जास्तीत जास्त सर्वोत्तम गोष्टींचा समावेश. सर्वोच्च कलात्मक सादरीकरण. सलग तीन तासांचा, अवीट गोडीचा कार्यक्रम आणि सर्वात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ‘मंत्रमुग्ध’ श्रोते, प्रेक्षक! विविधतेने नटलेला हा कार्यक्रम दोनतीनशे कलाकार सादर करतात. उत्कृष्टतेचे सगळे आयाम् जणू त्याक्षणी ‘कलापिनी’च्या रंगमंचावर मोठ्या दिमाखात अवतीर्ण झालेले असतात. ‘दिवाळी पहाट’ आणि ‘वर्षान्त’ कार्यक्रमाचं तळेगावकरांना विलक्षण आकर्षण आहे, वर्षभर ते या दोन्ही कार्यक्रमांच्या ‘इन्तजारी’त असतात.

या कार्यक्रमांचा खर्च? भरपूर. प्रत्येकी अंदाजे ७० ते ८० हजार रुपये. शिवाय कलाकारांचं मानधन वेगळं. ‘कलापिनी’ हा एवढा खर्च कसा करू शकते? कुठून करते?

यासाठी ‘कलापिनी’ने दोन उदार प्रायोजक कायमस्वरूपी ठरवून टाकले आहेत. ‘दिवाळी पहाट’ हिंदविजय पतसंस्था सादर करते. वर्षान्त कार्यक्रम कृष्णराव भेगडे प्रतिष्ठान सादर करते. मा. श्री. रविंद्र दाभाडे, माजी नगराध्यक्ष आणि माननीय श्री. कृष्णराव भेगडे, माजी आमदार हे आपुलकीने आपले उत्तरदायित्त्व दरवर्षी आनंदाने पार पडतात. दोन्ही कार्यक्रमांना दोन्ही संस्थांचे. पदाधिकारी उपस्थित राहतात, साधेपणाने, स्वतःचा बडेजाव न दाखविता समोरील रसिक श्रोत्यांशी समयोचित शब्दात संवाद साधून कार्यक्रमाची शोभा वाढवतात.

'कलापिनी'सारख्या कलासाधनेस वाहून घेतलेल्या संस्थेने एखादा कार्यक्रम उत्कृष्टपणे सादर करावा यासाठी सौहार्दपूर्वक, साधेपणाने भक्कम आर्थिक पाठबळ देणाऱ्या राजकीय मंडळींना जोडून घेण्यात डॉ. अ. शं. परांजपे आणि श्री. विनायक अभ्यंकर यांचा वाटा सिंहाचा आहे.

राजकारण्यांशी अंतर ठेवून राहण्यापेक्षा सुशील, रसिक, उत्साही राजकारण्यांशी सुसंवाद साधून दोन अद्वितीय सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी दिवाळी व वर्षान्त दिवशी तळेगावकरांना गेली अनेक वर्षं मिळते आहे. यामागे डॉ. परांजपेंचे कमालीचे कौशल्य व मानवी स्वभावाचा अभ्यास आहे.

फ्रान्सच्या राजधानीतील - पॅरिसमधील - जगविख्यात वास्तू नोत्रादाम ही एक व्हिक्टर ह्यूगो यांच्या कादंबरीने जगभर ज्ञात झाली. हंचबॅक ऑफ नोत्रदाम या नावाने हा ग्रंथ जगभर गाजला व त्यामुळे नोत्रदामासाठी मोठ्या अभिमानाने १८३१ च्या सुमारास पॅरिसच्या नागरिकांनी आपल्या नगरीबद्दलच्या प्रेमाने - नोत्रादामासाठी - पुनरुज्जीवनासाठी अफाट साह्य केले. दुर्दैवाने १९ एप्रिल २०१९ रोजी र्यास प्रचंड आग लागून नोत्रादाम ही पॅरिसची संस्था बेचिराख झाली. तत्क्षणी पॅरिसच्या नागरिकांनी नोत्रादामच्या पुनरुज्जीवनासाठी अफाट मदत देण्यास प्रारंभ केला. मदतीचे जागतिक उच्चांक मोडले, जेव्हा पहिलीच मदत सातशे कोटी रुपयांची आली. त्यानंतर छोट्या-मोठ्या मदतीचा ओघ पॅरिसच्या रसिक, दिलदार नागरिकांनी निर्माण केला. पॅरिसियनांचा हा उदारपणा तळेगावकर प्रकट करू शकतील का?

मग तळेगाव दाभाडेतील एका कार्यरत संस्थेच्या - कलापिनीच्या थांबलेल्या, रेंगाळलेल्या रंगमंचनिर्मितीच्या कार्यास तळेगाव दाभाडेच्या साऱ्याच संवेदशील रसिक नागरिकांनी स्वत:स झेपेल, योग्य वाटेल ते आर्थिक साह्य कारण आपल्या नगरीच्या सांस्कृतिक श्रीमंतीस सर्वाधिक हातभार लावणाऱ्या कलापिनीच्या रंगमंचनिर्मितीत प्रत्येकाने खारीचा वाटत द्यावा, ही माझी अंत:करणपूर्वक विनंती आहे.

# चिराचिरा तो घडवावा



तळेगावात 'माणसं घडवणारा विलक्षण माणूस' म्हणून डॉ. अनंत परांजपे ओळखले जातात. प्रत्येकजणच तसा सतत घडत असतोच, भोवतालच्या वातावरणानं, घडणाऱ्या घटनांच्या परिणामानं, अगदी आपोआप. पण एखाद्याला प्रयत्नपूर्वक घडवण्यासाठी मात्र अगोदर स्वतःचं घडणं अत्यंत आवश्यक असतं. डॉ. परांजपेंच्या बाबतीत हे असंच घडलं. अगोदर ते घडले, मग इतरांना त्यांनी घडवले.

पुण्यातील शिवाजीनगरच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये त्यांचं शालेयजीवन सुरू झालं. पुढं मुंबईच्या रूपारेल महाविद्यालयात, नंतर पुण्याच्या ताराचंद मेडिकल कॉलेजात त्यांनी उच्च शिक्षण घेतलं. एव्हाना त्यांनी आपल्या उत्साही, विकसित, ऊर्जावंत व्यक्तिमत्त्वाचा परिचय भोवतालच्या सर्वांना घडवला होताच. मुळातच बोलका स्वभाव. स्पष्ट शब्दोच्चार. जोडीला अभ्यासूवृत्ती. त्यामुळे महाविद्यालयीन जीवनातलं त्यांचं 'प्रकटणं', तेही शाब्दिक सामर्थ्यावर, सर्वांनाच प्रभावित करणारं होतं.

खुद्द त्यांचे वडिलच एक उत्कृष्ट नाट्यकर्मी होते. उत्तम दिग्दर्शकही होते. त्यामुळे आज दिसणाऱ्या डॉ. अनंत परांजपेंची जडणघडण एका चांगल्या मुशीत झाली. प्रत्येक दिवशी प्रत्येक संधीगणिक सर्व माध्यमातून स्वतःला घडविण्याची एकही संधी त्यांनी वाया घालवली नाही. त्यामुळेच ते एक उत्कृष्ट अभिनेता, कलाकार, दिग्दर्शक म्हणून सर्वांना परिचित होत गेले. त्यातूनच मग इतरांनाही घडविण्याची एकएक संधी त्यांना खुणावू लागली. तेही पुढे सरसावले; मिळालेल्या संधींचा वापर करून इतरांचीही जडणघडण करू लागले.

त्यातच कालांतराने 'कलापिनी'च्या अवाढव्य कार्यक्षेत्रावर

त्यांची हुकूमत प्रस्थापित झाली. मग काय, माणूस घडविण्याची एक उत्कृष्ट पाठशाळा म्हणजे ‘कलापिनी’ ओळखली जाऊ लागली. ‘कलापिनी’ची ही ओळख सर्वदूर पोहोचविण्यात मग ते चांगलेच रंमले, गुंतले.

चिमुकल्यांचं बालभवन, होतकरूंचं कुमारभवन, प्रस्थापितांचं कलामंडळ, ज्येष्ठांचा हास्यक्लब, कलापिनी अशा विविध माध्यमांमध्ये ‘प्रकटणे’, ‘व्यक्त होणे’, स्वतःची वाचिक शक्ती विकसित करणे, मुद्राभिनय आत्मसात करणे आणि यातूनच आपलं स्वतःचं व्यक्तित्त्व हळूहळू विकसित करणे यातच डॉ. अ. शं. परांजपे अहोरात्र रमलेले असतात. पण ते इथेच थांबत नाहीत. ते आणखीन दोन पावलं पुढं जातात. कसे? तर.....

त्यांना कुठंही टॅलेंट आढळलं की ते कसे वाढीला लागेल, ‘कलापिनी’च्या जादूई परीसस्पर्शानं त्या टॅलेंटचे झळाळते सुवर्ण कसे होईल याचा ध्यास त्यांना सतत लागलेला असतो. म्हणूनच ते ‘ध्यासपुरूष’. म्हणूनच ‘कलापिनी’चं गेल्या ४४ वर्षांचं पर्व म्हणजे ‘ध्यासपर्व’.

कोणाही नवख्या पण भरपूर नैसर्गिक गुणवत्ता असलेल्या व्यक्तीला ते प्रथम हेरतात. त्याच्याशी सलगी वाढवतात. त्याला आश्वस्त करतात. कौतुकाच्या शब्दांनी त्याला फुलवतात. अशा व्यक्तीस व्यक्त होण्यासाठी कोणते माध्यम, कोणता मंच, कोणता उपक्रम उपकारक ठरेल याचा अंदाज घेतात. योग्यवेळी त्या व्यक्तीस ते त्या मंचावर सादर करतात. त्यातूनच मग त्याची स्वतःची गुणवत्ताजाणीव ते विकसित करतात. त्याला त्याची ‘ओळख’ मिळते. स्वतःच्या क्षमतांचा अंदाज येतो. एकदोन कार्यक्रमांच्या निमित्ताने अशा होतकरू कलाकाराला एकदा का Start up मिळाला की मग जातिवंत कलाकार असलेली व्यक्ती हळूहळू स्वतःमधील उत्तमाचा शोध घेऊ लागते. असे अनेक बाल, किशोर, तरुण, मध्यमवयीन, प्रौढ, ज्येष्ठ नागरिक ‘कलाकार’ म्हणून ‘कलापिनी’त घडले आहेत.

घडत आहेत, यापुढेही घडतील.  माणूस घडविण्याची ही प्रक्रिया, ही किमया डॉ. अनंत परांजपे २४ X ७ या तत्त्वानुसार सदैव चालूच असते.  मी या प्रक्रियेचा गेल्या १५ वर्षांचा साक्षीदार आहे.  डॉक्टरांनी 'कलापिनी'च्या आजच्या सर्व कार्यरत सर्ववयींना कधी ना कधी, कुठल्या ना कुठल्या प्रकारे 'घडण्याची', 'व्यक्त होण्याची' संधी दिली आहे; तेही अगदी सहजपणे, निःस्वार्थीपणे!

म्हणूनच त्यांच्या कार्याचे कौतुक झाले.  त्यांना 'मावळभूषण' पुरस्कार प्राप्त झाला.  एक लाख रूपयांचे पारितोषिक देऊन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते देवदुर्लभ सत्कार करण्यात आला. आमदार मा. श्री. दिगंबर भेगडे यांनी हे सर्व घडवून आणलं.  त्यावेळी उपस्थितांनी डॉ. अ. शं. परांजपेंचा केलेला गगनभेदी जयघोष आणि पुष्पवृष्टीच्या स्मृती मनःपटलावर अजूनही ताज्या आहेत.  एखादा पुरस्कार त्या व्यक्तीच्या उत्तुंग कार्याची दखल तर घेतोच, पण पुढे आणखीन उत्तम कार्य करण्याची प्रेरणाही देतो.  प्रत्यक्षात बरेचजण तो पुरस्कार म्हणजे अल्पविराम, पूर्णविराम समजून हळूहळू निष्क्रियच होत जातात.

पण डॉ. परांजपेंनी मात्र 'मावळभूषण' पुरस्काराच्या रकमेत स्वतःची भर घालून ती रक्कम 'कलापिनी'स देणगी म्हणून तर दिलीच, पण त्या पुरस्काराच्या वितरणदिनापासून ते आजपर्यंत अखंडपणे वाढत्या श्रेणीत कार्यरत आहेत.  याच काळात त्यांना दोनवेळा हार्ट ॲटक आला.  एक हृदयशस्त्रक्रिया झाली.  तरीही त्यांचा उत्साह आणि विजिगिषुवृत्ती कणभरही कमी नाही झाली.

असा हा उत्साहाने तुडुंब भरलेला, जीवन समरसून जगण्याच्या ऊर्मीने भारावलेला माणूस इतर असंख्य जणांना प्रेरणा देऊन जाईल यात नवल ते काय?

'डॉक्टर परांजपे - नाटकाच्या शाळेत कलाकाराबरोबरच माणूसही घडवणारे 'चितळे मास्तर'.'- **सौ. मीनल कुलकर्णी,** ९८८१६७४८७५

# मुलाखती: एक शब्दोत्सव




'कलापिनी'त वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची एक शृंखला सतत जोडली जात असते. त्यातलाच एक कार्यक्रम 'प्रकट मुलाखत'. या कार्यक्रमात नाट्य, कला, चित्रपट अशा विविध क्षेत्रांमधील प्रसिद्ध, दिग्गज कलावंतांच्या मुलाखती घेतल्या जातात. 'कलापिनी'तील हा 'प्रकट मुलाखती'चा कार्यक्रम सहसा कुणीही चुकवत नाही. खरंतर मुलाखत घेणारे अनेकजण असतात. ते छानपैकी घेतातही मुलाखत. पण......

पण डॉ. परांजपेंचं मुलाखत घेण्याचं कौशल्य जगावेगळं आहे, अफालतूनच आहे. 'कलापिनी'त वेळोवेळी अनेक मुलाखती घेऊन घेऊन ते आता त्या तंत्रात इतके मुरले आहेत की जेव्हा मुलाखत देणाऱ्याला कळतं की त्याची मुलाखत डॉ. परांजपे घेणार आहेत तेव्हा तो विलक्षण खुश होतो. डॉ. परांजपे घेत असलेल्या मुलाखतीचा थाटमाट काही वेगळाच असतो. ती हळूहळू रंगत जाते, खुलत जाते. कुणीही कंटाळत नाही, मध्येच उठून निघून जात नाही, वा नापसंती दर्शवत नाही. हशा, टाळ्या, वाहव्वा, इत्यादींनी चिंब भिजलेली ती मुलाखत कधी संपूच नये असं श्रोत्यांना वाटत असतं!

मुलाखत देणारा त्याच्या क्षेत्रातला 'दादा' कलाकार. मुलाखत घेणारा पक्का मुरब्बी आणि मुलाखतीतील शब्दाशब्दाला दाद देणारे, त्या कलाकाराच्या गुणवत्तेस हशा, टाळ्यांनी उचलून धरणारे रसिक श्रोते! असा हा त्रिवेणी संगम. डॉ. परांजपे, प्रमुख पाहुणा अन् श्रोते यांची केमिस्ट्री विलक्षण रंगते, रंगते आणि एका क्षणी ती संपते. पण......

पण फिजिकली संपलेली ही मुलाखत. श्रोत्यांच्या मनात मात्र

पुढे कितीतरी दिवस रूंजी घालत असते. ‘कलापिनी’त वर्षभरात मुख्य मुलाखतींचे स्वतंत्र कार्यक्रम जसे होतात तसेच वर्षभर चालणाऱ्या इतर २०० कार्यक्रमांमध्येही अधूनमधून छोट्या छोट्या मुलाखती होतच असतात. या सर्वच मुलाखतींचा एकत्र विचार केला तर ‘कलापिनी’च्या व्यासपीठावर वर्षभर जो रंगतदार ‘शब्दोत्सव’ होत असतो तो केवळ तळेगाव दाभाडेतच आणि ‘कलापिनी’तच अनुभवावा इतका तो वैशिष्ट्यपूर्ण असतो. या मुलाखतींच्या रम्य आणि संस्मरणीय आठवणी पुढे अनेक दिवस तळेगावात गटागटात चर्चील्या जातात. हे असं केवळ याच गावात घडतं. कारण अशा अनेक मधुर मुलाखतींचे योग घडवून आणणारे ‘मुलाखत बहादूर’ श्री. अ. शं. परांजपे आहेत या गावात. त्यांचं मुलाखत कौशल्य दिवसेंदिवस वर्धिष्णु होत आहे, विकसित होत आहे, बहुरंगी, बहुढंगी होत आहे. त्यांनी घेतलेल्या मुलाखती ऐकून व पाहून भावी मुलाखतकारांची जडणघडण होत आहे, एक अनुकरणीय आदर्श त्यांच्या नजरेस पडतो आहे.

**डॉ. अ. श. परांजपेंविषयी काही हृद्य प्रतिक्रिया**


‘डॉक्टरकाका... दारारा...शिस्त.....प्रेम...
खरंतर या तिन्ही गोष्टी एका व्यक्तीने सहजपणे हाताळणं खूप अवघड आहे, पण काकांकडे पाहिलं की या तिन्ही गोष्टी एकत्र शांतपणे होऊ शकतात यावर विश्वास बसतो. एक आदर्श व्यक्तिमत्त्व!’

**– अपूर्वा प्रशांत मांडे,**
९०११८९२२८३

‘अनेक चक्रीवादळांचा खंबीरपणे सामना करत आपली मुळं घट्ट रोवून उभं असलेलं आणि इतरांना ही आधारवड झालेलं, सदाहरित झपाटलेलं अस्वस्थ झाड म्हणजे ‘डॉक्टर’.’

**– विराज सवाई,**
९५६१३०१६५३

# डॉ. अ. शं.ची सम्यकवृत्ती



डॉ. अ. शं. परांजपे आपल्या आवडत्या वैद्यकीय व्यवसायात आणि 'कलापिनी'च्या विकासाच्या ध्यासात आकंठ बुडालेले असतात. त्यासाठीची प्रचंड ऊर्जा त्यांना इतकी वर्षं कशी मिळते, कुठून मिळते हे मोठंच कोडं आहे. कार्यशक्तीचा हा अखंड झरा सतत वाहता राहण्याचं कारण माझ्या आकलनानुसार बहुदा हे असावे की......

डॉक्टरांची सम्यकवृत्ती. मानवी स्वभावास धरून डॉ. परांजपेंना उघडपणे जरी नाही तरी छुप्या पद्धतीने विरोध करणारे असतात, नाही असे नाही. पण डॉक्टरांसमोर त्यांची मात्रा फारशी चालत नाही. मोठी आश्चर्याची बाब म्हणजे, डॉ. परांजपेंच्या चाणाक्ष जाणीवांना हा विरोध चटकन कळतोही. पण ते मात्र न कळल्यासारखं करून पुढे जातच राहतात. त्यामुळे त्या छुप्या विरोधकांची मात्र फजिती होते.

काहीजण 'कलापिनी'च्या जोरावर, आधारावर, 'कलापिनी'च्या प्रोत्साहनाने कलाक्षेत्रात खूपच पुढे गेले. नंतर त्यांच्याही नकळत किंवा कधीकधी जाणीवपूर्वकही अन्य संस्थेत गेले. कदाचित अन्य संस्थेतील आकर्षणांचा, प्रलोभनांचा हा परिणाम असेल; पण ते अन्यत्र गेले. त्या संस्थेत ते चमकलेही. पण या साऱ्या घटनांबद्दलची कणभरही नाराजी डॉ. परांजपेंनी कधीही व्यक्त केली नाही. उलट त्यांच्या कलागुणांची जमेल तितकी वाहवाच केली, कौतुकच केले, प्रसंगी पाठ थोपटून, गडगडाटी आवाजात त्यांची स्तुतीच केली. मी म्हणतो ती डॉ. परांजपेंची हीच ती सम्यकवृत्ती.

काहीजण त्यांच्याविषयी नापसंतीचे बोल कुठे कुठे बोलतात. पण डॉक्टर तिकडे लक्षच देत नाहीत. अशा बोलण्याकडे ते साफ दुर्लक्ष करतात. बोलणाऱ्यांना मागे टाकून ते पुढे पुढे जातच राहतात. कधीकधीतर कहरच होतो. माणूस म्हणून डॉक्टरांच्या कार्यात जेवढे म्हणून अडथळे आणता येतील तेवढे अडथळे आणले जातात. पण डॉ. परांजपे त्या सर्वांना मोठ्या उदार अंतःकरणाने क्षमा करतात. प्रसंगी त्या लोकांच्या गुणवत्तेचा उपयोग 'कलापिनी'साठी कशाप्रकारे करून घेता येईल याचाच विचार ते करतात! विरोधकांबद्दल नाराजी, दुस्वास व्यक्त करणं तर दूरच; उलट प्रेमानं, क्षमाशीलतेनं त्या सर्वांना परत 'कलापिनी'शी जोडून घेण्याचं विलक्षण कौशल्य त्यांच्याकडे आहे. हीच त्यांची सम्यकवृत्ती!

आपल्या या असामान्य गुणामुळे निराश होणे, दुर्मुखणे, नाराज होणे, रागावणे, खंतावणे या मानवी विकारांपासून त्यांनी स्वतःला जाणीवपूर्वक दूर ठेवले आहे. आपल्या या पॉझिटिव्ह विचारांमुळेच तर इतकी वर्षं सातत्यानं काम करत राहण्याची अजस्त्र ऊर्जा ते बाळगू शकले आहेत. खरंच, त्यांचा हा गुण असामान्य आहे. मला स्वतःला हे असं इतकं समतोल वागणं कधीच जमलं नाही. म्हणूनच तर त्यांचा एक 'चाहता लेखक' या नात्यानं मी त्यांना दंडवत घालतो!

डॉ. अ. शं. परांजपेंबद्दल खुद्द 'कलापिनी' परिवारातच काहीशा तक्रारी आहेत. मात्र या तक्रारी दबक्या आवाजात व कलाकेंद्राच्या बाहेर कुठेतरी, कुणाच्या तरी घरी अथवा सोईच्या ठिकाणीच ऐकू येतात. या सर्व तक्रारीतून उमटणारे शब्द काळजीपूर्वक ऐकले, डॉ. अ. शं. परांजपेंचं एकूण कार्यकर्तृत्त्व समजावून घेतले, त्यांच्या प्रेरणा, ध्येयं जाणली, भविष्यकालीन स्वप्न जाणली, तक्रारदारांची या एकूण प्रक्रियेतील भूमिकाही समजावून घेतली तर खूप मजाच वाटेल. त्यातील मानवी मनाचे, महत्त्वाकांक्षेचे, इर्षावृत्तीचे, कमकुवतपणाचे, ऱ्हस्वदृष्टीयुक्त मनोरचनेचे, दुसऱ्याचा मोठेपणा, कर्तृत्व मान्य न

करण्याची मानवी दुराग्रहीवृत्ती (कुठेतरी अधिक चांगले व्हावे ही तीव्र इच्छा) या साऱ्या मानवी मनोव्यापारांचे दर्शनच घडते व त्यामुळे डॉ. अ. शं. परांजपेंची 'कलापिनी' संस्थेविषयीची अव्यभिचारी निष्ठा, असीम प्रेम व उज्ज्वल भविष्याची अफाट स्वप्ने पाहाण्याची क्षमता आणि मुख्य म्हणजे एकएक माणूस घडत जावा ही अपार इच्छा इत्यादी गोष्टी आपल्या लक्षात येतात व डॉ. परांजपेंचे एक आगळे वेगळे पण लोकोत्तर व्यक्तित्त्व अंतर्मनाला स्पर्श करून जाते. म्हणजे तक्रारदारांमुळे डॉ. परांजपेंच्या प्रत्येक कृतीमागे दडलेल्या भावभावनांकडे बघण्याचाही एक छान दृष्टीकोन सापडतो, विचारी व विवेकी मनाच्या सामान्य जनास.

प्रत्येक कार्यक्रम हा पूर्वीच्या कार्यक्रमापेक्षा नेटका, परिणामकारक व उद्दिष्टांपर्यंत जाणारा असावा ही त्यांची प्राथमिक व प्रबळ इच्छा असते. त्यामुळे ते कलाकार, कलाकृती संबंधिक सर्वांवर एक अदृष्य दडपण आणतात, आपल्या देहबोलीने, शब्दांनी! सारे कार्यक्रम सर्वांना नीट पाहाता यावेत, वयोवृद्धांसाठी नीट बैठक व्यवस्था व्हावी, तरुणांनी शक्यतो पुढे भारतीय बैठकीवर बसावे, म्हणजे कार्यक्रमात दूरून उशीरा येणाऱ्यांनाही मर्यादित बैठक व्यवस्थेत जागा मिळावी, सर्व कार्यक्रम एकापाठोपाठ एक तयार असावेत, सारे जबाबदार त्या त्या स्थानांवर कार्यरत असावेत. सर्वांना नीट ऐकू यावे व दिसावे यासाठी साऱ्या व्यवस्था, पिण्याचे पाणी, मध्यंतरातील अल्पोपहार, टॉयलेटस्, अस्ताव्यस्त पार्किंगच्या गाड्या इत्यादी साऱ्या गोष्टी एका समयी जळून येऊन नाट्याचा, गाण्याचा किंवा कुठल्याही सादरीकरणाच्या अत्युत्तम बिंदूस कार्यक्रम पोहोचावा (Climax) व श्रोत्यांना आपण दिलेल्या प्रवेशमूल्यात पुरेपूर समाधाना लाभले, याचा आनंद व्हावा म्हणून त्यांचा जीव अतोनात धडपडत असतो. हे सारे परत कलापिनीच्या तुटपुंज्या आर्थिक व्यवस्थेत करायचे याची सूक्ष्म पण जबरदस्त जाणीव डॉ. अ. शं. परांजपेंना अहर्निश असावी, जशी एखादी गृहिणी घराचा गाडा आहे त्यात, फटी उघड्या न करता मनोभावे

व बऱ्याचदा मूकपणे करीत असते. विख्यात लेखक वि. स. खांडेकर आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात, 'माणूस उच्च श्रेणीच्या स्वप्नांच्या पाठलागात धडपडत, ठेचकाळत, रक्तबंबाळ पायाने जातच असतो, एक स्वप्न साधले की दुसऱ्या स्वप्नाच्या पाठलागात परत त्याच रक्तबंबाळ पायांनी धावत असतो नव्या स्वप्नांकडे' मला डॉ. अ. शं. परांजपेंच्या ४४ वर्षांच्या अथक धावपळीकडे, त्यांना झालेल्या शारीरिक आजारांचे आघात, कलापिनीच्या रंगमंचाचे स्वप्न काहीसे रेंगाळलेले पाहात राहणे, कलामंडळाचे सदस्य कधी व कसे वाढतील यासाठी दिवसरात्र प्रत्येकक्षणी त्याचे सूतोवाच करीत राहणे आणि हे करतानाच 'कलापिनी'चे कलाकेंद्र एक दर्जेदार, सुस्वरूप, देखण्या रूपात पाहाण्याच्या स्वप्नात ते धावत आहेत, धावत आहेत.

मला वाटते तक्रारदारांमुळेच डॉ. अ. शं. परांजपेंच्या अथक, ध्येयासक्तीकडे लक्ष जाते व मग लक्षात येते ते तक्रारदारांची अदूरदृष्टीता, भव्य दिव्य स्वप्न पाहाण्याच्या वृत्तीचा अभाव, आपण कां करू शकत नाही या विजिगिषुवृत्तीचा अभाव, मुख्य म्हणजे अहर्निश धडपडणाऱ्यांचे ठेचकाळणे, पडणे, अडथळे न पाहता त्यांची ध्येयनिष्ठा व त्यासाठीचा प्रयत्नांचा डोंगर उभा करण्याच्या निस्वार्थीवृत्तीकडे दुर्लक्ष करण्याचा अप्रामाणिकपणा व मानवी संवेदनांचा अभावच कला तक्रारदारांमध्ये कधीकधी जाणवतो. व्यक्तीदोष हे राहणारच. जास्त कार्य करणाऱ्याचे जास्त दोषही दिसतात. पण हे जाणण्याची प्रगल्भता तक्रारदारांनी अंगिकारली तर तक्रारदार एके दिवशी 'कलापिनी'चे निः स्वार्थ आधारस्तंभ बनून डॉ. परांजपेंचे स्वप्न 'वास्तव' कधी झाले ते कळणार नाही.

एखादा जेव्हा ध्येयनिष्ठेने एखाद्या कामास प्रारंभ करतो, तेव्हा तो माणूस स्वयंभू, परिपूर्ण नसल्याने काही दोष, त्रुटी संभवतात. तसेच यंत्रणेतील काही व्यक्ती त्यांच्या क्षमतेत कमी पडल्याने, काहींनी युक्तीप्रयुक्तीने कामापेक्षा श्रेयाकडे सारे लक्ष केंद्रित केल्याने, काहींना परफॉरमन्स होण्या अगोदरच कीर्तीची अनिवार इच्छा असल्याने, कामाचा

मोबदला पाहिजेच असा सुप्त व अंतस्थ भान घेऊन हौशी नाट्यसंस्थेत येणारे काही असल्याने व काही कितीही चांगले असले तरी मनात औदार्याचा, खऱ्याखुऱ्या रसिकतेचा अभाव असल्याने वाहवा ऐवजी सहजपणे अरेरेच म्हणून आपले अंतरंग उघडे पाडणारे असतात. अशा अनेकांमुळे हाती घेतलेले संस्थात्मक (Collective or institutional) काम तेवढी उंची गाठू शकत नाही. म्हणूनही काहीवेळा मनःपूर्वक धडपडणाराही टीकेचा धनी होतो.

सर्वच संस्थांमध्ये तीन प्रकारचे लोक ओळखू येतात –

१ मी, माझे स्वतःचे स्थैर्य, प्रगती, लाभ अगोदर पाहाणार मग संस्थेचा विचार करणार.

२ मी, माझे स्वतःचे सारे लाभ, फायदे तर पाहाणारच, त्याचवेळी संस्थेचं भलं कशात आहे हेही पाहाणार, म्हणजे मी संस्थेइतकाच महत्त्वाचा राहणार.

बरेचसे लोक या वरील दोन गटात मोडतात हेच आपल्या समाजात सार्वजनिक संस्था दीर्घकाळ न टिकण्याचं कारण आहे.

मात्र पुढचा माणसांचा गट वरील दोन्ही गटांपेक्षा वेगळा असतो. तो असा –

३ माझ्या अगोदर संस्थेचे हित, माझ्यापेक्षा संस्था श्रेष्ठ, संस्था भरभराटीस आणणे माझे जीवितध्येय, मग संस्थेच्या उत्कर्षात माझे भले होईलच अशी वृत्ती असणारे दुर्मिळात दुर्मिळ, अशांमुळेच तर संस्था घडतात, रुजतात, पाळेमुळे धरतात, वर्षानुवर्षे कार्यरत राहून समाजात मानाने मिरवतात. उदा. पुण्याचे नगरवाचन मंदिर, भांडारकर प्राच्यविद्या मंदिर, प्रोग्रेसिव्ह ड्रामाटिक असोसिएशन, जागर, भरत नाट्यमंदिर, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी व अशा अनेक संस्था दिसतात. (फ्रान्स मित्रमंडळ, वसंत व्याख्यानमाला)

डॉ. परांजपे हे ह्याच पठडीतले आहेत. 'He is an institution in the institute' ते एका संस्थेतील एक संस्था आहेत असे रँगलर डॉ. रघुनाथ परांजपेंना फर्ग्युसन कॉलेज संदर्भात म्हटले जाई – म्हणून

मला, दोषारोप स्वीकारूनही, स्वच्छ मनाने म्हणावेसे वाटते, 'डॉ. अ. शं. परांजपे is an institution'. अशी व्यक्तित्त्वे विरळ असतात. त्यांच्या कार्यकाळातच त्यांना हव्या त्या सुविधा, पैसा, जागा, सामग्री दिली तर ते आपल्या आयुष्यकाळातच आपले निजीस्वप्न प्रत्यक्षात आणतील. सूज्ञ व समंजसांना हे आवाहन पटेल असे वाटते.

कलाक्षेत्र व राजकारण यांची दोस्ती शहाण्यांनी करू नये असे सर्वमान्य मत आहे. पण डॉ. परांजपेंनी राजकीय व्यक्तिंच्याच सहकार्याने अद्वितीय असे सांस्कृतिक सोहळे भव्य प्रमाणात करण्यात फार मोठा पुढाकार घेतला, तेही तब्बल १० वर्षाहून अधिक काळासाठी. हे एक आदिवितीय उदाहरण आहे.

दिवाळीपहाट म्हणजे गाण्यांचा कार्यक्रम. पण हा त्या कार्यक्रमाचा आयामच बदलून टाकला. डॉ. अ.शं. परांजपेंच्या खास नेतृत्व गुणाने कलाकार व राजकारणी यांची आवळ्याची मोट बांधण्याचे कसब हे डॉ. परांजपेंचे मोठे बलस्थान. 'हिंदविजय पतसंस्था' या तळेगाव दाभाडेतील आघाडीच्या पतसंस्थेशी सहयोग करून दिवाळीपहाटचा कार्यक्रम एवढा भव्य प्रमाणात, कलेची सारी किमया विविध कार्यक्रमातून पण अतिशय झगमगाटात सदर करीत एक भव्य दिव्य दिवाळी पाहत तळेगाव दाभाडेच्या रसिकांसाठी जणू ऑस्कर, कान पुरस्कार समारंभासारखीच 'ग्लॅमरस' असते. याचे श्रेय जाते विपुल अर्थपुरवठा करणाऱ्या हिंदविजय पतसंस्थेस व राजकीय पुढाऱ्यांना, त्याच वेळी त्यांचा यथोचित सन्मान करण्यात कुठलीच न्यूनता येऊ न देणाऱ्या डॉ. अ. शं. परांजपेंच्या दक्ष व्यवस्थापनास हे श्रेय जाते. हे सारे राजकीय पुढारीही आपली राजकीय वस्त्रे सभागृहाबाहेर ठेवून निखळ कलाप्रेमानेच कार्यक्रमात रसिक वृत्तीने सहभागी होतात. हा प्रसंग डॉ. अ. शं. परांजपेंच्या नेतृत्वगुणाचा एक अनोखा अविष्कार आहे.

त्या 'दिवाळी पहाट' पेक्षाही काकणभर अधिकच श्रेष्ठतेने घडणारा, प्रतिज्ञा करायला लावणारा कार्यक्रम म्हणजे वर्षांत महोत्सव, ३१ डिसेंबरची सायंकाळ. तळेगाव दाभाडेचे माजो आमदार श्री. कृष्णराव भेगडे यांच्या कन्येने व जावयाने निर्माण केलेल्या प्रतिष्ठानच्या द्रव्य साहाय्यातून वर्षांतचा भव्य दिव्य, कलासंपन्न कार्यक्रम म्हणजे वर्षाचा शेवट व नववर्षाचे आगमन मोठ्या धुमधडाक्यात होते. या कार्यक्रमाचा मोठा खर्च ही संस्था गेली कित्येक वर्षे उचलत आहे. त्यामुळे रसिकांना वर्षभर रंजनस्मृतीच्या धुंदीत ठेवणारा कार्यक्रम राजकीय व्यक्तिंच्या पाठींब्यानेच केला जातो पण यात राजकीय मंडळी पूर्ण कलाभान राखूनच यात सहभागी होतात हे विशेष. डॉ. अ. शं. परांजपेंच्या नेतृत्वाचा हा एक पैलू.

## सकलजन मैत्र

डॉ. अ. शं. परांजपेंचा बालपणीचा काळ तळेगाव दाभाडेतच गेला. त्यांचे वडील कै. डॉ. शंकर वासुदेव परांजपे आणि आई कै. डॉ. मंगला शंकर परांजपे हे दोघेही तसे तळेगावकरच झालेले. दोघेही डॉक्टर. एकाच व्यवसायात रमलेले. दोघांचीही रुग्णसेवा उत्तम प्रकारे चाललेली. त्यांचा मुलगा अनंत. हा अनंत इयत्ता पाचवीपासूनच तळेगाव ते पुणे आणि परत पुणे ते तळेगाव हा प्रवास लोकल ट्रेनने करत असे, आपल्या भावंडांसह! विख्यात लेखक कै. श्री. गो. नी. दांडेकरही त्याकाळी त्याच लोकलने पुण्याला जा-ये करीत असत.

अनंत पुण्यातील शिवाजीनगर भागातल्या मॉडर्न हायस्कूलमधून मॅट्रिक - म्हणजे एस.एस.सी. - परीक्षा उत्तीर्ण झाला. मग मुंबईच्या रूपारेल महाविद्यालयातून त्यानं प्री-प्रोफेशनल - म्हणजेच F.Y. B.Scची परीक्षा दिली. पुढे ताराचंद मेडिकल आयुर्वेद महाविद्यालयातून तो B.A.M.S. उत्तीर्ण झाला. लगोलग M.B.B.S.चा कन्डेन्सड् कोर्स पूर्ण करून त्यानं LCPS हि केलं. आता तो नुसता ‘अनंत परांजपे’ न राहता ‘डॉ. अनंत परांजपे’ झाला होता. पण......

पण अकस्मात वडील डॉ. शं. वा. परांजपेंचं हृदयविकाराने निधन झालं! आपद्धर्म म्हणून डॉ. अ. शं. परांजपेंना काही दिवसातच वडिलांची खुर्ची स्वीकारावी लागली. तळेगावातच त्यांनी वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ केला. हळूहळू व्यवसायात चांगलाच जम बसला. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांनी वक्तृत्त्व, नाट्य, अभिनय, संवाद या प्रांतात कौशल्य मिळवलं होतंच. त्यांचं व्यक्तिमत्त्व रुबाबदार होतं. वाणीवर हुकूमत होती. नाट्याभिनयाची नैसर्गिक जाण होती, आवड होती; ओढही होती. त्यामुळे वडील डॉ. शं. वा. परांजपे आणि तळेगावातील अन्य धुरीणांनी स्थापन केलेल्या ‘कलापिनी’ या नवजात नाट्यसंस्थेच्या कार्याला त्यांनी वाहून घेतले. हळूहळू ‘कलापिनी’ त्यांचं ‘जगणं’ झालं. तेव्हापासून......

होय, तेव्हापासून ते थेट आज, आत्ता याक्षणी हे पुस्तक लिहित असलेल्या क्षणापर्यंत डॉ. अ. शं. परांजपे 'कलापिनी'शी तनमनाने जोडले गेले आहेत, गेली ४४ वर्षं! इतकी वर्षं सातत्याने एकाच संस्थेसाठी देणं ही खरंच अलौकिक घटना आहे; अभूतपूर्व काम आहे! आपलं सर्वस्व अर्पण करून आणि सहकाऱ्यांच्या मदतीनं त्यांनी 'कलापिनी'चा लौकिक तळेगावात, महाराष्ट्रात, इतकेच नव्हे तर इंग्लंड, कुवेत, ऑस्ट्रेलिया, अमेरिकेपर्यंत नेऊन पोहोचविला. हे सगळं खरंच अद्‌भूत आहे, थक्क करणारं आहे, अचंबित करणारंच आहे.

डॉ. अ. शं. परांजपे सकल तळेगाव दाभाडेशी घट्ट बांधले गेले आहेत. सर्व थरातील सर्वांशी ते सहजमैत्रीने जोडले गेले आहेत. तळेगावातला प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या कारणाने डॉ. अ. शं. परांजपे यांच्याशी स्नेहबद्ध झाला आहे. डॉक्टर म्हणून रूग्णांशी, नागरिक म्हणून तळेगावकरांशी, कलाकार म्हणून रसिकांशी, वक्ता म्हणून श्रोत्यांशी, सुहृद नेता म्हणून कार्यकर्त्यांशी ते घट्टघट्ट बांधले गेले आहेत. त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाच्या अंगभूत गुणांना फुलविण्यासाठी 'कलापिनी'च्या सर्वच शाखांचा कमाल उपयोग त्यांनी करून घेतला आहे. शेकडो जणांचं व्यक्तिमत्त्व घडविण्यात, शेकडो कलाकारांच्या कलेला फुलविण्यात डॉक्टरांचा वाटा सिंहाचा आहे. हे असं इतरांना विकसित करण्याचं काम केल्यानं तळेगावातील अक्षरशः तीन पिढ्या डॉ. परांजपेंच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडल्या गेल्या आहेत.

म्हणूनच म्हणावंसं वाटतं की, डॉक्टरांचं हे 'सकलजन मैत्र' फारफार थोड्यांजवळ असतं, दुर्मिळ असतं ते. ही अशी व्यक्ती आपल्या तळेगाव दाभाडेसाठीच नव्हे तर एकूणच समाजासाठी एक फार मोठं संचित असतं; वैभव असतं.

'डॉक्टर म्हणजे उत्साहाचा धबधबा आणि कळकळीचे मार्गदर्शक/ शिक्षक.' – **सौ. ज्योती अजित गोखले,** ९८९०४३५८३२

# एका घराची गोष्ट

तळेगाव दाभाडे तसे ऐतिहासिक पार्श्वभूमीचे नेटके शहर. विठ्ठल मंदिराच्या मार्गावर एक नितांत सुंदर वैभवशाली भूतकाळ होता व मी तो २००५ पर्यंत राहिला. एकाच चिंचोळ्या रस्त्यावर त्यावेळच्या तळेगावची संस्कृती व भक्ती एकवटलेली होती. श्रद्धेचे माहेर विठ्ठल मंदिर, केंद्रभागी राहून अलीकडे - पलीकडे जुन्या ऐतिहासिक वास्तू एक मूक संवाद गावकऱ्यांशी साधत होत्या. त्या तशा बोलक्या वास्तू आणखीन एक वास्तू कै. शं. वा. परांजपे यांचे भव्य राहाते घर.

यंदा त्या घराची षष्ट्यब्दी (वयाची साठ वर्षे) झाली हे मला फार भावते.

कै. डॉ. शं. वा. परांजपेंचे घर पाहताच ह. ना. आपटे, ना. सी. फडके इत्यादींच्या कादंबरीतील सुखवस्तू नायकाच्या घरासारखे घर पाहिल्याचा सुखद भास जरूर होतो.

प्रथमदर्शनी छोटेसे गेट, घरात प्रवेश करताच चौकोनी पद्धतीने पण ऐसपैसपणे बांधलेली वास्तू मन मोहून घेते. जमिनीवरील वावराने गुळगुळीत शहाबादी फरशी वास्तूतील असंख्यांचा वावर स्पष्ट करते. प्रवेशातच एक लांब - रुंद हॉल. यात १५ ते २० जणांची बैठक. मैफल प्रसंगी छोट्यांची दंगल होऊ शकेल इतके क्षेत्र. त्यात भिंतीवर टांगता येईल अशा खुंट्या व खिळे.

घरात बैठकीसाठी सागवानी बैठका, (सध्या त्यांना 'सोफा' या नावाने ओळखले जाते.) खास सागवानी लाकडी खुर्च्या, मजबूत असे मंचक (त्याला चार पाय असूनही सध्या टी पॉय म्हणतात.) लाकडी कपाटे इत्यादी. सुबकपणे अधिष्ठित. या हॉलमधून चौफेर प्रवेश - मागील परसात, डावीकडे स्वयंपाकघरात व शयनगृहात व डॉक्टरांच्या दवाखान्यात व मागे बाहेर जाण्याचा दरवाजा. अशी चौफेर मार्गी हॉलची रचना, हॉलमध्ये बसले की घराची भव्यता, उपयुक्तता याच मुख्य निकषाने बांधलेली वास्तू वैशिष्ट्ये, एका सत्प्रवृत्तीच्या

सेवाभावी, कलासक्त, समाजशील दिलखुलास व्यक्तीच्या – डॉ. शं. वा. परांजपे सहवासातील गत क्षणांच्या कल्पनेने मी शहारतो. वास्तुपुरुष हा रुबाबदार व धाक दाखविणारा शब्द कसा आला असेल याचा उलगडा येथे चटकन होतो. सर्वांना भरून टाकणारे भारदस्त व्यक्तित्त्व कै. शं. वा. परांजपे व अशी चौफेर पसरलेली भव्य वास्तू यांच्या अलौकिक मिलाफातून हा वास्तुपुरुष एकदा मन:पूर्वक जरूर अनुभवावा.

घराविषयी कलात्मक संकल्पना मनात असल्यानेच मागे सुंदर परस व परसदार या वास्तूचे एक भरीव वैशिष्ट्य आहे. त्यात बागेसदृश्य फुलझाडी, झोपाळा आणि मागील छोटेसे प्रवेशद्वार.

असे ऐसपैस घर पन्नासाव्या दशकात कुणाही रसिकाचे स्वप्न असे. कथा – कादंबरीमधून जीवनमुल्ये शोधणाऱ्या पिढीस जे घर मनात रुंजी घालेल असेच घर कै. डॉ. शं. वांनी इथे साकारले

त्या पन्नासच्या दशकातही तळेगाव दाभाडेत विखुरलेली कलासक्त मंडळी होती. त्यांना सहजपणे लोकल ट्रेनने पुण्यास जाऊन साहित्य, कला, संगीतचा रसास्वाद घेता येत असे. अशा काही कलासक्तांमध्ये विख्यात लेखक, नाटककार कै. गो. नी. दांडेकरही होते आणि कै. डॉ. शं. वा. परांजपेच्या घरासमोरच राहात होते. अशांनी एकत्र येऊन जवळ – जवळ २० वर्षे 'नाट्याराधना ' विविध मार्गाने चालूच ठेवली. त्यामुळे जीवनाचा रसरशीत अनुभव देणारी नाट्यकला स्थायीरूपाने बहरत राहावी यासाठी संस्थात्मक बळ यावे म्हणून एका संस्थेची कल्पना १० एप्रिल १९७७ रोजी साकारली दत्तमंदीराच्या त्यावेळच्या भव्य सभागृहात आणि डॉ. शं. वा. परांजपेंची कल्पना इथे प्रत्यक्षात उतरली. त्या नवजात संस्थेचे नामकरण कै. गो, नी. दांडेकरांनी 'कलापिनी' असे केले. एवढे गोड, काव्यात्म नाव कै. दांडेकरांसारख्या कवीमनाच्या संवेदनशील मनासच सुचते. मात्र हे सारे घडण्याअगोदरच्या चर्चा, कल्पना, फेरबदल इत्यादीचा खल डॉ. शं. वा. परांजपेंच्याच घरी त्या हॉलमध्ये झाला असावा. चांगल्या कल्पना देखील कित्येकदा काही स्थानी सहज सुचतात कारण त्या वास्तूच तशा

प्रेरणा देतात.

यांनतरची ४२ वर्षे वादळी ठरली. कलापिनीने सर्व अंगाने बहरायला प्रारंभ केला. खूप छान कल्पनांनी भरलेली अनेक मंडळी परस्परांमध्ये गुंतून गेली व गत ४२ वर्षात अक्षरश: हजारो सर्जक मनांना फुलविणारे अनेक कलाप्रयोग कलापिनी या संस्थेत झाले त्यातील कित्येक पुढे स्वत:च संस्थामक झाले. त्यातील कित्येक पुढे स्वत:च संस्थात्मक झाले व छोटे – मोठे स्वतंत्र प्रयोग, कृती करू लागले.
हे सारे घडले डॉ. शं. वा. परांजपेंच्या वास्तूत. त्यावेळी तळेगावात कदाचित अशी विचारसरणी डॉ. शं. वा. नी रुजविली. या ठिकाणी म्हणजेच त्यांच्या वास्तूतच यांच्या चर्चा प्राथमिक स्वरुपात झाल्या असाव्यात.

म्हणून मी जेव्हा या वास्तूत डॉ. अ. शं. परांजपे यांना भेटण्यास जातो तेव्हा मला या विठ्ठल मंदिर परिसरात अदभूत वारशाचा एक छान रस्ता होता या कल्पनेने, एका अपूर्व संवेदनेने माणस अत्युच्च दर्जाचा आनंद काही क्षण जरूर मिळतो. म्हणून मी स्टेशन भागात राहत असूनही, तेथील वेगवान आधुनिक जीवनशैली स्वीकारून त्यासह जगत असूनही विठ्ठल मंदिर रस्ता, परिसर व डॉ. शं. वा. परांजपे यांचे भव्य घर मला परत परत साद घालते व मी इथे चटकन येतो देखील.
सायंकाळी घोरावाडी स्टेशनहून घरी परतणाऱ्यांचे, घराकडे जाण्यासाठी आतुर असणाऱ्यांचे थवे पाहूनही मन थरकते. जीवनाचा एवढा सुंदर अविष्कार याच रस्त्यावर जाणवतो. मात्र रस्त्यावर हातात वाटी, त्यात अक्षता, दुसऱ्या हातात आधाराची काठी घेऊन विठ्ठल मंदिराकडे जाणाऱ्या, वयोभाराने वाकलेल्या एखाद्या वृद्ध स्त्रीस व पुरुषास पाहून प्रत्यक्ष मंदिरात न जाता भक्तीचा मळामनात फुलतो. त्याच वेळी विठ्ठल मंदिर रस्त्यावरून जाताना चटकन लक्ष वेधून घेतो, तो कै. डॉ. शं. वा. परांजपेंचा बंगला. त्या पन्नासच्या दशकात अशा घरांना 'बंगला' हे संबोधन मानाने दिले जायचे. त्यात डॉ. शं. वा. परांजपेंसारखे पेशाने डॉक्टर पण कलासक्त मनाच्या माणसाचे वास्तव्य होते. 'कलापिनी'ची

कल्पने सुचणारे दोन दिग्गज  डॉ. शं. वा. व श्री गो. नी. याच रस्त्यावर राहात होते. यामुळेही या परिसराचे मला आकर्षण आहे.

आज विकासोन्मुख तळेगाव दाभाडेत रस्तारुंदीमुळे डॉ. शं. वा.च्या बंगल्याच्या दर्शनी भागास काही तडे गेले तरी, तळेगावातील एक नवखा असूनदेखील, या वास्तूबद्दल अत्यंत सखोल संवेदना सतत माझ्या मनात फुलत राहील.

– शिरीष अवधानी




## सदाबहार डॉ. अ. शं. परांजपे

## डॉ. अ. श. परांजपेंविषयी काही हृद्य प्रतिक्रिया

'वीणा वर्ल्डच्या युरोप टूरमध्ये डॉ. श्री. परांजपे व सौ. परांजपे आमच्या बरोबर सहप्रवासी होते. बसच्या प्रवासात त्यांनी नाट्यीकरण, गाणी इ. सुंदर सादरीकरण केले. ते अत्यंत उत्साही व आनंदी जोडपे आहे.'

**- सौ. दीपा प्रदीप चंद्रात्रेय,**
९९८७९५२०६९

'डॉ. परांजपे यांना फक्त पाककला येते की नाही ते माहित नाही पण बाकीच्या सर्व कलांमध्ये ते तज्ज्ञ आणि महागुरू, महामार्गदर्शक आहेत.'

**- श्री. रविंद्र पांढरे,**
९४२२५६०३८९

'डॉ. अनंत परांजपेंमुळेच 'कलापिनी'चा विकास व वाटचाल शक्य झाली. डॉ. शं. वा. परांजपेंच्या दुःखद निधनानंतर!'

**- श्री. भालचंद्र एकनाथ कुलकर्णी,**
९५०३३६३१९१

'ज्यांचेविषयी मला खूप कौतुक वाटते असे चतुरस्त्र, सव्यसाची व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. अ. शं. परांजपे. ते या नगरीचे 'भूषण' आहेत.

**- श्री. दीपक गांगोळी,**
९८२२११४८३९

'Dr. Paranjape is a multifaceted person. Kalapini today is so well known because so many artists, singers, dancers, comparers have started their carrier in Kalapini and Kalapini has blossomed under the loving care & dedication of Dr. Paranjape.'

**- श्री. अशोक सोनाळकर,**
९३२५३८३६९३

## डॉ. अ. श. परांजपेंविषयी काही हृद्य प्रतिक्रिया

'माझ्यातील गाण्याची कला व लेखनाची कला यांना त्यांनी भरभरून प्रोत्साहन दिले. माझे लिखाण त्यांच्यामुळे सुरू झाले. मला त्यांच्याबद्दल प्रचंड प्रेम आणि आदर आहे आणि तो कायम राहिल.'

**- डॉ. श्रुती अमित देशपांडे,**
९३७०१२८६२६

'साधना, क्रयशक्ती, अखंडित व अविरत वाटचाल, तसेच व्यासंगी व्यक्तिमत्त्व यांचा सुरेख संगम म्हणजे डॉ. परांजपे सर. सरांकडून कायम आदर्शवत् जीवन त्यांच्या संपर्कातील सर्वांनी शिकावे व जगावे असे नवीन पिढीला मला सचवावे वाटते.'

**- डॉ. प्रमोद बोऱ्हाडे,**
९८२२७१७४४७

'डॉ. अनंत परांजपे यांच्यासारखे अवलिया माझे गुरू, मार्गदर्शक आणि मित्र आहेत हे माझं भाग्य आहे.' **- डॉ. सौ. विनया केसकर,**

'अथांग, उत्तुंग, गुणग्राहक, मायाळू, कठोर, हळूवार, भेदक या सगळ्यांना मिक्सरमधून काढल्यावर डॉ. अनंत परांजपे हा पदार्थ आपल्याला मिळतो.'

**- विनायक लिमये,**
९८९०१३५१०९

'संगठनकौशल्य म्हणजे काय हे डॉ. अनंत परांजपे यांच्याकडे पाहून कोणालाही सहज समजू शकेल.'

**- अनंत देशपांडे,**
९७६६३१४४६२

## डॉ. अ. श. परांजपेंविषयी काही हृद्य प्रतिक्रिया

‘कलाकारांचे उत्कृष्ट मार्गदर्शक, पाठीराखे व त्यांच्यावर विशेष प्रेम करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे मा. श्री. डॉ. अनंत परांजपे. सर्वसामान्यांसाठी निःस्वार्थपणे झटणारे एक आदर्श व्यक्तिमत्त्व.’

**– कु. अश्विनी अकोलकर,**

‘डॉ. अनंत परांजपे – एक असामान्य व्यक्तिमत्त्व, समोरच्या माणसातले चांगले गुण बरोबर हेरून त्याचा विकास ते घडवून आणतात.’

**– अशोक बबनराव बकरे,**
९४२३५०६४००

‘वेलीला वर काढण्यासाठी भिंतीचा लागतो आधार, तसाच कलापिनीला बहरण्यासाठी डॉ. परांजपे यांचे विचार’

**– अंबरीष, मनीषा मिलींद देशपांडे,**
८९८३०९१६०७

‘आपल्यात गुणवत्ता असली तरी तिचं मोल समजणारी आणि तिचा योग्य तो वापर करून घेणारी व्यक्ती भेटली नाही तर तिचा अपव्यय होण्याची शक्यता असते. ‘कलापिनी’सारख्या एका मोठ्या संस्थेचे संचालक असूनदेखील त्याचा कुठलाही अहंभाव न बाळगता समोरच्या कलाकाराच्या कलेचा मनस्वी आनंद घेण्याची क्षमता शाबूत राहणं ही सामान्य गोष्ट नाही.’

**– पं. विनोदभूषण अल्पे,**

‘माणूस म्हणून खूप छान आहेत. डॉक्टरांना भेटल्यावर एका महान व्यक्तीला भेटल्याचा फील येतो.’

**– सौ. अनुराधा कुंटे,**
९८६०४५५०९३

‘कलापिनी ला आजवर मिळालेल्या पारितोषिकांची, गौरवांची यादी

१९९२ कलागौरव प्रतिष्ठान, पुणे यांचे वतीने सर्वोत्कृष्ट कार्य पुरस्कार

१९९७ ‘नाट्यदर्पण’ पुरस्कार.
आंतरभारतीय नाट्यपरिषद, पुणे यांचेतर्फे ‘बळवंत पुरस्कार’.
मुंबई मराठी साहित्यसंघ, मुंबई तर्फे ‘कै. अण्णा पणसेकर पुरस्कार’

१९९९ ‘संगीत भूषण’ जयराम शिलेदार ट्रस्ट व मराठी रंगभूमी पुणे.

२००३ तळेगाव दाभाडे नगरपरिषदेतर्फे ‘उत्कृष्ट संस्था पुरस्कार’.

२००४ रानडे फाऊंडेशन, मुंबई तर्फे ‘सांस्कृतिक कार्य-संस्था’ पुरस्कार.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीतर्फे ‘सामाजिक कृतज्ञता’ पुरस्कार.
शेजार ज्येष्ठ नागरिक संघातर्फे ‘सर्वोत्कृष्ट सेवाभावी संस्था’ पुरस्कार.
रोटरी क्लब ऑफ तळेगाव यांचे वतीने ‘जीवन गौरव पुरस्कार’

२००५ तळेगाव पत्रकार संघ, तळेगाव दाभाडे यांचे तर्फे ‘सर्वोत्कृष्ट संस्था सन्मान’ पुरस्कार.
‘गदिमा रंगयात्री’ पुरस्कार.

सतत, दिवसांच्या चोवीस तासांमधील बराच काळ, आठवड्यातील बरेच दिवस, महिन्यातील बरेच आठवडे आणि आयुष्यातील बरीच वर्ष एकाच कार्यात स्वत:ला आकंठ गुंतवून घेणं आणि त्यासाठी ‘कलापिनी’सारख्या संस्थेच्या उत्कर्षाच्या ध्यासाने अक्षरशः पछाडून जाणं ही काही सामान्य बाब आहे असं मला मुळीच वाटत नाही. हे अदभूत आहे, अतुलनीय आहे, अचाट आहे, अफाट आहे.

त्या ध्यासातूनच नाट्य, नृत्य, वक्तृत्व, लेखन, चित्रकला, संवाद, हास्ययोग इ. द्वारे मानवी मनास सदैव संजीवनी देणाऱ्या ‘कलापिनी’ च्या कलाशाखेसह इतरही सर्व शाखा बहरण्यासाठी, दोन दोन वेळा हार्ट अॅटॅक येऊनही स्वत:च्या शरीरस्वास्थ्याची फिकीर न करणारे डॉ. अ. शं. परांजपे यांना म्हणूनच ‘ध्यासपुरुष’ या शब्दानेच गौरविले पाहिजे असं मला अगदी मनापासून वाटतं कारण ...

कारण एखाद्याला चव्वेचाळीस वर्षे एकाच कामात बांधून ठेवण्यासाठी केवळ त्याचा छंद, त्याची आवड, त्याची कौशल्ये किंवा आग्रही वृत्ती पुरेशी नसते. त्यासाठी ‘ध्यास’ हाच एकमेव शब्द आहे मराठी शब्दकोशात. म्हणूनच डॉ. अ. शं. परांजपेंची खरी ओळख ‘ध्यासपुरुष’ या शब्दापाशी येऊन संपते.



**.....Footprints in the sands of the time......** ।।ध्यासपुरूष।।